म. ग्रं. सं. ठाणे
विषय
क्र. नं.

REFBK-0005983

— दत्तु बांदेकर

अतिप्रसंग

[विनोदी लेखांचा संग्रह]

वा. क्र.

दत्तु बांदेकर

संपादक, 'चित्रा'

REFBK-0005983

पु. रा. भिडे आणि कं.,

लक्ष्मी रोड, पुणे २.

प्रकाशक
व. वि. परांजपे,
पु. रा. भिडे आणि कं. साठी
लक्ष्मी रोड, पुणें २.

पुढील आवृत्तीचे, भाषांतराचे इत्यादि सर्व हक्क
सौभाग्यवती नसल्यामुळें कुणाच्या
स्वाधीन करूं ?...

—लेखक

मूल्य

मुद्रक
शं. ब. सहस्रबुद्धे, बी. ए.
बालोद्यान प्रेस, ६८९ सदाशिव पेठ, पुणें २.

ज्यांच्या तगाद्यामुळें
हे लेख जन्मास आले
त्या
‘ चित्रा ’ कचेरींतील
कंपॉझिटर्सना
आदरपूर्वक अर्पण

अतिप्रसंगाची साक्ष

लोकशिक्षण, लोकजागृति व प्रचार हे वृत्तपत्रव्यवसायाचे तीन आद्य व मूलभूत हेतु आहेत; पण मराठी वृत्तपत्रव्यवसायाला प्रारंभ होऊन शंभरापेक्षां अधिक वर्षें लोटलीं तरी या व्यवसायांतील प्रचार या अंगाला आज जेवढें महत्त्व प्राप्त झालें आहे तेवढें तें यापूर्वी कधींहि आलें नव्हतें असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. प्रचाराच्या हेतूकडे या व्यवसायांतील अग्रणींनीं डोळेझांक केली अथवा त्याला द्यावें तेवढें महत्त्व दिलें नाहीं असा याचा अर्थ नाहीं. पण या हेतूवरच सर्व लक्ष व साधनें केंद्रित करण्याजोगी आजच्यासारखी तीव्र परिस्थिति यापूर्वी उत्पन्न झालेली नव्हती. हें मात्र खरें, पक्षविशिष्ट राजकारणाला अगर समाजकारणाला अट्टाहासाचें व आग्रहीपणाचें स्वरूप पूर्वीच्या काळीं ज्या ज्या वेळीं प्राप्त होई त्या त्या वेळीं प्रचाराकडे विशेष लक्ष देण्यांत येई व यशस्वी प्रचार आणि परपक्षीयांचा दंभस्फोट यांसाठीं उपहास, विडंबनें, विपर्यास व विकृत स्वभावदर्शनें या अमोघ प्रचारसाधनांचा अवलंब करण्यांत येत असे. पण तशीं उदाहरणें तुरळकच सांपडतात. तथापि आजच्या वृत्तव्यवसायाचा मात्र प्रचार हा प्रमुख हेतु झाला आहे आणि उपहास व विडंबनें हीं जीं त्याचीं अमोघ साधनें आहेत तींच आजच्या वृत्तव्यवसायाचीं आवश्यक अपरिहार्य अंगें बनलेलीं आहेत. कांहीं रूक्ष व गंभीर नियतकालिकें सोडलीं तर प्राय: असें एकहि नियतकालिक आज सांपडणार नाहीं कीं ज्यांत प्रतिपक्षीयांची संभावना विनोद

व उपहास यांच्या द्वारें करण्यांत येत नसते. या परिस्थितीमुळेंच वृत्तपत्रीय विनोद या विषयाला महत्त्व चढलें आणि कांहीं कल्पक, मार्मिक व अष्टपैलू लेखकांनीं या व्यवसायांत शिरून हा विषय हाताळल्यामुळें विषयाला साहित्याच्या दृष्टीनें देखील मोल चढलें. प्रचार ही या लेखकांनीं एक आकर्षक व परिणामकारक अशी कलावस्तु बनविली. Mein Kampf या आपल्या आत्मचरित्रांत प्रचार या विषयावर लिहितांना हिटलरनें प्रचाराचे Scientific Exposition व Propaganda असे दोन भाग केलेले आहेत. Scientific Exposition चा उपयोग सुबुद्ध व शिक्षित जनतेसाठीं करावयाचा असतो व प्रचार या नांवानें सर्वसामान्यपणें ज्या हुल्लड-बाजीचा बोध होतो तो बहुजनसमाजासाठीं उपयोगांत आणावयाचा असतो. हिटलरनें हे जे दोन प्रकार कल्पिलेले आहेत त्यांपैकीं पहिल्या प्रकाराचा अवलंब मराठी वृत्तपत्रीय विनोदपंडित आतां सर्रासपणें करूं लागले आहेत व त्यांच्या लेखनाची पकड वाचक-वर्गावर त्यामुळेंच मोठ्या प्रमाणावर बसूं लागली आहे. वर्तमान-पत्रांच्या रद्दींत त्यांच्या हातून पडलेलीं हीं रत्नें हुडकून लेखसंग्रहांच्या रूपानें एकत्र आणण्याची आवश्यकता प्रकाशकांना वाटूं लागली, याचें तरी कारण हेंच होय. वृत्तपत्र-व्यवहारांत हें नवें आकर्षण ज्या लेखकांनीं आपल्या कल्पकतेनें निर्माण केलें त्यांमध्यें या संग्रहाचे लेखक रा. बांदेकर यांचा प्रामुख्यानें समावेश करतां येईल. वृत्त-पत्रीय विनोदी लेखक या नात्यानें वाचकांना स्वतंत्रपणें परिचय झालेला नसला तरी या संग्रहांतील त्यांचे लेख पाहिल्यावर बरेच ओळखीचे चेहरे मोहरे पाहून निनांवी लेखनामागें दडलेल्या बांदेकरांची त्यांना तेव्हांच ओळख पटेल. या लेखांनीं बांदेकरांनीं

एका साप्ताहिकाला लोकप्रियता मिळवून दिली; व वृत्तपत्रीय विनोदी लेखनांत आपल्यासाठीं स्वतंत्र उल्लेखाचें असें एक स्थान प्राप्त करून घेतलें आहे.

बांदेकरांचे सर्वच लेख या संग्रहांत समाविष्ट करण्यांत आलेले नाहींत आणि लेखांची निवडहि जेवढ्या कसोशीनें करण्यांत आली पाहिजे होती तेवढ्या कसोशीनें ती झालेली नाहीं. तथापि, बांदेकरांच्या लेखनांतील वैशिष्ट्यांची ओळख या संग्रहांतील सर्वच लेख आपापल्यापरीनें करून देतात. कल्पकता, नाविन्यप्रियता, खेळकरपणा, क्वचित् थिल्लरपणा व मर्मभेदी विषारीपणापासून अलिप्त असलेला बोंचकपणा हीं यांचीं वैशिष्ट्यें आहेत, व तीं या संग्रहांतील त्यांच्या लेखांतून आढळून येतात, आणि मण्यांना एकत्र गुंफणाऱ्या कार्पासतंतूप्रमाणें चुरचुरीत खमंगपणा तर त्यांच्या सर्वच लेखांतून धांवतांना दिसतो. वर्तमानपत्री विनोद-लेखनामध्यें सामान्यत: दोन भाग पडतात. त्यांपैकीं पहिल्या प्रकारच्या लेखकांमध्यें जहाल प्रचारवादी लेखकांचा समावेश होतो, आणि दुसऱ्या वर्गामध्यें प्रत्यक्ष प्रचारकार्यापासून अलिप्त राहून वस्तुमात्रावरील दांभिकपणाचे मुखवटे सहजपणें पण हंसत हंसत दूर करूं शकणाऱ्या खेळाडू लेखकांचा अंतर्भाव होतो. हे उभय प्रकारचे लेखक जात्या कुत्साप्रिय असतात, व दांभिकतेचा त्यांना सारखाच तिटकारा वाटतो. तथापि, पहिल्या वर्गातील लेखकांना उपहासविषयाबद्दल जो कमालीचा अनादर असतो आणि विशिष्ट मतप्रतिपादनाचा त्यांच्या ठिकाणीं जो तीव्र अभिनिवेश वास करीत असतो, त्यांच्यायोगानें कलेचें सौंदर्य पुष्कळदां कलंकित होते. आणि कलेच्या साजाला आवश्यक असलेला संयम तर

मुळींच राहत नाहीं. वक्रोक्ति, व्यंगोक्ति व्याजोक्ति यांची रेलचेल व बेछूट विपर्यास यांच्या आभरणामुळें त्यांचें लिखाण प्रतिपक्षी-यांच्या जिव्हारीं झोंबत असलें तरी वाचकांचा जीव त्यामुळें गुद-मरून जातो व क्वचित् कांहींच्या भावनाहि दुखावल्या जातात. परिणामकारकतेच्या दृष्टीनें जरी त्यांचें लिखाण श्रेष्ठ ठरलें तरी तें कलापूर्ण व हृद्य वाटत नाहीं. दुसऱ्या वर्गातील लेखक आत्यंतिक-पणाच्या या दोषापासून अलिप्त असतात, व उपहासविषयाच्या व्यंग्यावर मर्माघात करून त्याला बोंचून घायाळ करण्याऐवजीं व्यंग्य-चित्रकाराप्रमाणें त्यांचीं तीं व्यंगें अनेकपट विस्तारून त्यांचें स्वरूप शक्य तितकें बेढब करण्याकडे व वाचकांना हंसविण्याकडेच त्यांचा कल असतो. शिवाय, सर्वसामान्य वाचकवर्गाच्या निरोगी भावनांशीं ते समरस होत असल्यामुळें त्यांच्या भावना-संसारांत माफक उलथापालथ करूनहि हे लेखक, आवडत्या पाहुण्यानें दिवाणखान्यांत इकडच्या वस्तु तिकडे केल्या तरी त्यांच्या उपद्-व्यापाकडे यजमान जसा डोळेझांक करतो, त्याप्रमाणें आपल्या आगमनाची अडचण वाचकांना जाणवूं देत नाहींत. वांदेकर हे या दुसऱ्या कोटींतील लेखक आहेत, व म्हणूनच त्यांच्या लेखनांतहि एकच सूर वाहत नाहीं आणि एकाच विषयावर त्यांनीं धार धर-ल्याचेंहि आढळून येत नाहीं. वैचित्र्य त्यांच्या लेखनांत मुबलक आहे.

वांदेकरांनीं या संग्रहांत आजकालचे कांहीं गुन्हेगार अंधेर-नगरीच्या भंपक न्यायालयासमोर उभे केले आहेत. हे गुन्हेगार सत्यवक्ते असल्यामुळें भंपक न्यायालयाच्या रूपानें दाखविलेल्या सत्यसृष्टींत ते गुन्हेगार ठरतात. या गुन्हेगारांपैकीं लेखकानें दिलेली वेश्येची कैफियत जेवढी मार्मिक आहे तेवढीच तथाकथित

शिष्टाचारमय परिस्थितीचें आवरण दूर केल्यामुळें विदारकहि झाली आहे. ती वेश्या आपल्या कैफियतींत म्हणतेः

" मला शिक्षा देतांना माझी देशसेवा आणि सामाजिक दर्जा या गोष्टींचा सरकारनीं विचार करावा अशी माझी विनंति आहे. आज माझ्यामुळेंच अनेक बहकलेले ब्रह्मचारी गांवांत शांतपणें वावरत आहेत. मी आहें म्हणूनच कित्येक घरांत संततिनियमन होऊं शकत आहे. विधुरांना आणि वृद्धांना माझ्यामुळेंच जीवन सुसह्य वाटत आहे. कित्येक आजारी व क्षयरोगी स्त्रियांवर त्यांच्या नवऱ्यां-कडून होणारा बलात्कार माझ्यामुळें टळत आहे. कित्येक देश-भक्त माझ्या घरीं फायली सुद्धां हरवून जातात. फावल्या वेळांत मी चरख्यावर सूत काढतें, निवडणुकीच्या वेळीं कॉंग्रेसलाच मत देतें. समाजयंत्र सुरळीत ठेवण्यासाठीं स्वतःचा देह, सौंदर्य, तारुण्य यांची कुरबानी करणाऱ्या एका परोपकारी स्त्रीला शिक्षा देतांना– "

समाजाच्या भंपकपणावर वरील उद्गारांत केलेली मर्मभेदक टीका अवास्तव आहे काय ?

बांदेकरांची कल्पकता व सोज्ज्वल उपहासक्षमता दाखविणारे लेख म्हणून या संग्रहांतील " विसाव्या शतकांतील समुद्रमंथन ", " दोन दादांची दोस्ती ", " वर्गयुद्ध ", " मदिराभक्तांच्या समाधीवरील शिलालेख ", " जगाचा प्रवास व फुटकें जहाज " या लेखांचा उल्लेख करतां येईल. " तबकड्यावरील जाहिराती " हा बांदेकरांचा विशेष मार्मिक व चटकदार लेख या संग्रहांत समा-विष्ट करण्यांत आला असता तर या संग्रहाचें सौंदर्य जास्त वाढलें असतें. " विसाव्या शतकांतील समुद्रमंथनां"तून काढण्यांत आलेलीं रत्नें वाचकांना लोभनीय वाटतीलच, पण त्यापेक्षांहि त्यांची

लेखकानें केलेली बिनचूक व यथायोग्य विभागणी त्यांना जास्त कौतुकास्पद वाटेल. या लेखाचा शेवट करतांना लेखकानें त्याला दिलेली कलाटणी तर विशेषच कलापूर्ण व मार्मिक आहे. बांदेकरांचा हा लेख मराठींतील उपहास कथांमध्यें निःसंशय बऱ्याच वरच्या दर्जाच्या कथांमध्यें मोडेल. " दोन दादांची दोस्ती " हा लेखहि उपहासाचा एक उत्कृष्ट नमुना असून हिंदुमुसलमान ऐक्याच्या प्रयत्नांतील विनोदी बाजू त्यांत चटकदारपणें रंगविली आहे. मुसलमानदादाची स्वार्थी दृष्टि व खोलपणा आणि हिंदू दादाची खुशामतखोर वृत्ति व पडखाऊपणा यांच्या चित्रणानें जीं दोन स्वभावचित्रें लेखकानें वाचकासमोर उभीं केलीं आहेत त्यांचीं प्रतिबिंबें राजकारणांतहि उमटलेलीं दिसून येत असल्यामुळें, हा लेख वाचतांना सर्वसामान्य वाचकाप्रमाणेंच पक्षाभिनिवेशी वाचकालाहि गुदगुल्या झाल्यावांचून राहणार नाहीं. पण या सर्व लेखांत बांदेकरांच्या स्वाभाविक लेखनधर्माला अपवाद असा एक उल्लेखनीय लेख या संग्रहांत आहे. आणि तो लेख मात्र बांदेकरांचा नेहमींचा सात्त्विक उपहासहि प्रसंगीं किती भेदक व जळजळीत होऊं शकतो याची साक्ष पटवून देतो. "लोकमान्यांनीं पाठविलेला काकदूत" हा तो लेख होय. नेहमींच्या लेखणीनें हा लेख लेखकानें लिहिला नसून तो लिहिण्यासाठीं एकाद्या शस्त्राचें अणकुचीदार टोंकच त्यानें वापरलें असावें असा भास होतो. शिवरामपंत परांजप्यांची मर्मभेदपटुता, आणि तरल कल्पनाविलास यांची आठवण या लेखानें होते असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. शिवाय कोणाहि आत्यंतिक प्रचारकाला शोभेल एवढा आवेशहि त्यांत भरलेला आहे. बांदेकरांच्या निर्विकार अलिप्तपणाला झालेला

विकारी अपघात असेंच या लेखाचें मी वर्णन करीन. पण असें असूनहि त्या लेखाचें उपहास या दृष्टीनें दिसणारें सौंदर्य व महत्त्व मला नाकारतां येत नाहीं.

विनोदी लेखनांतील आकर्षकत्व ज्यायोगानें वाढतें असे मार्मिक दृष्टांत व चटकदार सिद्धांतहि या संग्रहांतील लेखांत जागोजाग विखुरलेले आहेत. "मोटार ही स्त्रीसारखी आहे; क्षणाक्षणाला तिचा तोल सुटतो अणि कितीहि आंवरली, तरी ती काबूंत राहत नाहीं", " वर्तमानपत्रांतल्या अग्रलेखाप्रमाणें मोटरीलाहि एक हॉर्न असावा अशी पुरातन रुढि पडून गेली आहे. बाकी त्याचा उपयोग कांहींच नाहीं ", " लग्नाच्या बायकोला घेऊन कोणताहि पुरुष टॅक्सी उडवीत नसतो ", " पोलिसांपेक्षां बायकोचं ऐकावं हें सुरक्षितपणाच्या दृष्टीनें अधिक शहाणपणाचें ", " बेकारी ही स्त्रीसारखी आहे, आज आहे उद्यां नाहीं ", " कित्येकांना नोकरी असल्यामुळें बायको मिळते; तर कित्येकांना बायको असल्यामुळें नोकरी मिळते. " अशा-सारखीं भाषितें, दारू व नटी यांची तुलना करतांना या उभयतां-मधील दाखविलेला विरोध (पान ७१) इत्यादि स्थळें लेखकाच्या कुशल लेखनशैलीची व सराईत वळणाची ओळख करून देण्यास पुरेशीं होतील.

अनेक साहित्यगुणांनीं समृद्ध असा हा लेखसंग्रह असला तरी विस्कळीतपणाचा दोष या संग्रहांतील कांहीं कांहीं लेखांतून दिसल्या-खेरीज राहत नाहींत. या दोषामुळें जरी कलाहानि होत असली, तरी हे दोष सुधारण्याचें तर राहूंद्याच पण ते लक्षांत येण्याएवढेंहि स्वास्थ्य वृत्तपत्रांच्या कचेरींत मिळत नसल्यामुळें वाचक ते क्षम्य मानतील अशी मला आशा वाटते. या संग्रहांतील लेखांवर सदाभिरुचीचें व व्यक्तिं-

पूजेचें अवास्तव स्तोम माजविणाऱ्या आणि स्वकर्मापुरतेंच पावित्र्य मर्यादित ठेवणाऱ्या कांहीं पावित्र्यरक्षक गटांकडून टीका होण्याचाहि संभव आहे; परंतु हा लेखनप्रकार आतां सर्वमान्य व रूढ होऊन वाचकांच्या चांगलाच पचनीं पडला आहे. म्हणून तिकडे गंभीरपणानें लक्ष देण्याचें कारण नाहीं. तसें म्हटलें तर हा सांप्रदाय अर्ध्या शतकापेक्षांहि जुना आहे आणि तो रूढ करण्यांत केसरीकारांसारख्या त्या वेळच्या थोरांनींच पुढाकार घेतलेला होता. १८८६ सालीं बालविवाह व असंमत वैधव्य या बाबतींत कायदा करण्याचें घाटत असतां सरकारनें सामाजिक चालीमध्यें हस्तक्षेप करूं नये म्हणून अस्तिपक्षीं सुधारकांचा उपहास करण्यासाठीं " आतां कसें ? " या मथळ्याखालीं संपूर्णपणें वैयक्तिक कुचेष्टापर असा एक लेख केसरीच्या संपादकांनीं प्रसिद्ध केला होता व मार्मिकपणाबद्दल त्याची फार वाखाणणी झाल्यामुळें केसरींतील निवडक निबंधांतहि तो पुढें समाविष्ट करण्यांत आला. शिष्टपुरस्कृत व शिष्टमान्य असा हा पायंडा असल्यामुळें त्याचाहि लाभ आपल्या बचावासाठीं बांदेकरांना जरूर घेतां येईल.

कोणाहि लेखकानें केलेल्या अतिप्रसंगाला साक्षीदार म्हणून उभा राहण्याचा प्रसंग येणें एरवीं मला आपत्तिकारक वाटलें असतें. पण बांदेकरांचा हा "अतिप्रसंग " रंगेलपणाच्या अविचारी भावनेंतून जन्म पावलेला नसून त्याच्या मागें विनयशीलतेची धाकधूक असल्यामुळें मला हा प्रसंग उलट आनंददायकच वाटतो. बांदेकरांच्या ह्या वाङ्मयीन अतिप्रसंगाची गोंडस अपत्यें अशींच वाचकांच्या दृष्टीस पडोत अशीच सनातनी शुभेच्छा या प्रसंगीं मी प्रकट करतों.

मुंबई, ता. ४-३-१९४० चं. वि. बावडेकर.

बांदेकरांचा ‘ अतिप्रसंग ’

‘ अतिप्रसंगां’तले बरेचसे प्रसंग ‘ चित्रा ’ कचेरींत श्री. दत्तू बांदेकर यांनीं माझ्या डोळ्यांसमोर चितारले आहेत. त्यांच्या गुण-दोषांची साधकबाधक चर्चा टीकाकार करतीलच. पण ‘ चित्रे ’त लिहावयाला सुरुवात केल्यापासून त्यांच्या लेखणीचा जो विशेष विकास झाला त्याचा उल्लेख करणें माझें कर्तव्य आहे असें मला वाटतें. यापूर्वी त्यांनीं विशिष्ट व्यक्तींची किंवा संस्थांची खुमासदार टर उडविली असेल; पण आपली चुरचुरीत, चमकदार लेखणी सामाजिक आणि राजकीय ढोंगबाजीवर चालवावयाला त्यांनीं ‘ चित्रे ’तच सुरुवात केली. त्यांचा उपहास किती विदारक आणि त्यांच्या लेखणीची धार किती तिखट असते याचें एकच उदाहरण देतों. वेश्येची बाजू अनेक रडव्या कवींनीं, हुंदके देणाऱ्या सुधारकांनीं जगापुढें मांडली असेल. पण ‘ आजकालचे गुन्हेगार ’ या लेखमालेंतला बांदेकरांचा ‘ वेश्या ’ हा संवाद वाचा.

“ **कोर्टः**—तुझ्यामुळें चाळींतल्या कुलीन स्त्रिया बिघडण्याची भीति—

वेश्याः—नाहीं, सरकार, उलट त्यांच्यामुळेंच मी अलिकडे थोडी बिघडलें आहें. मीं आज जो हा नट्टापट्टा केला आहे तो तेथील कुलीन स्त्रियांचा पाहून.

सेविकाः—(कोर्टाच्या कानांत) हिला जास्त शिक्षा ठोका.

कोर्टः—ऐकलंस कायग, गणिके, खरं बोलल्याबद्दल तुला

जास्त शिक्षा ठोकण्याचा मला सल्ला मिळाला आहे. वेश्यांनीं आणि देशभक्तांनीं इतकं प्रामाणिक असतां कामा नये. बोल, तुझ्या गुन्ह्याबद्दल आणखी तुला काय सांगायचं आहे ?

वेश्या:—मला शिक्षा देतांना माझी देशसेवा आणि सामाजिक दर्जा या गोष्टींचा विचार सरकारनें करावा, अशी माझी विनंति आहे. आज माझ्यामुळेंच अनेक बहकलेले ब्रह्मचारी गांवांत शांतपणें वावरत आहेत. मी आहें म्हणूनच कित्येक घरांत संततिनियमन होऊं शकत आहे. विधुरांना आणि वृद्धांना माझ्यामुळेंच जिवन सुसह्य वाटत आहे. कित्येक आजारी आणि क्षयरोगी स्त्रियांवर त्यांच्या नवऱ्यांकडून होणारा बलात्कार माझ्यामुळें टळत आहे. समाजयंत्र सुरळीत ठेवण्यासाठीं स्वतःचा देह, सौंदर्य आणि तारुण्य यांची कुरबानी करणाऱ्या एका परोपकारी स्त्रीला शिक्षा देतांना--

कोर्ट (उपरण्यानें डोळे पुशीत सद्गदित स्वरांत):—बोलूं नकोस, देवी, पुढें बोलूं नकोस. तुझा त्याग आणि सेवा अलौकिक आहे यांत शंकाच नाहीं. तूं देवता आहेस, तूं–"

अधू मनाच्या अर्धवटांना या उताऱ्यांतल्या प्रखर सत्याचा प्रकाश सहन होणार नाहीं; आणि ते ' अश्लील ', ' अश्लील ' म्हणून बेंबीच्या देंठापासून कोकलूं लागतील. पण ज्याला ज्याला म्हणून सदसद्विवेकबुद्धि आहे त्याचे डोळे या अप्रतिम शब्दचित्रानें खाडकन् उघडल्यावांचून राहणार नाहींत.

हीच गोष्ट बांदेकरांच्या राजकीय व्यंग्यचित्रांची. गांधी-जिना मुलाखतीचें ' कासम–सखाराम मुलाखत ' या नांवानें त्यांनीं केलेलें बेफाम विडंबन, किंवा लोकमान्यांच्या पुण्यतिथीच्या निमि-

त्तानें त्यांनीं लिहिलेला ' काकदूत ' हा नितांतसुंदर लेख वाचा. त्यांच्या लेखणीच्या विषारी उपरोधानें जे घायाळ झाले आहेत, त्यांनासुद्धां त्या लेखांतल्या अवीट, काव्यात्ममाधुरीची स्तुति केल्याशिवाय राहवणार नाहीं. मिळेल तेव्हां नि मिळेल तेथें बांदे-करांनीं स्त्रियांची रेवडी उडविली आहे. स्त्री-जातीवर इतका चौफेर आणि निर्दय हल्ला चढविणारा लेखक महाराष्ट्रांत तरी विरळा, असें मला वाटतें. आणि तरीहि स्त्रिया त्यांचे लेख अत्यंत आवडीनें वाचतात हें मला माहीत आहे. आपणाशीं अतिप्रसंग करूं नये म्हणून स्त्रिया तोंडानें सारख्या ' नको ', ' नको ' म्हणत असतात; पण मनांतून त्यांच्यापैकीं बहुतेकांना अतिप्रसंग हवा असतो, असें मानसशास्त्रज्ञ म्हणतात. त्यांचेंच तर हें उदाहरण नसेल ना ! या 'अतिप्रसंगा'ला नांवें ठेवणारे पुष्कळ आढळतील, पण उघडपणें नाहीं, तरी चोरून त्यांपैकीं सर्वजण तो अधाशीपणानें वाचतील याबद्दल बांदेकरांनीं खात्री बाळगावी.

— अनंत काणेकर

मराठी ग्रंथ सं
स्थळ प्रत
सं.
ता.
ठाणे

थोडें पण महत्त्वाचें

श्री. बांदेकरांनीं हे लेख लोकांच्या रंजनासाठीं लिहिले आहेत. त्यांत व्यक्तिद्वेष मुळींच नाहीं. त्यांना म. गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर, आंबेडकर, भोपटकर आणि त्यांच्या संस्था यांच्यांतले गुण निःसंशय मान्य असतील. पण त्यांच्यांतील हास्याचीं स्थानें त्यांनीं अगदीं पक्षातीतपणें उचललीं आहेत, हें निरनिराळे लेख वाचून लक्षांत येईल.

पुस्तकाच्या अंतर्बाह्य सजावटीसाठीं श्री. काणेकर, श्री. चं. वि. बावडेकर, सुप्रसिद्ध चित्रकार दलाल, श्री. बेलदे, बालोद्यान प्रेसचे श्री. सहस्रबुद्धे, त्यांचे मदतनीस व आमचे नेहमींचे हितचिंतक यांनीं आपआपल्यापरीनें व आपुलकीनें जी मदत केली आहे त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

प्रकाशक

डॉ. सौ. मनोरमाबाई थत्ते यांचें
अभ्यासपूर्ण अभिनव पुस्तक
"आजचें स्त्रीजीवन"
लौकरच प्रसिद्ध होणार !
प्रकाशक : राष्ट्रवैभव प्रेस, मुंबई ४.
पुणें एजंट : पु. रा. भिडे आणि कं., लक्ष्मी रोड पुणें २.

मुंबई शाखा

आजकालचे गुन्हेगार !

भिकारी १

[अंधेरनगरीच्या भंपक न्यायालयासमोर आज बरेच लहान-मोठे खटले चालू आहेत. पोलीसांनीं रस्त्यावरचे असंख्य भिकारी पकडून आणले असून, त्यांचा निकाल लावण्यांत न्यायमूर्ति गढून गेले आहेत. न्यायमूर्तींच्या टेबलावर नीरेचा एक पेला असून, न्यायमूर्तींना मधून मधून सावध करण्यासाठीं दोन सेविका आसपास टकली चालवीत बसल्या आहेत. तूर्त एका तरुण भिकारणीचा खटला न्यायमूर्तींनीं हातीं घेतला आहे.]

कोर्ट (भिकारणीकडे पाहून)—हे सुंदर स्त्रिये !

सेविका (कोर्टाच्या कानांत)—अहो, ती भिकारीण आहे. आरोपीबाईला अशा रीतीनें संबोधूं नये. कोर्टानें नेहमीं आपलं वजन ठेवलं पाहिजे.

कोर्ट (सावध होऊन)—काय ग, ए भिकारणी–!

भिकारीण—जी सरकार.

कोर्ट—जाहीर रस्त्यांत भीक मागणें हा गुन्हा आहे हें तुला माहीत नाहीं ?

भिकारीण (हात पसरून)—शेट, एक पैसा !

कोर्ट—अरेच्या ! ही कोर्टाकडेहि भीक मागायला लागली. जा–पुढें जा !

सेविका (कोर्टाच्या कानांत)—अहो, तिला जा म्हणूं नका. तिचा खटला चालवायचा आहे ना ?

कोर्ट—थांब ग, जाऊं नकोस. तुझा निकाल अजून लागायचा आहे. हं बोल, तूं रस्त्यांत भीक कां मागतेस ? तुझ्यासारख्या तरुण स्त्रीनें रस्त्यांत भीक मागणं हें शोभतं का ? तुला दुसरे धंदे येत नाहींत ? आमच्या सेविका पहा—

सेविका (कोर्टाच्या कानांत)—अहो, हें काय ?

कोर्ट—सूत कांतणें, टकली फिरविणें इत्यादि धंदे तुला येत नाहींत ?

भिकारीण—हे धंदेसुद्धां भिकेचेच आहेत. त्यापेक्षां भीक मागितलेली काय वाईट ? (पोराला पाजते.)

कोर्ट—शू शूः ! कोर्टांत पोराला पाजण्याची सक्त मनाई आहे.

तुम्हा भिकारणींना अजून कायदेकानू कळत नाहींत! वाटल्यास त्या पोराला शेळीचें दूध पाज. आईच्या दुधाला कोर्टीत मनाई आहे.

भिकारीण—शेळीचं दूध आणावं कुठून, सरकार? भिकाऱ्यांना तें कसं परवडेल?

कोर्ट—हीं एवढीं पोरं झालीं कशीं तुला? माझ्या लग्नाला सात वर्षं झालीं तरी पोराचा पत्ता नाहीं आणि तुम्हां भिकारणींना एवढीं पोरं कशीं होतात?

भिकारीण—देवाची कृपा!

कोर्ट—हा देव कोण?

सेविका (कोर्टाच्या कानांत)—अहो, देव म्हणजे ईश्वर!

कोर्ट—अस्सं अस्सं! काय ग भिकारणी, ह्या पोरांचा बाप कोण?

भिकारीण—तुमच्यासारखाच कोणीतरी.

सेविका (कोर्टाच्या कानांत)—हा कोर्टाचा अपमान होत आहे.

कोर्ट—मुळींच नाहीं. पोरांचे चेहरे पांढरपेशा वळणाचे दिसतात. बाप कोणीतरी आमच्यापैकींच असावा. बरं, हे भिकारणी, मला हें सांग, तूं भीक कां मागतेस? भीक मागणें हा सरकारच्या दृष्टीनें सध्यां मोठा गुन्हा झाला आहे याची तुला जाणीव नाहीं काय? बोल, भीक कां मागतेस?

भिकारीण—पोटासाठीं!

कोर्ट—आश्चर्य आहे! पोटासाठीं भीक मागायला तुला लाज वाटली पाहिजे. पोटाला मिळत नाहीं तर उपाशी कां राहत नाहींस? महात्मा गांधीसुद्धां उपास करतात आणि तुला भिकारणीला उपास करतां येऊं नये म्हणजे काय?

भिकारीण--मी कुठें महात्मा आहें ?

कोर्ट—या सेविकासुद्धां मधून मधून उपास करतात—

भिकारीण—अजीर्ण झालं म्हणजे--

सेविका (कोर्टाच्या कानांत)—हा कोर्टाचा अपमान होत आहे.

कोर्ट--मुळींच नाहीं. हें पहा, भिकारीण स्त्रिये ! ज्या अर्थी भीक मागणें हा गुन्हा आहे त्या अर्थी उपास करण्यास तूं शिकावंस हेंच उत्तम. उपास केल्यानें तुझं आत्मबल वाढेल, तुझं शील चांगलं राहील, तुझ्या डोक्यांत उदात्त, उन्नत, दिव्य विचार—

भिकारीण (कासावीस होऊन)--सरकार, मला लवकर दंड करा आणि सोडून द्या.

कोर्ट--हे सुंदर स्त्रिये, इतक्या घाईनं तुझा निकाल लावणं कोर्टाला शक्य नाहीं.

सेविका (कोर्टाच्या कानांत)--अहो, कोर्टाचं हें बोलणं जरा उल्लूपणाचं दिसत नाहीं का ?

कोर्ट (सेविकेकडे दुर्लक्ष करून)--भिकारणी, तुझी रोजची कमाई किती तें मला सांग, म्हणजे त्या मानानें तुला दंड ठोकतां येईल.

भिकारीण--रोज बारा ते पंधरा आण्यांचा खुर्दा माझ्या पदरांत पडतो. त्यांतील दोन आणे पोलीसदादाला--

कोर्ट--शू श्ः, नादान स्त्रिये, पोलिसांवर हलकट आरोप करण्यास तुला दिक्कत कशी वाटत नाहीं ? खोटं बोलतेस ? सत्य, अहिंसा या गोष्टी तुला कळत कशा नाहींत ? पोलीस कधीं भिकाऱ्यांकडून लांच घेतील ? माग, कोर्टाची माफी माग !

ग्रंथ संग्रह स्थळ प्रत सं. ता.

भिकारीण--चूक झाली माझी.

कोर्ट--शाबास ! खरं बोलल्याबद्दल तुला फक्त साडेसात आणे दंड किंवा दंड न भरल्यास एक हजार वार सूत कांतणें अशी शिक्षा केली आहे. इतका कमी दंड देण्यास तुला कमीपणा वाटत असेल तर साडेसात रुपये देऊन टाक.

सेविका (कोर्टाच्या कानांत)--हिच्या पोरांना चेंबूरच्या अर्भकालयांत डांबण्याचा हुकूम करा.

कोर्ट--हे भिकारणी, तुला आतां आपलीं पोरं बरोबर नेतां येणार नाहींत. तुझ्या पोरांना चेंबूरच्या अर्भकालयांत आम्ही पाठवणार !

भिकारीण--माझी हरकत नाहीं. देवाच्या कृपेनं आणखी पोरं होतील.

कोर्ट--मोठा पेंचप्रसंगच हा ! आम्हीं अर्भकालयांत कितीहि पोरं डांबलीं तरी ही आयात कांहीं थांबणार नाहीं. बरं, भिकारणी, तूं आतां जा. तुला सोडून दिलं आहे. पण हें पहा, यापुढें रस्त्यांत अब्रूदार लोकांना सतावूं नकोस.

भिकारीण--मी नाहीं सतावीत, सरकार. तेच लोक मला उलट सतावतात. अब्रूदार लोकांच्या या त्रासामुळेंच मी सध्यां गिरगांव सोडून भेंडीबाजारांत भीक मागत आहें.

(कोर्टाला धक्का बसतो. कोर्ट विचारांत पडून नीरेचा पेला तोंडाला लावतात. कोर्ट बरखास्त झालें असें दर्शविण्यासाठीं सेविका ‘ गांधी मीठू चोर ’ हें कोरस म्हणतात.)

ड्रायव्हर २

[गेल्या दोनचार दिवसांत गांवांत गाडीघोड्यांचे बरेच अपघात झाले असल्यामुळें, आज भंपक न्यायालयांत मोटार ड्रायव्हर्स व व्हिक्टोरियावाले यांची गर्दी जमली आहे. उच्चासनावर न्यायमूर्ति बसले असून, फार उकडत असल्यामुळें थंडा लेमन पीत ते खटला चालवीत आहेत. न्यायमूर्तींच्या आसपास बसलेल्या दोन सेविकांना आज पडसें व खोकला झाला असल्यामुळें त्या सुंठवडा खात न्यायमूर्तींना सल्ला देत आहेत.]

कोर्ट--मिस्टर ड्रायव्हर, नीट उभा रहा. तुला कडक शिक्षा देणें मला भाग आहे. तुझ्यावर भयंकर स्वरूपाचे आरोप आहेत. बोल, काल रात्रीं तूं काय काय केलंस तें सगळं सांग पाहूं ?

ड्रायव्हर--तें कसं सांगूं, सरकार ? रात्रीं मी काय करतों याची मला सकाळीं आठवण राहत नाहीं.

कोर्ट—तूं काल रात्रीं अपघाताचा रेकॉर्ड करून टाकलास ! पहिल्यानें म्युनिसिपालिटीच्या खांबावर तूं गाडी चढवलीस, तेथून पोलिसांच्या अंगावर ती नेऊन आपटलीस आणि पुढें एका व्हिक्टोरियावर आदळून मोठा अनर्थ केलास. आश्चर्य आहे ! लागोपाठ इतके अपघात तूं केलेस तरी कसे ?

ड्रायव्हर—संवयीमुळें, सरकार ! सराव असला म्हणजे कोणतीहि गोष्ट कठिण नाहीं.

कोर्ट—तूं ड्रायव्हर कसा झालास याचं मला नवल वाटतं. ड्रायव्हर होण्यापेक्षां तूं सैन्यांत कां शिरत नाहींस ? तेथें सुद्धां माणसं मारण्याची सोय आहे.

सेविका (कोर्टाच्या कानांत)—हा ड्रायव्हर मघांपासून माझ्याकडे टक लावून पाहतो. त्याला दम भरा.

कोर्ट—काय रे ड्रायव्हर, तुझं लक्ष कुठें आहे ? कोर्टाकडे पाहण्याचें सोडून तूं सेविकेकडे काय पाहतोस ? लाज वाटत नाहीं ? अशानेंच तुम्ही अपघात करीत असतां !

ड्रायव्हर--माझ्यावर असा आरोप करूं नका, सरकार. कुरूप स्त्रीकडे मी कधींहि पाहत नसतों.

सेविका (कोर्टाच्या कानांत)--हा कोर्टाचा अपमान होत आहे.



कोर्ट—मुळींच नाहीं. या बाबतींत ड्रायव्हरचं आणि माझं एकमत आहे.

ड्रायव्हर—सरकारचा मी 'आभारी आहें.

कोर्ट—म्हणून तुला शिक्षा कमी होईल असें समजूं नकोस. पोलिसानें हात दाखविला असतांहि तूं पोलिसाच्या अंगावर मोटार कां टाकलीस ?

ड्रायव्हर—त्यानें हात दाखवला म्हणून. पोलीस मला नेहमीं हात दाखवतो, तेव्हां म्हटलं एक दिवस त्यालाहि हात दाखवावा.

कोर्ट—हा भयंकर गुन्हा आहे. पोलिसावर मोटार घातलीस ते जाऊंद्या; पण बिचाऱ्या म्युनिसिपालिटीच्या बत्तीवर कां आक्रमण केलंस ?

ड्रायव्हर—ती बत्ती असून नसून सारखीच सरकार. तिला उजेडच नाहीं. मोटार त्या खांबावर आदळेपर्यंत ती बत्ती आहे हें मला माहीतच नव्हतं.

कोर्ट—तुम्हां ड्रायव्हर लोकांमुळें शहरवासीयांचें जीवन धोक्यांत पडलें आहे. घराबाहेर पडलेला इसम सुरक्षित घरीं परत येईल याचा नेम नसतो. तुला मी आज जास्तींत जास्त शिक्षा देणार आहें. बोल, तुझं काय म्हणणं आहे यावर ?

ड्रायव्हर—मी देशभक्त आहें हें मी कोर्टाच्या नजरेस आणूं इच्छितों. माझ्या देशभक्तीकडे पाहून मला सौम्य शिक्षा मिळावी अशी माझी नम्र विनंति आहे.

कोर्ट—काय म्हणतोस ? तूं देशभक्त आहेस ? कधीं केलीस तूं देशभक्ति ?

ड्रायव्हर—सरकार, कायदेभंगाच्या काळांत माझ्या टॅक्सीनें पंक्चर होईपर्यंत देशसेवा केली आहे. कायदेभंगाची चळवळ जोरांत चालू असतां माझी टॅक्सी देशभक्तांना घेऊन अनेक वेळां वरळीच्या बाजूला गेली आहे. रात्र म्हटली नाहीं, अपरात्र म्हटली नाहीं—

कोर्ट—वाः, म्हणजे तूं बरीच देशसेवा केलेली दिसते.

ड्रायव्हर—होय सरकार! माझ्या टॅक्सीमुळें कायदेभंगाची चळवळ जोरांत चालली. त्या वेळीं माझ्या टॅक्सींत सांपडलेल्या केशरी साड्या अजून मीं स्वातंत्र्ययुद्धाची खूण म्हणून जपून ठेवल्या आहेत. मला वाटतं कोर्टाच्या शेजारीं बसलेली सेविकासुद्धां कधीं कधीं माझ्या मोटारींतून—

सेविका (कोर्टाच्या कानांत)—हा खोटं बोलतो आहे.

कोर्ट—कायरे, खोटं बोलतोस काय? खोटं बोलायला तूं कोण स्वतःला पुढारी समजतोस?

ड्रायव्हर—सरकार, ड्रायव्हर लोक आपल्या गिऱ्हाइकांना दहा वर्षांनीं सुद्धां अचूक ओळखतात. त्यांतून भानगडीचें गिऱ्हाइक असलें कीं आम्ही जन्मभर विसरत नसतों.

सेविका (कोर्टाच्या कानांत)—याला जास्त दंड ठोका.

कोर्ट—ऐकलंस कायरे, ड्रायव्हर, खरं बोलल्याबद्दल तुला जास्त दंड ठोकणं कोर्टाला भाग आहे. बरं, आतां मला हें सांग, काल रात्रीं लागोपाठ तूं इतके अपघात केलेस कसे? तुझी मोटार तुला आवरतां येत नाहीं?

ड्रायव्हर—हा माझा दोष नाहीं. मोटार ही स्त्रीसारखी आहे.

क्षणाक्षणाला तिचा तोल सुटतो आणि कितीहि आवरली तरी काबूंत राहत नाहीं.

कोर्ट--तूं मोटार ताशीं किती मैल चालवतोस ? तुझ्या मोटारीचा वेग किती ?

ड्रायव्हर--तें पोलिसांना विचारा, सरकार ! अशा गोष्टींकडे मी सहसा लक्ष घालीत नाहीं.

कोर्ट--तुझ्या मोटारीला हॉर्न आहे कीं नाहीं ?

ड्रायव्हर--आहे. पण हॉर्नचा मी फारसा उपयोग करीत नाहीं. कारण हॉर्न वाजविणें हें कमीपणाचें लक्षण आहे असें आम्ही समजतों.

कोर्ट--मग हॉर्न हा केवळ शोभेसाठींच ठेवलेला असतो काय ?

ड्रायव्हर--अलबत् ! वर्तमानपत्रांतल्या अग्रलेखाप्रमाणें मोटारीलाहि एक हॉर्न असावा अशी पुरातन रूढी पडून गेली आहे. बाकी त्याचा खरा उपयोग कांहीं नाहीं. असे कित्येक ड्रायव्हर आहेत कीं मोटारीखालीं माणूस मेल्यानंतरच ते हॉर्न वाजवितात.

कोर्ट--हें तर फारच भयंकर ! तुला आतां कडक शिक्षा दिलीच पाहिजे. तुम्हीं ड्रायव्हर्सनीं रस्त्यानें चालणें लोकांना धोक्याचें करून ठेविलें आहे.

ड्रायव्हर--हा आरोप खोटा आहे. लोक आपखुषीनें मोटारीखालीं येऊन पडतात. हॉर्न वाजवा किंवा वाजवूं नका--लोक मरायचें कांहीं सोडून देणार नाहींत. प्रेमांत पडणें आणि मोटारीखालीं पडणें या गोष्टी मानवांच्या हातीं नसतात. आणि या दोन्ही बाबतींत मनुष्य सारखाच घायाळ होतो.

प्रत
१०५५/८५७

कोर्ट——तूं तर बराच शहाणा दिसतोस. मला हें सांग, काल रात्रीं अपघात होतांना तुझ्या मोटारींत कोण कोण होते ?

ड्रायव्हर——एक पुरुष आणि एक बाई अशीं दोघें माझ्या टॅक्सींत होतीं.

कोर्ट——नवराबायको असतील ?

ड्रायव्हर——छे ! मला नाहीं वाटत. लग्नाच्या बायकोला घेऊन कोणताहि पुरुष टॅक्सी उडवीत नसतो.

कोर्ट——तुझीं सगळीं गिऱ्हाइकें अशीं भानगडीचींच असतात का?

ड्रायव्हर——नाहीं, सरकार. मोठमोठे अब्रूदार लोकसुद्धां माझे गिऱ्हाईक आहेत. एकदोनदां खुद्द कोर्टालासुद्धां मी लंडनबारमधून घरीं पोंचवलं आहे. कोर्टाला आठवण असेलच.

सेविका (कोर्टाच्या कानांत)——हा कोर्टाचा अपमान होत आहे.

कोर्ट——ऐकलंस कायरे, ड्रायव्हर, खरें बोलून तूं कोर्टाचा अपमान केल्याबद्दल तुला सहा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यांत येत आहे.

ड्रायव्हर——याबद्दल मी सरकारचा आभारी आहें. कालच माझी पत्नी माहेरहून आली आहे. अशा परिस्थितींत सरकारनें मला घराबाहेर काढून तुरुंगांत पाठवावं ही माझ्यावर मोठीच दया होय.

(इतक्यांत सेविकेला जबरदस्त खोकला येतो आणि त्या धक्क्यासरशी कोर्टाचें काम खतम् होतें. कांहीं वेळानें सेविका सावध होऊन सुंठवडा खात ‘ वंदेमातरम् ’ गीत म्हणते.)

फेरीवाला ३

[आज अंधेरनगरीच्या भंपक न्यायालयांत पोलिसांनीं पकडून आणलेल्या फेरीवाल्यांची एकच गर्दी उडाली आहे. निरनिराळे फेरीवाले आपापला माल डोक्यावर घेऊन कर्णकर्कश सुरांत हेल काढीत आहेत. चिक्की, गंडेरी, केळीं, मोसंबी, चणे कुरमुरे, पुरी, पकोडी, बच्चांना रमकडा, फॅन्सी कापड इत्यादि अनेक सटरफटर मालांचें जंगी प्रदर्शन कोर्टांत भरलें असून, बेसुमार आरडाओरड व गलबला यांमुळें कोर्टाला नळबाजाराचें स्वरूप प्राप्त झालें आहे. याच गडबडींत कोर्टाचें कामकाज चाललें असून, न्यायमूर्तींच्या आसपास दोन लठ्ठ सेविका चिक्की खात बसल्या आहेत. तूर्त चणे विकणाऱ्या एका फेरीवाल्याचा खटला कोर्टानें हातीं घेतला आहे.]

कोर्ट—कायरे, ए फेरीवाल्या, काय आहे तुझ्या टोपलींत ?

फेरीवाला—गरम आहेत, शेठ, शुक्रवारी ! दिडकीला दोन माप. देऊं, शेठ ?

कोर्ट—अरेच्या ! हा तर कोर्टीतच धंदा करायला लागला !

सेविका (कोर्टाच्या कानांत)—हा कोर्टाचा अपमान होत आहे.

कोर्ट—ए फेरीवाल्या, हा कोर्टाचा अपमान होत आहे. कोर्टीत धंदा करतोस म्हणजे काय ? कोर्टीत धंदा करण्याचा अधिकार फक्त वकीलांनाच आहे; बाकी कोणाला नाहीं.

फेरीवाला—चूक झाली माझी ! मला वाटलं कोर्टाच्या टेबलावर नीरेचा ग्लास आहे, तेव्हां कोर्टाला चण्याची जरूरी भासणार म्हणून——

कोर्ट——चूप ! कोर्टाच्या खाण्यापिण्याच्या भानगडींत तुला पडण्याचं मुळींच कारण नाहीं. तूं तुझ्यापुरतं बोल. तुला इथं पोलिसांनीं कां पकडून आणलं आहे तें माहीत आहे ना ?

फेरीवाला——होय. पोलिस माझ्याकडे चिरमिरी मागत होता आणि ती मीं देण्याचें नाकारलें.

कोर्ट——खोटं आहे. तूं फूटपाथवर माल ठेवून बसला होतास आणि पोलिसांनीं अनेक वेळां विनंति करूनहि तूं तेथून हलला नाहींस ! बोल, तूं कां उठला नाहींस ?

फेरीवाला——शेजारींच माझी बायको केळीं विकीत बसली होती. ती मला म्हणाली, ' जाऊं नका. ' आतां तुम्हीच सांगा, सरकार, पोलिसांचं ऐकावं कीं बायकोचं ?

कोर्ट (विचार करून)——बायकोचं ऐकावं हें सुरक्षिततेच्या दृष्टीनें अधिक शहाणपणाचं आहे.

सेविका (कोर्टाच्या कानांत)--मला वाटतं कोर्ट घसरत चाललं आहे.

कोर्ट--मुळींच नाहीं. कायदा कडक असला तरी बायको त्यापेक्षां कडक आहे. कोर्ट स्वतः विवाहित असल्यामुळें इतर विवाहित माणसांबद्दल कोर्टाला सहानुभूति वाटणं साहजिक आहे. फेरीवाला असला तरी तो एका बाईचा नवरा आहे, ही दारुण घटना आपणांस नजरेआड करतां येणार नाहीं.

फेरीवाला--सरकारचा मी अत्यंत आभारी आहें.

कोर्ट--पण हें पहा, फेरीवाल्या, तुझ्या बायकोनं फूटपाथवर केळीं विकणं मला पसंत नाहीं. परवां मौलाना आझाद केळीच्या सालीवरून कसे घसरून पडले हें तुला माहीत आहे ना ? मुंबईच्या फूटपाथवरून सुद्धां असेच्च असंख्य लोक केळीच्या सालीवरून रोज घसरून पडत असतात. परवां आमची ही सेविकासुद्धां भर गिरगांवांत सपशेल आडवी पडली.

सेविका (कोर्टाच्या कानांत)--अहो, मला कांहीं विशेष लागलें नाहीं.

कोर्ट--तुला विशेष लागलं नसलं तरी फूटपाथ मोडला आणि म्युनिसिपालिटीला दुरुस्तीसाठीं जादा खर्च सोसावा लागला.

फेरीवाला--यापुढें माझ्या कारभारणीला मी सांगत जाईन कीं केळीचा धंदा सोडून बाकी वाटेल तो धंदा कर.

कोर्ट--आणि हें बघ, फूटपाथवर दुकान मांडून बसणं हा मोठा गुन्हा आहे; यामुळें शहरांत अपघात फार होतात. सारा फूटपाथ तुम्ही अडवून बसूं लागलांत तर माणसांनीं चालावं कुठून ?

फेरीवाला--आमच्या नांवानें ही खोटी ओरड आहे.

लोक फूटपाथवरून कधींच चालत नसतात. ज्या फूटपाथवर आम्ही बसत नसतों अशा रस्त्यांवरसुद्धां अपघात होत असतात.

कोर्ट——शिवाय तुम्ही फेरीवाले दिवसरात्र इतकी आरडाओरड करीत असतां कीं शहराला क्षणभरसुद्धां शांतता लाभत नाहीं. तुमच्या ओरडण्यानं सारा गांव त्रस्त झाला आहे.

फेरीवाला——हा आरोप आमच्यावरच कां ? शहरांत ग्रामोफोन आणि बायका इतक्या आहेत कीं त्यांच्यापेक्षां आमची ओरड खास मोठी नाहीं.

कोर्ट——आतां तुझं उत्पन्न सांग, म्हणजे त्या मानानं तुला दंड ठोकण्यास बरं पडेल.

फेरीवाला——इन्कमटॅक्सच्या भीतीमुळें मला माझं खरं उत्पन्न सांगतां येत नाहीं. पण एक गोष्ट खरी कीं, गांवांत बेकारी फार असल्यामुळें चणेकुरमुऱ्याचा धंदा सध्यां तेजींत आहे. मुंबईतील शेंकडों लोक या अन्नावरच जगतात. सरकारनं अशीच बेकारी चालू ठेवावी, अशी माझी विनंति आहे.

कोर्ट——केवळ चणेकुरमुरे विकूनच तूं एवढा गब्बर झालास तर !

फेरीवाला——होय. कधीं कधीं भेळ, चिक्की हेहि पदार्थ विकीत असतों.

कोर्ट——शीः शीः, भेळ आणि चिक्की असले घाणेरडे पदार्थ तूं कां विकतोस ?

फेरीवाला——कारण बायकांना या वस्तु फार आवडतात. आपल्या शेजारीं बसलेल्या सेविकाच पहा ! मघापासून मिटक्या मारीत चिक्की खात आहेत——

सेविका (कोर्टाच्या कानांत)——हा कोर्टाचा अपमान होत आहे.

कोर्ट--मुळींच नाहीं. चिक्की व भेळ खाणें हा बायकांचा जन्मसिद्ध हक्क आहे. आणि त्याबद्दल कोर्टाला कांहींच वाटत नाहीं. खुद्द कोर्टाची धर्मपत्नीसुद्धां दिवसभर असलंच कांहींतरी खात असते.

फेरीवाला--खरंच, सरकार, चौपाटीवर येऊन बघा. मोठमोठ्यांच्या बायका येऊन अत्यंत घाणेरडी चटणी व गलिच्छ भेळ खातात व एकमेकींच्या पदराला हात पुसतात. विशेषतः गरोदर स्त्रिया--

सेविका (कोर्टाच्या कानांत)--याला जास्त दंड ठोका.

कोर्ट--ए फेरीवाल्या, तुला जास्त दंड ठोकणें जरूर आहे. बायका वाटेल तें खातात म्हणून वाटेल तो माल तुम्हीं विकावयास ठेवणें योग्य नव्हे. भेळ ही आरोग्याला हानिकारक आणि ब्रह्मचर्याला विघातक अशी वस्तु आहे.

सेविका (कोर्टाच्या कानांत)--मला चिक्कीनं मळमळूं लागलं आहे.

कोर्ट--ऐकलंस, फेरीवाल्या, तुम्हा फेरीवाल्यांची चिक्की खाऊन सेविकेलाहि मळमळूं लागलं आहे. तुझे हे सगळे गुन्हे लक्षांत घेऊन आज तुला मी साडेतीन रुपये दंड करीत आहें. एवढी रोख रक्कम जर तुझ्याकडे नसेल तर तेवढ्याची चिक्की या सेविकांना देऊन टाक.

(फेरीवाला सेविकेला चिक्की आणि कोर्टाला चणे देतो. सेविका खूष होऊन झिंजोटी रागांत ' वंदे मातरम् ' गीत म्हणतात.)

पतिता ४

[नुकतेंच जन्मलेलें मूल रस्त्यांत टाकून दिल्याच्या आरोपावरून एका तरुण कुमारिकेला आज भंपक न्यायालयापुढें खेचण्यांत आलें आहे. त्या दुःखी स्त्रीच्या रम्य वदनाकडे पाहत न्यायमूर्ति सुस्कारे टाकीत बसले आहेत. न्यायमूर्तींच्या आसपास बसलेल्या दोन सेविकांना आज फार उकडत असल्यामुळें त्या पदरानें वारा घेत न्यायमूर्तींना सल्ला देत आहेत.]

कोर्ट—हे दुर्दैवी स्त्रिये, इतक्या लहान वयांत तुला हें मूल झालं तरी कसें ?

सेविका (कोर्टाच्या कानांत)—अहो, वीस वर्षांची घोडी आहे ती ! आणि तिला तुम्ही लहान म्हणतां ?

कोर्ट (सेविकेकडे दुर्लक्ष करून)—हे मातृदेवते, बोल. रडूं नकोस, लाजूं नकोस. मूल झालेल्या बाईनें फार लाजूं नये.

सेविका (कोर्टाच्या कानांत)—अहो, मूल झालें आहे म्हणूनच ती लाजत आहे.

कोर्ट—हे चंद्रवदने, तूं बोलत कां नाहींस ? गांधींप्रमाणें तूं मौन पाळूं लागलीस तर हा खटला मीं चालवावा कसा ? बोल. लग्नापूर्वी तुला मूल कसं झालं ? माझ्या बायकोला लग्न होऊनहि मूल होत नाहीं, आणि तुला लग्न न करतांहि—

सेविका (कोर्टाच्या कानांत)—मला वाटतं कोर्ट घसरत आहे.

कोर्ट—मुळींच नाहीं. कोर्ट आज पूर्ण शुद्धींत आहे. हं सांग ग, पतिते, मूल झाल्याबद्दल माझं कांहीं म्हणणं नाहीं. पण तें मूल तूं मारून कां टाकलंस ? मुलाचा जीव घेतेस ? जीव घ्यायला मूल म्हणजे कांहीं नवरा नव्हे ! बोल, पोर कां मारलंस ?

पतिता—बाप सांपडत नाहीं म्हणून !

कोर्ट—आश्चर्य आहे. बाप सांपडत नाहीं म्हणजे काय ? खरा बाप सांपडत नसेल तर कुणाच्या तरी गळीं कां पडत नाहींस ?

पतिता—तसं भलत्याच्याच गळीं पडायला मी सुशिक्षित स्त्री नाहीं, कीं सेविका नाहीं.

सेविका (कोर्टाच्या कानांत)—हा कोर्टाचा अपमान होत आहे.

कोर्ट--ऐकलंस काय ग, पतिते, हा कोर्टाचा अपमान होत आहे. थोडंसं खोटं बोललीस तरी चालेल, पण खरं बोलून कोर्टाचा अपमान करूं नकोस.

पतिता--जी सरकार.

कोर्ट--हें बघ, तुला मी आतां कडक शिक्षा देणार. तुझ्यावर नुकतंच जन्मलेलं पोर मारून टाकल्याचा आरोप आहे. पोराच्या गळ्याला नख लावून तूं त्याचा खून केला असल्यामुळें ही हिंसा झाली आहे. तुला अहिंसात्मक खून करतां आला नसता कां ?

पतिता--अहिंसात्मक म्हणजे ?

कोर्ट--अहिंसात्मक खून माहित नाहीं तुला ? आश्चर्य आहे. अहिंसात्मक खून म्हणजे रक्तपात न करतां पाडलेला मुडदा. तुला तुझ्या पोराचा असा मुडदा पाडता आला असता.

पतिता--मला येवढें ज्ञान कुठून असणार !

कोर्ट--तुला हें ज्ञान असणं आवश्यक आहे. तूं पोराच्या गळ्याला नख न लावतां रक्तपातशून्य खून केला असतास तर तुला मी आज सोडून दिलं असतं; पण तसं करण्याचं सोडून तूं हिंसात्मक खून केला असल्यामुळं तुझ्यावर मला दया करतां येत नाहीं.

पतिता--नका, सरकार, इतके कठोर होऊं नका. एका बदमाष तरुणानं मला फसविलं. लग्न करतों म्हणून अगोदर वचन दिलें आणि शेवटीं असा घात केला.

कोर्ट--यांत विशेष असं काय झालं ? सुंदर स्त्रियांना लग्नाचं वचन देऊन फसवणं ही पुरुषांच्या बाबतींत सामान्य गोष्ट आहे. मी सुद्धां तरुणपणीं अनेक स्त्रियांना फसविलं आहे.

सेविका (कोर्टाच्या कानांत)--अहो, काय बोलतां हें? कोर्टानं नेहमीं आपलं वजन ठेवलं पाहिजे.

कोर्ट--हे पतित स्त्रिये, आतां मला हें सांग, तुला मूल झालं कसं? तुला संततिनियमनाचं ज्ञान नाहीं काय? म्हणूनच तुझ्यावर ही आज आपत्ति ओढवली; भानगड करणाऱ्या स्त्रीला संतति-नियमनाचं ज्ञान असणं आवश्यक आहे. या सेविकाच पहा--

सेविका (कोर्टाच्या कानांत)--अहो, हें काय बोलतां? इतकें घसरूं नये.

कोर्ट--बरं तर! आतां हें पहा, पतिते, तुला माझा दुसरा सवाल आहे. संततिनियमनाचं ज्ञान नसेल तर तूं ब्रह्मचर्य कां पाळीत नाहींस? एवढी वीस वर्षांची घोडी झालीस तरी तुला ब्रह्मचर्य पाळतां येऊं नये!

पतिता--वीस वर्षांची झालें म्हणूनच ब्रह्मचर्य पाळतां येत नाहीं. वाढत्या वयाबरोबर ब्रह्मचर्य पाळणें कठिण होऊन बसतें.

कोर्ट--आश्चर्य आहे! या सेविका पहा. त्यांच्या वयाला तीस वर्षे झालीं तरी नैष्ठिक ब्रह्मचर्य त्या पालन करीत आहेत. तूंहि त्यांच्याप्रमाणें चळवळ करायला शीक, म्हणजे तुलाहि तसें आत्मबल प्राप्त होईल.

पतिता--यापुढें चळवळ करण्याचा मी प्रयत्न करीन.

कोर्ट--तूं इतकी मोठी झालीस तरी अविवाहित कशी राहिलीस? लग्न कां करीत नाहींस तूं?

पतिता--आमच्या चाळींत सगळे सभ्य लोक आहेत. त्यामुळें लग्नच जमत नाहीं. शेवटीं कंटाळून दुसऱ्याच एका चाळींतल्या तरुणाची ओळख करून घेतली. पण त्यानें असं फसवलं.

कोर्ट—हें फारच वाईट ! आपल्या चाळीखेरीज शहाण्या मुलीनें दुसरीकडे भानगड करूं नये.

पतिता—यापुढें चाळींतच जमवून घेण्याचा प्रयत्न करीन.

कोर्ट—शाबास ! आतां तुला मी सौम्य शिक्षा करतों. पण त्यापूर्वी मला हें सांग, तूं एवढी बिघडलीस कशी ? तुझं शील डळमळीत होण्यास कारण कोणतें ? तूं चटोर कादंबऱ्या वाचतेस काय ?-चवचाल सिनेमा पाहातेस काय ? प्रसादहीक्षा, समाजस्वास्थ्य ?

पतिता—होय. मधून मधून मी शृंगारिक कादंबऱ्या वाचतें.

कोर्ट—हें फारच वाईट. तूं फक्त ‘ चित्रा ’ वाचीत जा. म्हणजे तुझं शील चांगल राहील. या सेविका फक्त ‘ चित्रा ’ च वाचतात. म्हणून त्यांचं शील अद्याप धड आहे.

सेविका (कोर्टाच्या कानांत)—हिला जास्त शिक्षा ठोका.

कोर्ट—ऐक्लंस, पतित स्त्रिये, तुला जास्तींत जास्त शिक्षा देण्याचा मला सल्ला मिळाला आहे. म्हणून तुला मी कठोर शिक्षा सांगतों, ती ऐकून घे. तीन महिन्यांच्या आंत तूं लग्न करावंस हीच तुला मी शिक्षा देत आहें.

पतिता—कोर्टानें इतकें निर्दय होऊं नये. तीन महिन्यांत माझं कसं जमेल ?

कोर्ट—चौपाटीवर जा. मलबार हिलवर जा. पुण्यांत जा. देशसेवा कर, साहित्यसेवा कर, वाटेल तें कर; पण तीन महिन्यांच्या आंत तुला लग्न केलंच पाहिजे. तुम्हां नादान स्त्रियांना लग्नाचीच शिक्षा योग्य.

(इतक्यांत कोर्टाचें डोकें दुखूं लागल्यामुळें कोर्ट बरखास्त होतें. सेविका गंडेऱ्या खात ‘ वंदे मातरम् ’ गीत म्हणतात.)

बेकार ५

[आगगाडीखालीं पडून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून एका बेकार तरुणाला आज भंपक न्यायालयापुढें उभे करण्यांत आलें आहे. जिवावर उदार झालेल्या त्या दुर्दैवी तरुणाकडे शून्य दृष्टीनें पाहत न्यायमूर्ति उच्चासनावर विडी ओढीत बसले असून न्यायमूर्तींच्या आसपास नेहमींप्रमाणें दोन लठ्ठ सेविका पेरू खात बसल्या आहेत.]

कोर्ट—हे दुर्दैवी तरुणा, हा सोन्यासारखा जीव अग्निरथाच्या भयानक चक्राखालीं टाकून आत्मघात करण्याचा कठोर संकल्प–

सेविका (कोर्टाच्या कानांत)—अहो, सोप्या भाषेंत बोला. अगोदरच तो मरतां मरतां वांचला आहे—



कोर्ट—बोल, हतभागी तरुणा, बोल ! आत्महत्या करण्या-सारखा घोर प्रसंग तुझ्यावर कोणता ओढवला ? तुझं नुकतंच लग्न झालं आहे का ?

बेकार—नाहीं. मी बेकार आहें. बेकारीमुळें जिवाला कंटाळून मी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला.

कोर्ट—आश्चर्य आहे. केवळ बेकार आहेस म्हणून जीव देणें इष्ट नाहीं. बेकारी ही स्त्रीसारखी आहे, आज आहे, उद्यां नाहीं !

बेकार—पण उपासमारीमुळें जीव देण्यावांचून मला गत्यंतर नव्हतें. काम नाहीं, धंदा नाहीं, नोकरी नाहीं, खावयाला अन्न नाहीं.

कोर्ट—मग जीव देण्याची घाई कां केलीस ? उपासमारीनें तूं आपोआप मेला असतास. उपासमारीनें मरणें हा गुन्हा होत नाहीं. पण आत्महत्त्या करून मरणें हा कायद्याच्या दृष्टीनें गुन्हा होतो.

बेकार—विलक्षण कायदा आहे हा. जगण्याची सोय नाहीं, आणि मरण्याचीहि परवानगी नाहीं. मग आम्हीं बेकारांनीं करावें तरी काय ?

कोर्ट—करण्यासारख्या अनेक भानगडी आहेत. देशभक्ति करावी. सार्वजनिक चळवळ करावी. आजकाल बेकार लोकच मोठमोठे पुढारी झाले आहेत. आज राष्ट्राला बेकारांची जरूरी आहे. बेकार असून तूं पुढारी कसा झाला नाहींस याचें मला आश्चर्य वाटतें ! सांग, तूं पुढारी कसा झाला नाहींस ? देशभक्त कसा झाला नाहींस ?

बेकार—मी प्रामाणिक आहें. या गुणामुळेंच मला देशभक्ति करण्याची सोय उरली नाहीं.

कोर्ट—देशभक्ति जर जमत नसेल तर बेकारी घालविण्याचे

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत. बेकार

उपाय तूं कां शोधीत नाहींस ? तुझ्यासारख्या उमद्या तरुणानें असें हताश होणें हें कांहीं चांगलें नव्हे !

बेकार--मी काय करावं, सरकार ! गेलीं पांच वर्षें मी वणवण रखडत आहें. कुठेंच कामधंदा मिळत नाहीं, नोकरी मिळत नाहीं, मग बेकारी जाईल कशी ?

कोर्ट--तूं एखाद्या सिनेमा नटीशीं लग्न कां करीत नाहींस ? ताबडतोब बेकारी जाईल. बेकारीवर हा रामबाण उपाय आहे.

बेकार--छे ! नुसत्या कल्पनेनेंच जिवाचा थरकांप होत आहे माझ्या ! सिनेमा-नटीशीं लग्न करीन तर पुनः आत्महत्याच करण्याचा प्रसंग येईल माझ्यावर !

कोर्ट--सिनेमा-नटीची भीति वाटत असेल तर दुसरी एखादी श्रीमंत बाई बघ. निदान एखाद्या सेविकेशीं लग्न कर.

सेविका (कोर्टाच्या कानांत)--अहो, काय बोलतां हें ?

कोर्ट (सेविकेकडे दुर्लक्ष करून)--ऐकलंस काय मीं सांगतों तें ? हं दचकूं नकोस, लाजूं नकोस. आजकाल लग्न हा सुद्धां बेकारी-वर एक उपाय आहे. सेविका, मास्तरीण, डॉक्टरीण, नर्स अशा धंदेवाईक स्त्रियांशीं लग्न लावल्याशिवाय पुरुषांची बेकारी नष्ट होईल असें मला वाटत नाहीं. साहेबांकडे अर्ज पाठविण्यापेक्षां एखाद्या बाईकडे प्रेमपत्र पाठविलं तर जास्त काम होईल तुझं.

बेकार--सरकारच्या या उपदेशाबद्दल मी अत्यंत आभारी आहें. यापुढें कोर्टाचा हा सल्ला ध्यानांत घेऊन कुठें तरी जुळवून घेण्याचा प्रयत्न करीन.

कोर्ट--शाबास ! असा शहाणा हो ! तरुणांनीं नेहमीं धीर धरला पाहिजे. शिवाय, दुसरीहि गोष्ट तुला सांगून ठेवतों. कित्येकांना

नोकरी असल्यामुळें बायको मिळते; तर कित्येकांना बायको असल्यामुळें नोकरी मिळते. माझंच पाहा. मी तुझ्याप्रमाणेंच बेकार होतों. पण बायकोच्या वशिल्यामुळें आज मी न्यायमूर्ती झालों आहें !

सेविका (कोर्टाच्या कानांत)--मला वाटतं कोर्ट घसरत आहे.

कोर्ट--मुळींच नाहीं. कोर्ट पूर्ण शुद्धींत असून स्वानुभवाचे बोल बोलत आहे.

बेकार--याबद्दल कोर्टाचा मी आभारी आहें. कोर्टाचा हा सल्ला मला मार्गदर्शक होईल अशी मी आशा करतों.

कोर्ट--म्हणून तुला मी आतां सोडून देईन असें समजूं नकोस. आत्महत्या करण्याचा प्रयत्न करून तूं भयंकर स्वरूपाचा गुन्हा केला आहेस. कायद्याच्या दृष्टींनें तुला कडक शिक्षा देणें मला भाग आहे. तूं आईबापांच्या मर्जीनें जन्माला आला असलास तरी तुझ्या जिवावर सरकारची मालकी आहे. कायद्याप्रमाणें वाटेल तेव्हां तुला मरतां येत नाहीं.

बेकार--सरकारनें माझ्यावर दया करावी. आत्महत्त्या करण्याचा माझा हा पहिलाच प्रयत्न आहे.

कोर्ट--दुसऱ्यानदा प्रयत्न करण्यास तूं जिवंतच राहिला नसतास. आगगाडी ऐन वेळीं थांबली म्हणून तूं वांचलास. हा गुन्हा चोरीसारखा नव्हे कीं, तो अनेक वेळां करतां येईल.

सेविका (कोर्टाच्या कानांत)--हा माझ्याकडे चोरून पाहत आहे मघांपासून. याला कडक शिक्षा द्या.

कोर्ट--काय रे, तूं या सभ्य सेविकेकडे चोरून पाहतोस म्हणे. तुला इथेंच लग्न जमवायला मी सांगितलें नाहीं. तुला ज्या कांहीं भानगडी करावयाच्या असतील त्या कोर्टाच्या बाहेर कर.

बेकार--चूक झाली माझी ! कोर्टानें मला सोडून दिलं तर दुसरीकडे मी खटपट करीन.

कोर्ट--नाहीं. तुला इतक्या लवकर लग्न करतां येणार नाहीं. निदान सहा महिने तरी तुझी तुरुंगांत रवानगी करणार आहें. एका अर्थी तुझ्या दृष्टीनें हें बरें आहे. तुरुंगांत सहा महिने काढल्यानंतर पुढें तुला लग्नाचें विशेष वाटणार नाहीं.

बेकार--जशी कोर्टाची मर्जी-

कोर्ट--शिवाय तुम्हां सुशिक्षित बेकार लोकांना बाहेर मोकळें ठेवणें धोक्याचें आहे. कारण बेकार लोक साहित्यसेवा फार करतात आणि एकंदर समाजाचें स्वास्थ्य बिघडवून टाकतात, अशी तक्रार आहे.

बेकार--पण मी त्यांपैकीं नाहीं. मी साहित्यसेवा करीत नाहीं; मी एक सभ्य माणूस आहें.

कोर्ट-लघुकथा, कविता, कादंबऱ्या वगैरे तूं लिहितोस कीं नाहीं ?

बेकार--नाहीं.

कोर्ट--आश्चर्य आहे. बेकार असून देशभक्त नाहींस; बेकार असून लेखक नाहींस; काय म्हणावं तुला ? तूं केवळ नालायक आहेस. लग्नाशिवाय तुझा भाग्योदय होईल असें मला वाटत नाहीं. तुझी मला दया येते. आत्महत्येच्या प्रयत्नांत तूं मेला असतास तर मी तुला शिक्षा दिली नसती. पण तूं जिवंत राहिल्यामुळें कायद्या-प्रमाणें तुला शिक्षा देणें भाग आहे.

(इतक्यांत कोर्टाला भूक लागल्यामुळें कोर्ट अल्पोपाहारासाठीं उठून जातें. सेविकेचा गळा आज पेरू खाऊन बिघडला असल्या-मुळें 'वंदे मातरम्' गीत म्हटल्याशिवाय कोर्ट बरखास्त होतें.)

भोंदू बुवा ६

[बुवाबाजीचा आश्रम थाटून नानाप्रकारच्या भानगडी केल्याच्या आरोपावरून एका रंगेल गोसावड्याला आज भंपक न्यायालयापुढें खेंचण्यांत आलें आहे. न्यायमूर्ति उच्चासनावर साधुमहाराजानें आणलेला प्रसाद खात बसले असून, न्याय-मूर्तींच्या आसपास बसलेल्या दोन सेविका तो प्रसाद न खाण्याविषयीं न्यायमूर्तींना खुणा करीत आहेत.]

कोर्ट (सेविकांच्या खुणांकडे दुर्लक्ष करून)—हे साधुपुरुषा, तूं माझ्यासाठीं आणलेला हा प्रसाद सेवन करून मी खूष झालों आहें. हा शिरा, हे पेढे, हीं केळीं–

सेविका (कोर्टाच्या कानांत)—अहो, खाण्यापिण्याच्या गोष्टी काय करतां ? खटला चालवायचा आहे ना आपल्याला ?

कोर्ट (सावध होऊन)—काय रे, ए भोंदू बुवा, हा प्रसाद कां आणलास इथें ? कोर्टाला लांच देतोस होय ? लाज नाहीं वाटत ?

बुवा—कोर्टानें इतकं गरम होऊं नये. आतां थोडंच शिल्लक उरलं आहे. सरकारनें कृपावंत होऊन हा उरलेला प्रसाद खाऊन टाकावा.

कोर्ट—बरं तर. तुझा आग्रहच असेल तर मी एवढं पुरं करतों. (केळीं उचलून तोंडांत टाकतात.)

सेविका (कोर्टाच्या कानांत)—अहो, हें काय चालवलं आहे तुम्हीं ? पुन्हां खात बसलांत ?

कोर्ट—चूप. आरोपीचं सुद्धां काय म्हणणं आहे तें कोर्टानें ऐकून घेतलं पाहिजे. शिवाय बुवा कसाहि असला तरी त्याचा प्रसाद कांहीं वाईट नाहीं.

बुवा—कोर्टाचा मी अत्यंत आभारी आहें.

कोर्ट—म्हणून तुला मी आतां सोडून देईन असें समजूं नकोस. तूं जसा मला प्रसाद दिलास, तसा मीहि आतां तुला प्रसाद देतों. तुला इथें कां पकडून आणलं हें तुला माहीत आहे ना ? तुझ्यावर भयंकर स्वरूपाचे आरोप आहेत. बोल, तूं गांवांत काय काय भानगडी केल्यास ?

बुवा—मीं स्वतः कांहीं केल्या नाहींत; उलट माझ्या आश्रमांत दुसऱ्यांनींच भानगडी केल्या.

कोर्ट—गांवांतील नवरे-लोकांची तुझ्याविरुद्ध फार ओरड आहे.

त्यांच्या बायका म्हणे रात्रंदिवस तुझ्या आश्रमांत पडून असतात. त्यामुळें त्यांना वेळेवर जेवण मिळत नाहीं.

बुवा——त्याला मी काय करूं? घरच्या बायकोला कंटाळून मी साधु झालों. पण आतां साधु झाल्यामुळें दुसऱ्यांच्या बायका मला त्रास देऊं लागल्या आहेत.

कोर्ट——आश्चर्य आहे! स्वत:च्या बायकोखेरीज दुसऱ्या बायकांनीं एखाद्या पुरुषाला त्रास देणें यापेक्षां दुर्दैवाची गोष्ट ती कोणती? ह्या इतक्या स्त्रिया तुझ्याकडे येतात तरी कशाला?

बुवा——सत्पुरुषांकडे स्त्रियांचा नैसर्गिकच ओढा असतो. स्त्रियांना सत्पुरुष फार आवडतात. म्हणजे इतर सत्पुरुष. आपला नवरा सत्पुरुष असलेला स्त्रियांना खपत नाहीं.

कोर्ट——अगदीं खरं बोललास. माझंच पहा ना! मी एवढा सज्जन माणूस आहें. पण माझ्या पत्नीला मी मुळींच आवडत नाहीं.

सेविका (कोर्टाच्या कानांत)——अहो, काय बोलतां हें? स्वत:च्या घरच्या गोष्टी कोर्टानें अशा बाहेर बोलूं नयेत. कोर्टानें नेहमीं आपलं वजन ठेवलं पाहिजे.

कोर्ट——हे साधुपुरुषा, तुझ्याबद्दल मला कीव येते. पण कायद्या-प्रमाणें तुला शिक्षा देणें मला भाग आहे. गांवांतील पुरुषांची तुझ्याविरुद्ध फार ओरड आहे. तूं म्हणे स्त्रियांबरोबर रासक्रीडा खेळतोस. महात्मा गांधींप्रमाणें स्त्रियांच्या खांद्यावर हात ठेवूनहि फिरतोस?

बुवा——सत्पुरुषांचीं हीं लक्षणें आहेत. पुत्रप्राप्तीसाठीं कित्येक स्त्रिया माझ्याकडे धांव घेत असतात.

कोर्ट—पण तुझ्या मंत्रसामर्थ्यानें कुमारिकांनाहि मुलें होऊं लागलीं म्हणून ऐकतों. तुझा मंत्रप्रभाव सौभाग्यवतींपुरताच मर्यादित असणें इष्ट नाहीं काय ?

बुवा—मी काय करूं ? माझ्या आश्रमांत स्त्रियांची पुष्कळ गर्दी जमते. मंत्र चुकून इकडचा तिकडे जाण्याचा संभव असतो.

कोर्ट—यापुढें नीट पाहून मंत्र करीत जा.

सेविका (कोर्टाच्या कानांत)–याला हद्दपारीची शिक्षा करा.

कोर्ट–गोसावड्या, तुला हद्दपारीची शिक्षा देण्याचा सल्ला मला मिळाला आहे. तुला आत्ताच्या आत्ता हें शहर सोडून चालावं लागेल. तुझ्यासारखा भामटा माणूस या सभ्य गांवांत असणें इष्ट नाहीं. पण हें शहर सोडून जातांना गांवांतील कांहीं कुरूप स्त्रियांना पळवून नेण्याची तुला सवलत देतों.

सेविका (कोर्टाच्या कानांत)––मला वाटतं कोर्ट घसरत आहे.

कोर्ट–मुळींच नाहीं. शहरस्वास्थ्याच्या दृष्टीनेंच कोर्टानें गुन्हेगाराला ही सवलत दिली आहे.

(इतक्यांत कोर्टाला ढेकूण चावल्यामुळें कोर्ट बरखास्त होतें. भोंदू बुवा कोर्टाची आरती म्हणतो.)

मराठी संघ
स्थल प्रत
नं.
ता.
ठाणें.

वेश्या ७

[सभ्य वस्तींत बिऱ्हाड थाटून गडबड करण्याच्या आरोपावरून एका लावण्यवती वारांगनेला आज भंपक न्यायालयापुढें खेंचण्यांत आलें आहे. कोर्टानें आज आपल्या अंगाभोंवतीं उपरणें गुंडाळलें असून, चष्म्याच्या भिंगांतून त्या तरुण गणिकेचें रूपसौंदर्य पाहण्यांत ते गढून गेले आहेत. कोर्टाला सल्ला देण्यासाठीं कोर्टाच्या शेजारीं बसलेल्या सेविकेला तें सहन न होऊन ती कोर्टाच्या अंगाचा सडकून एक चिमटा घेते. त्यासरशीं कोर्ट सावध होतें.]

कोर्ट--हे सौंदर्यशालिनी, इतका नट्टापट्टा करून तूं कोर्टांत कां आलीस ? कोर्टांत इतका नखरा कामाचा नाहीं. कोर्टांत नट्टापट्टा करण्याचा अधिकार फक्त सेविकांनाच आहे.

वेश्या—हें घ्या, शेठ. (कोर्टाला पानपट्टी देते. ती घेण्यासाठीं कोर्ट हात पुढें करतात.)

सेविका (कोर्टाच्या कानांत)—अहो, हें काय ? कोर्टानें एका वेश्येची पट्टी घ्यावी—

कोर्ट—त्यांत काय झालं ? नुसती पानपट्टी घेण्यांत कांहीं अनीति आहे असं मला वाटत नाहीं. त्यांतून सुंदर स्त्रियांचा अनादर करणें कोर्टाला परवडत नाहीं. (कोर्ट तो विडा उचलून तोंडांत टाकतात व मिटक्या मारीत चघळतात.)

वेश्या—माझ्या पानपट्टीचा स्वीकार केल्याबद्दल कोर्टाची मी अत्यंत आभारी आहें. आमच्याकडे ही पद्धत आहे. पान दिल्या-शिवाय पुढचं बोलणं होत नसतं.

कोर्ट—बरं तर. आतां पुढचं बोलणं करण्यास मुळींच हरकत नाहीं.

सेविका (कोर्टाच्या कानांत)—अहो, खटल्याचंच बोलणं करा हं.

कोर्ट—बोल ग, ए गणिके, तुझ्यावरच्या आरोपाबद्दल तुला काय म्हणावयाचं आहे तें सांगून टाक. हं, नीट उभी राहा. नखरा करूं नकोस. आतां खटला सुरू होत आहे. कोर्टाला पानपट्टी दिली म्हणून तुझी सुटका होणें शक्य नाहीं. कोर्ट न्यायनिष्ठुर आहे.

वेश्या—तें मी जाणून आहें, सरकार. कोर्टानें माझ्यावर दया करावी असं माझं मुळींच म्हणणं नाहीं.

कोर्ट—सभ्य वस्तींत बिऱ्हाड थाटून तेथील मंडळींना तूं उप-द्रव दिलास, असा तुझ्यावर आरोप आहे. बोल, तूं सभ्य वस्तींत कां जाऊन राहिलीस ?

TRYMBAK.

वेश्या--सभ्य लोकांच्या सोयीसाठीं! डॉक्टर, वकील, न्यायाधीश, पुढारी इत्यादि बडीबडी मंडळी माझीं गिऱ्हाइकें आहेत. हे लोक अब्रूदार असल्यामुळें वाईट वस्तींत येण्यास संकोच करतात. म्हणून मी पूर्वीची जागा बदलून कुलीन वस्तींत येऊन राहिलें. ह्या लोकांना वेश्या कसलीहि चालते. फक्त जागा मात्र चांगली पाहिजे.

कोर्ट--तरीसुद्धां तुझें हें स्थलांतर इतरांना उपद्रवकारक झालें आहे. तूं राहात असलेल्या चाळींतील भाडेकरूंनीं तुझ्याविरुद्ध ओरड चालविली आहे. तुझ्यामुळें चाळींतील कुलीन स्त्रिया बिघडण्याची भीति--

वेश्या--नाहीं, सरकार, उलट त्यांच्यामुळेंच अलीकडे मी थोडी बिघडलें आहें. मी आज जो हा नट्टापट्टा केला आहे तो तेथील कुलीन स्त्रियांचा पाहून.

सेविका (कोर्टाच्या कानांत)--हिला जास्त शिक्षा ठोका.

कोर्ट--ऐकलंस काय ग, गणिके, खरं बोलल्याबद्दल तुला जास्त शिक्षा ठोकण्याचा मला सल्ला मिळाला आहे. वेश्यांनीं आणि देशभक्तांनीं इतकं प्रामाणिक असतां कामा नये. बोल, तुझ्या गुन्ह्याबद्दल आणखी कांहीं तुला सांगायचें आहे ?

वेश्या--मला शिक्षा देतांना माझी देशसेवा आणि सामाजिक दर्जा या गोष्टींचा सरकारनें विचार करावा, अशी माझी विनंति आहे. आज माझ्यामुळेंच अनेक बहकलेले ब्रह्मचारी गांवांत शांतपणें वावरत आहेत. मी आहें म्हणूनच कित्येक घरांत संततिनियमन होऊं शकत आहे. विधुरांना आणि वृद्धांना माझ्यामुळेंच जीवन सुसह्य वाटत आहे. कित्येक आजारी आणि क्षयरोगी स्त्रियांवर त्यांच्या नवऱ्यांकडून होणारा बलात्कार माझ्यामुळें टळत आहे.

समाजयंत्र सुरळीत ठेवण्यासाठीं, स्वतःचा देह, सौंदर्य आणि तारुण्य यांची कुरबानी करणाऱ्या एका परोपकारी स्त्रीला शिक्षा देतांना--

कोर्ट (उपरण्यानें डोळे पुशीत सद्गदित स्वरांत)--बोलूं नकोस, देवी, पुढें बोलूं नकोस. तुझा त्याग आणि सेवा अलौकिक आहे यांत शंकाच नाहीं. तूं देवता आहेस, तूं--

सेविका (कोर्टाच्या कानांत)--मला वाटतं कोर्ट घसरत आहे. एका वेश्येला तुम्ही देवी म्हणून हांक मारतां ? आपल्यापुढें खटला चालू आहे. आरोपीला अशा रीतीनें चढवून ठेवूं नये. कोर्टानें नेहमीं आपलं वजन राखलं पाहिजे.

कोर्ट (सावध होऊन)--काय ग, हे बाजारबसवे, तुझी समाज-सेवा कितीहि मोठी असली तरी तूं एक वेश्या आहेस हें विसरूं नकोस. दुर्दैवी स्त्रिये, देहविक्रयाचा हा अमंगळ धंदा पत्करून तूं आपलं शील मातीमोल कां करून घेतेस ? तूं पापी आहेस. तुझं जीवन अनीतिमय आहे. तूं लग्न कां करीत नाहींस ?

वेश्या--तें कसं व्हावं, सरकार ?

कोर्ट--एखादा पोलीस-बिलीस कां गांठीत नाहींस ? तूं 'आदमी' बोलपट पाहिला नाहींस का ?

वेश्या--एकाच माणसावर प्रेम करण्यापेक्षां जास्तींत जास्त माणसांवर प्रेम करण्याचें विश्वव्यापक धोरण मला अधिक पसंत आहे. हिंदु असो, मुसलमान असो, पारशी असो, इंग्रज असो, जो जो कोणी माझ्या घरीं येईल तो माझा मित्र.

कोर्ट--एखाद्या महात्म्याच्या तोंडीं शोभेल अशीच तुझी ही दिव्य वाणी आहे. तुझ्या अंगीं इतकीं उदात्त तत्त्वं भिनलीं कशीं ?

वेश्या--देशभक्तांच्या संगतीनें, सरकार ! कित्येक देशभक्त

माझ्या घरीं फायलीसुद्धां हरवून जातात. फावल्या वेळांत मी चरख्या-वर सूत काढतें. निवडणुकीच्या वेळीं काँग्रेसलाच मतं देतें.

कोर्ट--अहाहा ! महानंदा, कान्होपात्रा, यांच्यापेक्षांहि तूं आज मला श्रेष्ठ दर्जाची वेश्या दिसत आहेस. तरीपण तूं उघड उघड वेश्याव्यवसाय करावा हें मला मुळींच पसंत नाहीं. तूं चोरून कां धंदा करीत नाहींस ?

वेश्या--मी कुलीन स्त्री नाहीं, सरकार !

सेविका (कोर्टाच्या कानांत)--हिला जास्त शिक्षा ठोका.

कोर्ट--ऐकलंस, गणिके, तुला जास्त शिक्षा देण्याविषयीं मला सल्ला मिळाला आहे. पण कोर्ट तुझ्यावर आज खूष असल्यामुळें तुला निर्दोष म्हणून सोडून देण्यांत येत आहे.

वेश्या--कोर्टाची मी अत्यंत आभारी आहें. मला पाहून कोर्टाचें हृदयपरिवर्तन झालें--

कोर्ट--पण थांब, जातांना तुझा पत्ता देऊन जा.

सेविका (कोर्टाच्या कानांत)--अहो, हें काय ? तिचा पत्ता तुम्हांला काय करायचा आहे ?

कोर्ट--नुसता पत्ता विचारण्यांत कांहीं अनीति आहे असें मला वाटत नाहीं.

वेश्या--तशी मी फार प्रसिद्ध आहें, सरकार. या कोर्टातील कोणताहि वकील माझा पत्ता आपणांस देऊं शकेल.

(इतक्यांत सेविकेला ताप आला असल्यामुळें कोर्ट बरखास्त होतें. सेविकेऐवजीं वेश्याच ‘ वंदेमातरम् ’ गीत म्हणते.)

तंगी

एका रमणीय अशा प्रभातकाळीं तूं आमच्या चाळींत राहायला आलीस.

दोन दिवसांनीं मला कळून आलं कीं, तुझं नांव तंगी. कानडी भाषेंत धाकट्या बहिणीला तंगी म्हणतात.

तुझं पाळण्यांतलं नांव दुसरं कांहींतरी असावं. पण घरच्या मंडळींत तूं तंगी या नांवानेंच प्रिय झाली असावीस.

आमच्या चाळींत सगळी महाराष्ट्रीयांची वस्ती. अशा ठिकाणीं तुझं कानडी बिऱ्हाड आलेलं पाहून चाळींतल्या लोकांना एक प्रकारचं कुतूहल वाटूं लागलं. तुझा वेष आणि थाट दक्षिणी स्त्रियांहून बराच निराळा होता. विनाकच्छ नेसलेलें रुंद कांठाचें धारवाडी लुगडें, दुतर्फा टोंचलेल्या नाकांत दोन्ही बाजूंनीं चमकणाऱ्या

चमक्या, कमरेला सोन्याचा पट्टा, पायांत चांदीचे लंघर आणि पाठीवर लांबच लांब वेणी ही तुझी कर्नाटकी वेषभूषा आमच्या मराठी नजरेला जरा विचित्र पण प्रेक्षणीय वाटूं लागली. डाव्या गालावरचा तीळ आणि गोंदलेली चिंचोळी हनुवटी यांमुळें तुझ्या सौंदर्यांत विशेषच भर पडत होती. तुझ्या गळ्यांत पुतळ्यांची माळ, वज्रटीका आणि इतर दोनचार अलंकार होते. त्यामुळें अगोदरच भरदार असणारा तुझा वक्ष प्रदेश जास्तच पुष्ट अन् उन्नत दिसे.

तुझें वय सोळासतराच्या दरम्यान घुटमळत होतें. पान खाऊन रंगलेल्या ओंठांमुळें तूं थोडीशी रंगेलच दिसस. यौवनाचा बहर तुझ्या अंगाअंगांतून रसरसत होता. तरुणांना घायाळ करणारी मादकता तुझ्या नेत्रांत होती. तुझ्याकडे माझं विशेष लक्ष वेधण्याचें कारण म्हणजे तुझें बिऱ्हाड आणि माझी खोली समोरासमोर होती. दैवयोगानें आपण दोघें अगदीं समोरासमोर येऊन पडलों होतों. तुझी खिडकी माझ्या दाराच्या समोर होती आणि माझें दार तुझ्या खिडकीच्या समोर होतें. त्यामुळें दिवसांतून अनेक वेळां एकमेकांची नजर एकमेकांवर पडे.

तुझ्या नवीन बिऱ्हाडांत इन मीन तीनच माणसें होतीं. चाळि-शीच्या बाहेर गेलेले व डोक्याला टक्कल पडलेले एक पोक्त गृहस्थ, एक ठेंगणी ठुसकी बेंगरूळ फॅशनची लठ्ठ बाई आणि तिसरी तूं तंगी ! मला पहिल्यानें वाटलें, तो गृहस्थ तुझा बाप असावा. पण मागाहून मला कळलें कीं तो तुझा काका असून ती तुझी काकी होती. आणि मागाहून मला असेंहि कळलें, कीं तीं दोघें तुझ्या लग्नाच्या खटपटींत आहेत. मग माझ्याहि मनांत विचार घोळूं लागले कीं, मींहि माझ्या लग्नाच्या खटपटींत कां असूं नये ?

तुझें जेव्हां नवीन बिऱ्हाड माझ्यासमोर आलें तेव्हां पहिल्याच दिवशीं तुझ्या खिडकीला निळा पडदा लागला. या प्रकारानें मी किंचित् अस्वस्थ झालों. पण तो पडदा केवळ शोभेला लावला होता याची मला लवकरच जाणीव झाली. हळूहळू तो पडदा बाजूला सरकूं लागला तसतसा माझा जीव खालीं पडूं लागला. ढगाचें आवरण दूर करून नीलाकाशांत जसा चंद्रमा प्रगट होतो तसा खिडकीचा पडदा दूर सारून तुझा वदनचंद्र मधून मधून डोकवूं लागे; आणि त्यासरशीं माझा हृदयसागर उचंबळून येई.

पहिल्या-पहिल्यानें तुझी नजर तिरकस, वक्र अन् चोरटी असे. तुझ्या गहिऱ्या नजरेचे खेळ मोठे गमतीचे असत. लज्जा व भीति यांनीं युक्त असा चोरटा लपंडाव तुझ्या नजरेंत दिसून येई. मान वर करून तूं सरळ माझ्याकडे कधींच पाहिलें नाहींस. घाबरलेल्या हरणीप्रमाणें तूं नेहमीं दिसायचीस! तुझ्या वयाच्या आमच्या चाळींतल्या इतर मुली कितीतरी धीट होत्या. तूंच एवढी भित्री कां असावीस, याचें मला नवल वाटूं लागलें. तुझ्याइतकी लाजाळू पोर अद्याप माझ्या पाहण्यांत नाहीं.

एक दिवस मात्र माझें नशीब उघडलें. हनुवटीवर तर्जनी ठेवून तूं गालांतल्या गालांत हंसूं लागलीस. हो! माझ्याकडेच पाहून हंसूं लागलीस. तूं हंसतांना तुझ्या गालावर हजार प्राजक्ताच्या कळ्या फुलल्याचा मला भास झाला. केवढें धैर्य दाखविलेंस तूं आज हें! आनंदानें बेहोष होऊन मीं माझ्या खोलींतूनच तुला ऐकूं जाईल इतक्यां मोठ्यानें विचारलें,

" तंगी, आज विशेष काय झालं हंसायला ? "

मला फार फार आशा होती, कीं तूं कांहीं तरी बोलणार, कांहीं

तरी सांगणार मला ! पण छे ! खिडकीचा पडदा चटकन् ओढून घेऊन एका क्षणांत तूं अदृश्य झालीस ! क्षणभर चमकून विद्युल्लता अंतर्धान पावावी तशी तूं आलीस, हंसलीस आणि गेलीस ! माझ्या जिवाला चुटपुट लागून राहिली. तंगी, किती लाजरी-- किती भित्री तूं !

हें असें परस्परांकडे मुक्या नजरेनें पाहत किती दिवस राह्यचं ! आतां एक पाऊल पुढें टाकून बोलण्याचालण्यास सुरुवात करावी असे विचार माझ्या मनांत येऊं लागले. कधीं कधीं असेंहि वाटूं लागा-यचें कीं तडक तुझ्या काकांकडे जावें अन् तुला मागणी घालावी.

तुझ्याजवळ बोलण्याचा मीं पुष्कळ प्रयत्न केला. पण तुझ्या तोंडांतून एक शब्दहि बाहेर निघेना. एकदा जिन्याच्या पायरीवर तुझ्या कमरपट्टयांतून पडलेला गुलाबी रुमाल तुला मीं उचलून दिला, पण एका शब्दानेंहि आभार न मानतां तो रुमाल घेऊन तूं पळालीस. माझ्याशीं बोलण्यांत तुला भीति किंवा लज्जा वाटत असावी असाच मीं तर्क केला. पण कांहींहि झालें तरी तुझा तो अबोला पाहून मी अधिकाधिक बेचैन होत चाललों.

तूं कां बोलत नाहींस याचा विचार करतां करतां माझ्या डोक्यांत हळूहळू प्रकाश पडूं लागला. तूं कानडी मुलगी. मराठी भाषा तुला येत नसावी. आणि मी मूर्खासारखा तुझ्याशीं मराठींत बोलत होतों. माझी मराठी बोली कर्नाटकसुंदरीला कशी आकलन व्हावी ! असा गाढवपणा करून वर मी तुलाच दोष देत होतों कीं तूं माझ्याशीं बोलत नाहींस म्हणून ! तंगी, तंगी, मला क्षमा कर !

मराठीऐवजीं राष्ट्रभाषेंत तुझ्याशीं बोलणें सुरू करावें असा मीं निश्चय केला. मोडकीतोडकी कां होईना, पण हिंदी तुला आल्या-

वांचून राहणार नाहीं अशी माझी खात्री होती. आजकाल पोरां-सोरांना सुद्धां हिंदी भाषा चांगली येते. आपली राष्ट्रभाषाच ती! राष्ट्रभाषेंत प्रियाराधन करण्याची मला संधि मिळत आहे याबद्दल मला थोडीशी धन्यताहि वाटली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं नेहमींप्रमाणें दंतमंजनाची डबी घेऊन दांत घासण्याच्या तयारींत तूं खिडकींत उभी राहिलीस त्या वेळीं मला अपूर्व अवसान चढलें. ठरल्याप्रमाणें हिंदी भाषेंत मीं सुरुवात केली,

" तंगी, तू हो मेरी लयला——मैं हूं तेरा मजनु. "

आतां तूं मला हिंदी भाषेंत कांहींतरी सांगणार या अपेक्षेनें मी जिवाचे कान करून उभा होतों. पण हाय! माझे शब्द पुरे होण्या-पूर्वीच खिडकीचा पडदा ओढून घेऊन तूं निघून गेलीस. माझ्या बोलण्याचा तुला अर्थच कळला नसावा. माझ्या साऱ्या उत्सुकतेवर पाणी पडलें. निराश होऊन मी कपाळाला हात लावून घेतला. तंगी, तुला हिंदी भाषाहि येऊं नये, हें माझें दुर्दैव नव्हे काय?

माझ्या बाबतींत आतां एकच उपाय उरला होता. मींच कानडी शिकावें, दुसरें काय! तुला मराठी, हिंदी किंवा इंग्रजी यांपैकीं एकहि भाषा येत नाहीं असें अनुभवानें मला कळून आलें. या तिन्ही भाषांत बोलून मी थकलों. तुझ्याकडून एका शब्दानेंहि मला उत्तर मिळेना! तुझ्याशीं संघटन ठेवण्यासाठीं मलाच कानडी शिकल्यावांचून गत्यंतर नव्हतें.

कानडी भाषा शिकणें म्हणजे तें एक दिव्यच होतें. यापेक्षां प्रेमभंग झालेला पत्करला, असेंहि वाटूं लागलें. पण सारासार विचार करून तुझ्यासाठीं एवढे कष्ट सहन करण्यास मी तयार झालों. प्रेम-

देवतेला प्रसन्न करून घेण्यासाठीं वाटेल तें दिव्य करायला नको का ?

एका कानडी गृहस्थाला गांठून अत्यंत परिश्रमानें मी पंधरा दिवसांत मामुली लिहिण्याबोलण्यापुरतें कानडी शिकलों. उतावळ्या नवरदेवासारखी माझी स्थिति होती. तुझ्याशीं बोलण्यासारखीं वाक्यें मीं तोंडपाठ करून ठेवलीं. कानडी भाषा येऊं लागतांच आयुष्यांत जीवनोपयोगी शिक्षण घेतल्याचा मला आनंद झाला. हवीं असलेलीं आयुधें घेऊन मी शिकारीला चाललों होतों.

तो दिवस लक्ष्मीपूजनाचा होता. या शुभ मुहूर्तावर तुझ्याशीं कानडींत बोलण्याचा निश्चय करून तूं खिडकींत दिसण्याची वाट पाहत मी उभा राहिलों. पण काय आश्चर्य ! तू माझ्या घरींच आलीस. तुझ्या हातांत करंज्या, चकल्या वगैरे पक्वान्नांनीं भरलेलें ताट होतें. दिवाळीची भेट पोंचविण्याच्या निमित्तानें तूं माझ्या खोलीवर आली होतीस. मला अपरिमित आनंद झाला. तुझ्या हातांतून ताट काढून घेतांना माझा हात तुझ्या हाताला लागला. त्या क्षणैक स्पर्शानें एखाद्या नाजूक वेलीप्रमाणें तूं थरथर कांपूं लागलीस.

कानडींत बोलून तुला चकित करण्यासाठीं मीं म्हटलें,

" तंगी, इष्टु नाचिके याके ? ओंदु मातु नाडू ! " (तंगी, अशी लाजतेस कां ? एक शब्द तरी बोल.)

आतां संभाषणाला रंग चढेल या मनोराज्यांत मी गर्क होतों. पण रामा शिवा गोविंदा ! मान खालीं घालून तूं अचल उभी राहिलीस. तुझे अधर थरथरत होते. बोलण्याची तुझी इच्छा होती, पण तोंडांतून शब्द बाहेर पडत नव्हते.

'भिऊं नकोस' म्हणून तुला मीं परोपरीनें धीर दिला. तुझा हात

हातांत घेतला. तरीसुद्धां एक शब्दहि तुझ्या मुखावाटें बाहेर येईना! लग्न होईपर्यंत नवऱ्याजवळ बोलायचें नाहीं असा तुझा विचार असावा. जाऊं दे. लग्नानंतर तरी तूं बोलशील म्हणून तुझा हात मीं सोडून दिला.

तूं पळून जाणार होतीस, पण तुला मीं पुन्हां पकडलें! तूं आणलेल्या ताटांतील एक करंजी काढून मीं ती तुझ्या तोंडांत टाकली! लग्नापूर्वी असा घांस देणें बरें का? पण हा विवेक तरुण-पणीं कुठें सुचतो! आयुष्यांत इतका उल्लूपणा माझ्या हातून कधींच घडला नाहीं! पदरानें तोंड पुसून घेऊन तूं धांवत गेलीस आणि पुढें दोन दिवस माझ्या नजरेसहि पडली नाहींस!

* * *

तुझं आणि माझं लग्न झालं! आज त्या गोष्टीला तीन वर्षे झालीं आहेत. या तीन वर्षांत एकदां सुद्धां तूं माझ्याशीं बोलली नाहींस. तूं बोलूंच शकत नाहींत. लग्नानंतर मला कळून आलं कीं, तूं मुकी आहेस म्हणून! मला याबद्दल विशेष वाईट वाटत नाहीं. वाईट वाटतें तें विनाकारण मी कानडी शिकल्याबद्दल! मुकी बायको मिळाली म्हणून मी कुढत नाहीं किंवा रडत नाहीं. उलट मी फार सुखी आहें. 'हें आणा तें आणा' म्हणून तूं कधींच मला छळूं शकत नाहींस. तुझं आणि माझं कधींच भांडण होत नाहीं. तुझा-माझा संसार कसा मूक चित्रपटाप्रमाणें चालला आहे!

परमेश्वरानें तुला वाचा दिली नसली तरी तुझे डोळे बोलूं शकतात. तुझ्या डोळ्यांची भाषा मी जाणतों. तुला पाहिजे नको ते तुझे डोळेच मला सांगतात. तुझे डोळे रडतात, तुझे डोळे हंसतात, तुझे डोळे बोलतात. किती अपूर्व तेजानें चमकतात ते!

गेल्या आठवड्यांत पहिल्या बाळंतपणासाठीं तूं मंगळूरला माहेरीं निघून गेलीस. जातांना तुझे डोळे भरून आले होते. ते डोळे मला म्हणाले, ' पत्र धाडा हं खुशालीचं ! ' किती वेडी तूं तंगी ! तुला वाचतां येत नाहीं, बोलतां येत नाहीं, आणि म्हणे पत्र धाडा ! तरी तुझ्या समाधानासाठीं हें भारूड लिहिलें आहे. पण उगीच आपलें नवऱ्याचें पत्र आलें आहे एवढें समाधान तुला लाभावें म्हणून हें मुद्दाम लिहून पाठवीत आहें.

...ालय ...
रा. क्र. ९८(?)
... शाखा (स्थळ प्रत)

वयांत येतांना

(१)

[टिकोजीराव व ठकीबाई. स्थळ:–सैंपाकघर. वेळ–जेवणाची.]

ठकीबाई––आपला गंपू सध्यां सुकत चालला आहे. काय होतंय् पोराला कळत नाहीं.

टिकोजीराव––वयांत आला आहे नाहीं का तो ? वयांत आल्यावर पोरं वाळायचींच ! त्यांतून मुंबईची हवा वाईट !

ठकीबाई––त्याला डाग्दरकडे तरी नेऊन दाखवा. टानिक-बिनिक तरी देईल.

टिकोजीराव—डॉक्टर काय करील त्याला कपाळ ! त्याला कसला रोग झाला आहे म्हणून डॉक्टरकडे नेऊं ? अग, तूं एवढी

मूर्ख कशी ? वयपरत्वें तो सुकला आहे, हळू हळू बरा होईल. तुलाच गंपूची काळजी आहे, आणि मला नाहीं ?

ठकीबाई—जळ्ळी मेली तुमची काळजी ! उगीच नांवाला बाप झालां आहांत ! एकुलता एक मुलगा देवानं आपल्याला दिला. तो व्हावा म्हणून आपण किती कष्ट केले, किती नवस केले ! पोराची कांहीं माया आहे का ?

टिकोजीराव—हं, रडूं नकोस, दिवाळीचे दिवस आहेत. हटकून सणाच्या वेळीं तुझी रड असावयाचीच. हिंदुधर्माचा कांहीं अभिमान आहे का तुला ? जिकडे तिकडे दिवाळी चालली आहे आणि तुझा इकडे शिमगा !

ठकीबाई--कसली दिवाळी नी कसलं काय ? आपली दिवाळी तरुणपणीं झाली. आतां ह्या वयांत कांहीं करण्यासारखं उरलं आहे का ? ह्या करंज्या, हे लाडू, काय तुम्ही आणि मी खायचे ? माझ्या गंपूसाठीं सगळं करतें मी ! पण पोरगा कश्शाला शिवत नाहीं. कांहींहि दिलं तर ' नको नको ' म्हणतो ! त्याची रुचीच बिघडलेली दिसते.

टिकोजीराव--बिघडणारच ! वयांत आला आहे नाहीं का तो ? तो काय आतां लहान मूल आहे कडबोळ्या खायला ? वयांत आल्यानंतर साहजिकच खाण्यापिण्यावरचं लक्ष कमी होतं. ही अवस्थाच मोठी विचित्र आहे. ह्या वयांत कांहीं सुचत नाहीं, कांहीं रुचत नाहीं.

ठकीबाई--गेले सहा महिने त्याला मी अंडीं अन् दूध देऊन पाहिलं. सांजसकाळीं बदाम वाटून दिले. पण हा आपला अंगानें

भरण्याऐवजीं जास्तच रोडावत चालला. त्याला आतां काडलिवर देऊन पहावं गडे !

टिकोजीराव--कपाळ तुझं ! कॉडलिव्हरचा त्याच्यावर कांहींएक परिणाम होणार नाहीं. वयांत आलेला पोरगा तो ! कॉडलिव्हर देण्यापेक्षां त्याला बायको दिलेली बरी. कॉडलिव्हरपेक्षां बायकोनेंच त्याला अधिक गुण येईल. पत्नी हीच गंपूला टॉनिक !

ठकीबाई--मग त्याचं लगीन तरी करून टाका.

टिकोजीराव--मुलगी पाहून ठेवली आहेस का पण ? म्हणे त्याचं लगीन करा ! तीन वर्षे मॅट्रिकला गोते खात आहे, ह्या कारट्याला पोरगी कोण देईल ?

ठकीबाई--हल्लीं त्याचं कशावरच चित्त नाहीं. अभ्यासाकडेहि लक्ष नाहीं.

टिकोजीराव-- लक्ष नसणारच. वयांत आला आहे नाहीं का तो ! लहानपणीं मुलें कशीं पटापट पास होतात ! पण तींच पुढं वयांत आल्यानंतर नापास होतात. मग अभ्यासापेक्षां पोरीबाळीं-कडेच जास्त लक्ष जातं !

ठकीबाई—मग आतां मी काय करूं ?

टिकोजीराव--माझं पान वाढ अगोदर. मी सैंपाकघरांत आलों आहें तो जेवायला; तुझी वटवट ऐकून घ्यावयाला नव्हे. आणि यापुढें गंपूची कोणतीहि गोष्ट मला सांगूं नकोस. वयपरत्वें तो सुकला आहे. वयपरत्वें भरून निघेल. निसर्गाच्या या घडामोडी आहेत. त्याला मी त्याचा बाप झालों म्हणून काय करणार ? हं, अशी कमरेवर हात ठेवून काय उभी राहिलीस ? झटपट पान वाढ माझं !

ठकीबाई--देवा देवा ! मुलगा तसा आणि नवरा असा !

(२)

[भंपकराव व भामिनीबाई. स्थळ–एकांत. वेळ–झोंपण्याची.]

भामिनीबाई––आपली चंपू दिवसेंदिवस वाळत चालली आहे. काय होतंय पोरीला कळत नाहीं.

भंपकराव––वयांत आली आहे नाहीं का ती ! वयांत आल्यानंतर प्रकृति ढांसळायचीच ! त्यांतून मुंबईची हवा पोरीसोरींना वाईटच !

भामिनीबाई––मुळांतच देखणी ती ! लोकांची नजर लागल्यावांचून कशी राहील ? त्याशिवाय ती इतकी सुकायची नाहीं. कुणा मेल्याची दृष्ट लागली कुणास ठाऊक ! सोन्यासारखी मुलगी–

भंपकराव––तूंच तिला नट्टापट्टा करवून चौपाटीवर हिंडावयास पाठवतेस आणि दृष्ट लागली म्हणून ओरड करतेस.

भामिनीबाई––रोज संध्याकाळीं फिरून आल्यानंतर तिची मी मीठमिरच्यांनीं दृष्ट काढतें.

भंपकराव––केवढी ही सामानाची नासाडी ! तेवढंच मीठ सैंपाकाला उपयोगी पडलं नसतं का ? मी बाजारांतून मीठमिरच्या आणतों त्या तुला चंपूवरून ओंवाळायला नव्हे !

भामिनीबाई––तिला बेचाळीस वनस्पतींचा काढा द्यावा गडे !

भंपकराव––कपाळ तुझं ! उद्यां बाळंत काढा द्या म्हणशील. असा काढा अन् द्राक्षासव घेऊन तिच्यावर कांहींएक परिणाम होणार नाहीं. यापेक्षां पावडरचे दोन डबे तिच्यासाठीं जास्त आणीन.

भामिनीबाई--पूर्वी ती हंसायची अन् खिदळायची ! नाचायची अन् हुदडायची ! आतां आपल्याच विचारांत सदान्कदां गढून बसलेली असते.

भंपकराव--बसणारच ! वयांत आलेली मुलगी ती ! ती आतां परकरांतून साडींत आली आहे ! ती पूर्वीसारखी कशी हंसणार अन् खिदळणार ! एखाद्याकडे पाहून लाजायचे दिवस हे ! मुरडायचे दिवस हे !

भामिनीबाई--खाण्यापिण्याकडे सुद्धां तिचं लक्ष नाहीं. तिच्या मनांत आहे तरी काय ?

भंपकराव--नवरा ! वयांत आलेल्या मुलीच्या मनांत आणखी काय असणार ! त्या त्या वयांत ते ते विचार !

भामिनीबाई--मग तिचें लगीन तरी करून टाका.

भंपकराव--हुंडा आहे का जवळ ? तीन वर्षे ती चौथींत धक्के खात आहे. या कार्टीला नवरा कोण देईल ? आतां तिनेंच एखादा गाढव शोधून काढावा !

भामिनीबाई--खरंच, हल्लीं अभ्यासाकडे तिचं लक्षच नाहीं मुळीं.

भंपकराव--कसं असणार ? कादंबऱ्या वाचण्याचं वय हें ! या वयांत कळूं लागतं, वळूं लागतं आणि मन तळमळूं लागतं. तारुण्याची ही पहिली अवस्था फार वाईट. याच वयांत अक्कल येते आणि याच वयांत ती जातेहि. मुलानें शाळा सोडण्याचें आणि मुलीनें पळून जाण्याचें हेंच वय. कविता करण्याचें हेंच वय आणि प्रेमभंग होण्याचेंहि हेंच वय. या वयांत खाल्लेलें अन्न अंगाला लागत नाहीं. तुझी लाडकी कन्या सध्यां याच नाजूक अवस्थेंत आहे.

भामिनीबाई--मग तिला मी आतां करूं तरी काय ?

भंपकराव--तूं तिला कांहीं करूं नकोस. ती आपोआप बरी होईल. आणि यापुढें तिची माझ्याजवळ गोष्ट काढूं नकोस. वयपरत्वें ती सुकली आहे. आतां तूं हा दिवा काढ आणि झोंपीं जा. मी इथें आलों आहें तो झोंपायला. तुझ्या तोंडाला लागण्यासाठीं नव्हे ! दिवाळीच्या दिवसांत तुझे लाड नकोत !

भामिनीबाई--देवा, देवा ! मुलगी तशी आणि नवरा असा !

(३)

[गंपू व चंपू. स्थळ : चौपाटी. वेळ : हवा खाण्याची.]

गंपू (स्वगत)--माझ्या डाव्या बाजूला बसलेली सुंदरी कोण बरें असावी !

चंपू (स्वगत)--माझ्या उजव्या बाजूला बसलेला सुंदर कोण बरें असावा !

गंपू (स्वगत)--घराणं खानदानी दिसतं. चेहराच सांगतो तिचा !

चंपू (स्वगत)--मुलगा थोरामोठ्याचा दिसतो. रुबाबच सांगतो त्याचा !

गंपू (स्वगत)--हिला पाहिल्यावर मला असं कसंसंच कां वाटावं ? छे ! तिच्याकडे न पाहिल्यासारखं करावं ! नाहींतर ती मला पागल म्हणेल.

चंपू (स्वगत)––वेड तर लागलं नाहीं मला ? छे, हें बरं नाहीं. त्याच्याकडे न पाहिल्यासारखं करावं ! नाहींतर तो मला निर्लज्ज म्हणेल.

गंपू (स्वगत)––पण हळूच चोरून पाहायला काय जातं ? मीं चोरून पाहिलं तर तिला कळणार थोडंच !

चंपू (स्वगत)––मीं तिरप्या नजरेनें पाहिलं तर तें त्याला समजणार थोडंच !

गंपू (स्वगत)––अहाहा ! अस्मानी पातळांत ती किती खुलून दिसते !

चंपू (स्वगत)––अहाहा ! काश्मिरी सुटांत तो किती शोभून दिसतो !

गंपू (स्वगत)––अरेरे ! तिनें आतां गंडेरीवाल्याला हांक मारली ! मी गंडेरीवाला असतों तर– ?

चंपू (स्वगत)––तो आतां काकडी खात बसला आहे. मी काकडी असतें तर– ?

गंपू (स्वगत)––हिला छोटा भाऊ नसावा ! हिला भाऊ असता तर काय गंमत झाली असती !

चंपू (स्वगत)–मला धाकटा भाऊ नसावा ना ! वयांत आलेल्या मुलीला धाकटा भाऊ असणें किती जरुरीचें आहे हें मला आत्तां कळून आलें !

गंपू (स्वगत)––फुकट जन्म माझा ! कुणाच्या नशिबांत ही देवता लिहिली आहे कुणास ठाऊक ! (सुस्कारा सोडतो.)

चंपू (स्वगत)––व्यर्थ जन्म माझा ! माझ्या ललाटांत कुठला

डोंबकावळा ठेवला आहे कुणास ठाऊक ! असला देवपुरुष मला कुठला लाभायचा ! (सुस्कारा सोडते.)

गंपू (स्वगत)——उगीच वाटेवरच्या पोरींना पाहून जिवाचे हाल करून घेणें बरें नाहीं. अशा पोरी येतात किती, जातात किती!

चंपू (स्वगत)——उगीच रस्त्यावरच्या तरुणांना पाहून जिवाची तगमग करून घेणें बरं नाहीं. असे पुरुष येतात किती, जातात किती!

गंपू (स्वगत)——त्यांतून बरीच शिकलेली दिसते ती. बहुतेक कॉलेजमध्यें जात असावी. आणि मी तर अद्याप मॅट्रिकमध्येंच गोते खात आहें. किती अंतर दोघांत !

चंपू (स्वगत)——बराच सुशिक्षित दिसतो. चेहऱ्यावर विद्वत्तेचें तेज तरी किती विलसत आहे ! बहुतेक बी. ए.ची टर्म भरीत असावा. आणि मी अजून चौथींतच धक्के खात बसलें आहें ! शी बाई ! किती अंतर दोघांत !

गंपू (स्वगत)——अहाहा ! वाऱ्यावर तिचा पदर कसा डौलानें फडफडत आहे ! धन्य तो पदर आणि धन्य तो सावरणारा हात !

चंपू (स्वगत)——अहाहा ! वाऱ्यावर त्याची नेकटॉय कशी लीलेनें उडत आहे ! धन्य ती नेकटॉय आणि धन्य तिला चिकटलेला गळा !

गंपू (स्वगत)——काय सुगंध सुटला आहे पण ! तिच्या वेणींतील हा वास असावा !

चंपू (स्वगत)——काय घमघमाट सुटला आहे पण ! त्याच्या हातांतील रुमालावर अत्तर शिंपडलेलं असावं !

गंपू (स्वगत)— तिच्या वेणींतील फूल जर गळून पडेल——पण हाय ! तसं कुठें व्हायचं ! (सुस्कारा सोडतो.)

चंपू (स्वगत)——त्याच्या हातांतील रुमाल जर गळून पडेल——पण हाय ! असं कधीं घडतंय ! (सुस्कारा सोडते.)

गंपू (स्वगत)——छे ! अशी वेडी आशा लावून घेण्यांत अर्थ नाहीं. श्रीमंताची मुलगी ती ! मला कुठली बसली आहे लाभायला ! आपण आतां घरीं निघून जावं. वेळहि बराच झाला. आजची हवा बस्स झाली.

चंपू (स्वगत)—छे ! भलतीच आशा उराशीं बाळगणें वेडेपणाचं आहे. थोरामोठ्याचा मुलगा तो ! मला कुठला बसला आहे माळ घालायला ! आपण आतां घरीं निघून जावं. अंधारहि पडूं लागला. आजची हवा इतकीच पुरे.

(दोघांचे सुस्कारे, उसासे ! दोघेंहि दोन विरुद्ध दिशांनीं निघून जातात.)

(४)

[आणखी पांच वर्षांनंतर. गंपू: एका हातांत मूल व दुसऱ्या हातांत बायको. चंपू: कडेवर मूल व पाठीमागें नवरा. स्थळ—गिरगांव, वेळ—फजितीची.]

गंपू (स्वगत)—हिला कुठें तरी पाहिल्यासारखं आठवतं. कुठें बरं ? हं ! ही पूर्वी चौपाटीवर यायची !

• चंपू (स्वगत)—ह्यांना कुठं तरी पाहिल्याचं आठवतं. कुठं बरं ? हं ! हे पूर्वी चौपाटीवर यायचे !

गंपू (स्वगत)—हिच्यासाठीं एके काळीं मी झुरत असें ! हिचं नांवगांवसुद्धां मला माहित नाहीं, पण उगीच मी आपला झुरायचा कारणाशिवाय ! अगदीं विनाकरण !

चंपू (स्वगत)—ह्यांच्यासाठीं एके काळीं मी कुढत असें. हे कोण कुठचे कांहीं मला माहीत नाहीं. पण उगीच आपली मी झुरायची. कांहीं देणं नाहीं नी घेणं नाहीं.

गंपू (स्वगत)—त्या वेळीं ही हाडकुळी होती. आतां बरीच फुगली आहे फुटबॉलसारखी ! ओळखायला सुद्धां येत नाहीं. काय माणसांत फरक पडतो !

चंपू (स्वगत)—त्या वेळीं हे किरकोळच होते. आतां टुण-टुणीत दिसतात व्हाइसरॉयच्या बैलासारखे ! ओळखायला सुद्धां येत नाहींत. काय माणसांत फरक पडतो !

गंपू (स्वगत)—माझ्या बायकोला पाहून हिला आतां काय वाटत असेल ?

चंपू (स्वगत)—माझ्या नवऱ्याला पाहून ह्यांना आतां काय वाटत असेल ?

गंपू (स्वगत)—जिरली असेल तिची ! माझी बायको हिच्यापेक्षां दसपटीनें सुंदर आहे.

चंपू (स्वगत)—जिरली असेल यांची. माझा नवरा शत-पटीनें देखणा आहे.

गंपू (स्वगत)—त्या गोष्टीची आठवण झाली कीं मला

आतां लाज वाटते. काय मूर्खपणा केला मीं ! हिच्याकडे पाहून मीं सुस्कारे सोडावेत ना !

चंपू (स्वगत)--त्या प्रसंगाची आठवण झाली कीं मला आतां लाज वाटते. काय वेडेपणा केला मीं ! ह्यांच्याकडे पाहून मीं उसासे टाकावेत ना !

गंपू (स्वगत)--जाऊं द्या, ती एक तारुण्यसुलभ निराशा होती. आतां माझी बायको बरी कीं मी बरा !

चंपू (स्वगत)--खरंच ! ती एक तारुण्यसुलभ निराशा होती. आतां माझा नवरा बरा कीं मी बरी !

(दोघेंहि परस्परांकडे खजील होऊन पाहतात व नजरेनें एकमेकांची माफी मागतात.)

रेडिओंतून न सांगितलेली गोष्ट

विसाव्या शतकांतील समुद्रमंथन !

मुलांनो, पुराणकाळीं देव आणि दानवांनीं समुद्रमंथन करून चौदा रत्नें काढलीं ही कथा तुम्हांपैकीं कित्येकांना माहीत असेल. त्या गोष्टीला आज युगें लोटलीं. तशा प्रकारचें समुद्रमंथन पुन्हां करण्याच्या भानगडींत त्यानंतर कोणी पडले नाहींत. पण, मुलांनों, ह्या विसाव्या शतकांत तो योग पुन्हां आला. आपले हिंदुस्थानचे लोक फारच उपद्यापी ! स्वराज्य गमावून बसल्यापासून हिंदी लोकांची अक्कल निरनिराळ्या दिशांनीं काम करूं लागली. एका कल्पक सनातनी पुढाऱ्यानें पुन्हां एकदां समुद्रमंथन करण्याची योजना पुढें मांडली व इतर पुढाऱ्यांना दुसरा उद्योग नसल्यामुळें समुद्रमंथनाच्या त्या अचाट कार्यक्रमाला सर्वांनीं टेकू दिला.

मुलांनो, मूठभर शहाण्यांना मात्र समुद्रमंथनाची कल्पना मान्य नव्हती. ते म्हणाले, “ आतां समुद्रांत कांहीं राहिलें नाहीं. डोंगर पोखरून उंदीर काढण्यासारखें हें होणार. सारे श्रम पाण्यांत जातील. त्यापेक्षां कांहींतरी भरीव कामगिरी करा.”

पण त्रिलोशेटजींना मात्र समुद्रमंथनाची योजना पूर्ण पसंत होती. समुद्रमंथनांतून सोनें निघालें तर तें आपणांस परदेशीं पाठवितां येईल, या आशेनें त्यांचा जीव आनंदानें नाचूं लागला व ते मोटारींतून महात्मा गांधींना भेटण्यास घाईघाईनें निघून गेले.

बरेच पुढारी महात्माजींभोंवतीं गोळा झाले व समुद्रमंथनाच्या बाबतींत त्यांचा सल्ला विचारूं लागले. हा और कार्यक्रम पाहून महात्मा गांधी मोठ्या पेंचांत पडले. काय बोलावें हेंच त्यांना सुचेना ! पण ऐन वेळीं गांधींना देव पावला. तो दिवस सोमवारचा होता. निरुत्तर झालेल्या महात्माजींना मौनव्रत धारण करण्यास आयतीच संधि मिळाली !

महात्माजींच्या मौनानें साऱ्या पुढाऱ्यांचा विरस झाला. पण ते निराश झाले नाहींत. कांहींतरी चळवळ केल्याशिवाय गप्प बसणें हें हिंदी पुढाऱ्यांना शोभत नाहीं असें सर्वानुमतें ठरलें व अखेर समुद्रमंथनाचा कार्यक्रम निश्चित झाला.

या निरुपद्रवी कार्यक्रमांत राजद्रोहात्मक किंवा ज्वलज्जहाल असा कांहींच प्रकार नसल्यामुळें सर्व पक्षाचे लोक त्यांत सामील झाले. आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, कोणत्याच चळवळींत न पडणारे संस्थानिकहि समुद्रमंथनाला येऊन मिळाले !

मुलांनो, अशा रीतीनें हिंदुस्थानचे सर्व पक्ष एकवटून समुद्र-मंथनाची तयारी जोरांत चालली. समुद्रमंथनाचा तो संस्मरणीय

दिवसहि जाहीर झाला. ही अपूर्व चळवळ पाहण्यासाठीं जगाच्या तमाम विभागांतून माणसांचा पूर लोटला. या समुद्रमंथनांतून अशीं काय अद्भुत रत्नें निघणार आहेत याकडे सर्वांचें लक्ष लागून राहिलें !

आणि तो दिवस एकदांचा उजाडला. जिकडे तिकडे चौघडे वाजूं लागले. मंगलवाद्यांचा गजर सुरू झाला. समुद्रमंथनांत पुरुषांच्या बरोबरीनें स्त्रियाहि भाग घेणार होत्या, व त्यांचा उत्साह पुरुषांपेक्षां जास्त दिसून येत होता. स्त्रियांच्या या धोरणाविरुद्ध सनातनी लोकांनीं पहिल्यानें बरीच मोठी ओरड केली. पुण्याचे भालाकार म्हणाले, " स्त्रियांनीं फार झालं तर समुद्रकिनाऱ्यावर सहल करावी, पण समुद्रमंथनाचा हट्ट धरूं नये. समुद्रमंथनाचा कार्यक्रम महाबिकट. रेटारेटींत व धक्काबुक्कींत कोमलांगींचा चुराडा होण्याचाच संभव अधिक. तेव्हां आमच्या आर्यमहिलांनीं हा अट्टाहास सोडून द्यावा अशी माझी त्यांना सूचना आहे. "

मुलांनो, भालाकारांच्या या भाषणानें मुंबईच्या एका मानी महिलेला संताप आला ! पुरुष आणि त्यांतून पुणेकर; मग काय विचारतां ? महिलेनें आकाशपाताळ एक केलें ! ती म्हणाली, " भगिनींनो, पुरुषी काव्याला बळी पडूं नका. आपल्या हक्काला जागा आणि समुद्रमंथनांत पुरुषांच्या बरोबरीनें शौर्य दाखवून जीं कांहीं रत्नें येतील ती लांबवा. " महिलेच्या या जळजळीत उपदेशानें सारा स्त्रीवर्ग खडबडून उठला. शूर महिला नट्टापट्टा करून समुद्रमंथनासाठीं बाहेर पडल्या !

टिळकांच्या पुतळ्याला साक्ष ठेवून चौपाटीवर समुद्रमंथन करण्याचा बेत नक्की झाला. क्रिकेटच्या खेळाप्रमाणें अकरा अकरा

जणांचे दोन पक्ष करून ते दोन्ही पक्ष समुद्राच्या पाण्यांत उतरले. कमरेपर्यंत पाणी येतांच आणखी पुढें जाण्यास स्त्रिया तयार होईनात. तेव्हां तेवढ्याच पाण्यांत मंथन करावें कीं काय याविषयीं चर्चा सुरू झाली. अखेर स्त्रीदाक्षिण्याचा विजय होऊन कमरेपर्यंत पाण्यांतच मंथन करण्याचें उभयपक्षीं ठरलें !

कळकीचा एक मोठा बांबू पाण्यांत उभा करून त्याची रवी करण्यांत आली व नळबाजारांतील सुंभाच्या रशीनें घुसळण्यास सुरुवात झाली. मुलांनो, अशा प्रकारें मंथनाला सुरुवात होतांच किनाऱ्यावर जमलेल्या लक्षावधि लोकांनीं टाळ्यांचा कडकडाट केला ! त्यामुळें मंथन करणाऱ्या स्त्री-पुरुषांना विशेषच जोर चढला. मंथन चालू असतां स्त्रिया 'यमुनाजळीं खेळूं' हें पद म्हणूं लागल्या.

या वेळीं समुद्र अगदीं खवळून गेला होता ! सोसाट्याचा वारा सुटून चौपाटीची धूळ प्रेक्षकांच्या डोळ्यांत उडत होती ! तुफानी वादळ होऊन समुद्रमंथन करीत असलेल्या दोन्ही पक्षांना जल-समाधि मिळणार कीं काय, अशी क्षणोक्षणीं भीति वाटत होती. मोठमोठ्या लाटा आकाशाला भिडून पुन्हां रसातळाला जात होत्या. किनाऱ्यावर जमलेले सारे लोक भयभीत झाले !

पण, मुलांनो, समुद्रमंथन करीत असलेल्या वीर पुरुषांनीं आणि वीर स्त्रियांनीं या प्रसंगीं धैर्य सोडलें नाहीं. खवळलेल्या सागराशीं टक्कर देऊन त्यांनीं आपला कार्यक्रम दुप्पट उत्साहानें चालू ठेवला.

बराच वेळ झाला तरी समुद्रमंथनांतून एकहि रत्न बाहेर येईना. 'आणखी प्रयत्न करा' 'जोरानें मंथन करा' अशी ओरड

प्रेक्षकसमुदायांतून ऐकूं येऊं लागली. आणि त्यासरशीं मंथनाला रंग चढला !

मुलांनो, हळुहळू एक रत्न पाण्यांतून वर येऊं लागलें. त्या वेळचा आनंद काय वर्णन करावा ! 'बोकड', 'बोकड' अशी चोहींकडून एकच ओरड झाली. त्या बोकडाचें तोंड कुरुंदवाडच्या दिशेनें होतें.

पण तो बोकड कुणाला द्यावा, याबद्दल वाद झाला. कांहींजण म्हणाले, "तो बोकड डॉ. मुंजे यांना द्यावा", तर कांहींजण म्हणाले कीं, "किंजवडेकरशास्त्र्यांनाच तो बोकड देणें रास्त होईल." अखेर हा वाद नको म्हणून बोकडाचे दोन तुकडे केले व एक तुकडा शास्त्रीबुवांना व दुसरा डॉक्टरसाहेबांना, अशी त्याची विभागणी केली.

यापुढें कोणतें रत्न येतें, याकडे लोकांचें लक्ष लागलें. आणि त्या अंदाजावरच कांहींजण जुगारसुद्धां खेळूं लागले. इतक्यांत हॉर्निमननें ओरड करून जुगाराला वेळींच आळा घातला.

मुलांनो, यानंतर समुद्रांतून '**पगडी**' आली, ती पुणेकरांना बहाल करण्यांत आली. '**फंड**' आला, पण त्या फंडाचा हिशेब बरोबर होईना ! तेव्हां तो फंड पुणेकरांनाच देऊन टाकला.

सोनें केव्हां येतें याची वाट पाहत बिर्ला किनाऱ्यावर उभे होते. पण सोनें कांहीं येईना. सोन्याऐवजीं सोन्यासारखी एक '**नटी**' मात्र वर आली. पाण्यांतून नटी येतांच फिल्म कंपनीवाल्यांच्या तोंडाला पाणी सुटलें ! ताडदेववरचे एक डझन डायरेक्टर त्या नटीला एकमुखानें मागणी घालूं लागले. पण ती नटी बाबूराव पेंढारकर यांच्या ताब्यांत गेली !

त्यानंतर समुद्रमंथनांतून '**स्टोव्ह**' आला. गुजराथी स्त्रियांनीं तो स्टोव्ह हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला, पण कॉरोनर आठवले यांनीं तो लगेच काढून घेतला. त्यानंतर '**घोडा**', '**घोडा**' असे शब्द ऐकूं येऊं लागले. महालक्ष्मीकडे तोंड करून एक उमदा घोडा समुद्रांतून वर आला होता. घोडा कुणी घ्यावा, याचा कांहीं वेळ विचार झाल्यानंतर तो घोडा कोल्हापूरच्या अक्काबाईंना देण्यांत आला.

त्यानंतर समुद्रांतून '**लुंगी**' आली. ती शंकरराव देव यांना व्हाल केली. '**नीरा**' आली ती काका कालेलकरांना देण्यांत आली. '**द्रोण**' आला, तो द्रोण भालाकारांना मिळाला.

मुलांनो, समुद्रमंथनाला अशा रीतीनें रंग चढत चालला. एकामागून एक रत्नें येऊं लागलीं. '**चरखा**' महात्मा गांधींनीं घेतला, '**बुरखा**' टीकाकारांनीं घेतला, '**आरसा**' कुरूप स्त्रियांनीं घेतला. त्यानंतर एक '**मोटार**' आली. ती कामगार पुढाऱ्यांनीं पटकावली! '**कोरा चेक**' आला. त्यावर सही करण्याकरितां तो सदोबा पाटलांना दिला.

मुलांनो, शेवटीं '**अफू**' नांवाचा एक जालीम पदार्थ आला. हें विष घेण्यास कोणीच तयार होईनात! जो तो तें घेण्याचें टाळूं लागला.

इतक्यांत पार्वती नांवाच्या एका नवमतवादी मुलीशीं नुकतेंच लग्न लावलेल्या शंकर नांवाच्या तरुणानें ती अफू घेतली !

ब्रँडीची बाटली

[आर्य मदिरामंडळाची बैठक भरली आहे. ' ब्रँडीची बाटली ' या बोलपटाचें कथानक लिहिल्याबद्दल आचार्य अत्रे यांचें अभिनंदन करण्याचें काम सभेपुढें सुरू आहे. तळीराम, शास्त्रीबुवा, खुदाबक्ष, मन्याबापू मवाळ, जनुभाऊ जहाल इत्यादि सभासद हजर आहेत. बैठकीच्या मध्यभागीं आचार्य अत्रे यांचा फोटो पुष्पहारांनीं मंडित करून ठेवला आहे.]

तळीराम--शास्त्रीबुवा, आज सभेपुढें काय काय कामें आहेत तीं पुन्हां एकदां सभासदांना नीट समजावून सांगा पाहूं.

शास्त्रीबुवा--तें अशक्य आहे. कारण कोणतीहि गोष्ट समजून घेण्याच्या अवस्थेंत एकहि सभासद आतां उरला नाहीं. सर्व सभासदांना इतकी चढली आहे--

तळीराम--आश्चर्य आहे. सोडा न मिसळतांच सर्वांनीं ब्रँडी घेतलेली दिसते. शास्त्रीबुवा, आपण आतां दोघेच सभेचें काम चालवूं.

जनुभाऊ (अचानक शुद्धीवर येऊन)--ही झब्बूगिरी आहे. गांधी आणि वल्लभभाईप्रमाणें तुम्हीं दोघांनींच राजकारण करावं हें मला पसंत नाहीं. लोकशाहीचा हा खून आहे. नागरिक स्वातंत्र्या-वर हा घाला आहे. हाय कमांडचा हा अत्याचार आहे--

शास्त्रीबुवा--हं हं जनुभाऊ, जरा आवरतें घ्या. थोडीशी चढली म्हणून इतकं जहाल बनण्याचं कारण नाहीं.

तळीराम--हा जनुभाऊ नेहमीं माझ्या डाव्या बाजूला बसतो आणि स्वतःला डावा समजतो. हे जहाल लोक घेतात थोडी, पण बडबड करतात फार !

शास्त्रीबुवा--जाऊं द्या, तळीराम, आजच्या सभेचं महत्त्व लक्षांत घेऊन आपण वादविवाद कमी करावा हेंच उत्तम. आजचा प्रसंग केवढा गंभीर ! आपण आचार्य अत्रे यांचें अभिनंदन करण्यासाठीं आज खास जमलों आहोंत.

खुदाबक्ष--हा अत्रे कोण हें मला कृपा करून कळेल का ?

शास्त्रीबुवा--आश्चर्य आहे ! खुदाबक्ष, तुम्ही इतकीं वर्षें दारू पितां आणि अत्रे कोण हें माहीत नाहीं ? 'केसरी' कचेरींतला मनुष्यसुद्धां मराठी लेखकांविषयीं इतकें अज्ञान दाखवीत नसेल !

खुदाबक्ष--मला लेखकांची विशेष मातब्बरी वाटत नाहीं. दारू पिणारा कोणीहि माणूस लेखक होऊं शकतो असें माझें ठाम मत आहे. मीं स्वतः कित्येक वेळां दारू पिऊन काव्यगायन केलें आहे !

तळीराम--मला वाटतं खुदाबक्षांना वरीच चढली असावी. शास्त्रीबुवा, त्यांना आणखी थोडी पाजा, म्हणजे बडबड करण्याचें थांबून ते पट्टाभिसीतारामय्यांप्रमाणें सपशेल पडतील तरी !

खुदाबक्ष--मला पट्टाभि समजूं नका. एकदां पडलों तरी शंकरराव देवांप्रमाणें पुन्हा उठण्याची मला हिंमत आहे.

मन्याबापू--सभेचें काम कुठपर्यंत आलं आहे, हें मला कृपा करून कळेल का ? अत्र्यांच्या अभिनंदनाला माझी हरकत आहे.

तळीराम--हा कृतघ्नपणा आहे. मन्याबापू, मघांपासून तुम्ही एकसारखे ब्रँडीचेच पेग फस्त करीत आहां, आणि ब्रँडीची बाटली ज्यांनीं लिहिली त्यांचें अभिनंदन करण्यास मात्र तुम्ही तयार नाहीं ? मन्याबापू, तुमची हरकत मागें घ्या. दारू पिणाऱ्या माणसानें फार शहाणपणा दाखवूं नये.

मन्याबापू--माझं ऐकून घ्या. ‘ ब्रँडीची बाटली ’ हा बोलपट मद्यपानाच्याविरुद्ध प्रचार करणारा आहे, हें तुम्हांस माहीत आहे काय ? म्हणून मी म्हणतों, अत्र्यांचें अभिनंदन करणें मंडळाच्या ब्रीदाला धरून होणार नाहीं.

शास्त्रीबुवा--कोण म्हणतो हा बोलपट दारूच्या विरुद्ध आहे ? बोलपट दारूचा पूर्ण पुरस्कार करणारा आहे असें माझें मत आहे.

मन्याबापू--बोलपट न पाहतां त्यावर अभिप्राय देण्यास तुम्ही कांहीं संपादक नाहींत. शास्त्रीबुवा, तळीराम, आणि मंडळांतील इतर सज्जनहो, माझी कळकळीची सूचना लक्षांत घ्या. आपणां सर्वांस या वेळीं फार चढली आहे. आपल्यापैकीं कोणीहि या घटकेला शुद्धीवर नाहीं. अशा अवस्थेंत गाफीलपणें अत्र्यांचें

अभिनंदन करून मागाहून पश्चात्ताप करण्याचा फजितीचा प्रसंग आपल्यावर ओढवेल.

तळीराम—मन्याबापू, तुम्ही स्वस्थ बसा. दारुबाजांनीं आणि गांधीवाद्यांनीं फार दूरवर कधींच विचार करूं नये. अहो, फजितीचे प्रसंग कुणावर येत नाहींत ? गांधींची राजकोटमध्यें फजिती झाली, वल्लभभाईंची बडोद्यांत फाजिती झाली–

खुदाबक्ष—मंडळापुढें माझा एक सवाल आहे. ब्रँडीच्या बाटलींत काम केलेल्या नटींचें हा गुलाम अभिनंदन करूं शकतो काय ?

शास्त्रीबुवा—मुळींच नाहीं. नटींचें अभिनंदन करण्यास या मंडळाचा जोरदार विरोध आहे. खुदाबक्ष, तुम्ही आणखी एक पेला घ्याच, म्हणजे नटीविषयक भ्रामक विचार तुमच्या डोक्यांतून निघून जातील. अर्धवट घेतलेल्या माणसालाच स्त्रीचे विचार सुचत असतात.

तळीराम–शिवाय नटी आणि दारू यांत भयंकर विरोध आहे. नटी ही दारूपेक्षां जास्त खर्चिक असतेच, शिवाय दारूमुळें चार-चौघांत एकी होते ती नटीमुळें फूट पडते. अहो, दारूच्या गुत्त्यांत स्थापन झालेल्या फिल्म कंपन्या अखेर नटीच्या पायीं धुळीस मिळाल्याचीं उदाहरणें आहेत. एक एक भागीदार एक एक नटीला घेऊन फुटून निघतो--

मन्याबापू--सभेचें काम लवकर संपवावं अशी माझी मंडळाला सूचना आहे. कारण जनुभाऊंना इतकी चढली आहे कीं, त्यांनीं आपला सर्व भार माझ्यावरच टाकला आहे. त्यांचा तोल आणखी जास्त सांवरून धरणें मला अशक्य आहे. जवाहरलाल नेहरूंप्रमाणें घटकेंत या बाजूला तर घटकेंत त्या बाजूला त्यांचा तोल झुकत आहे.

तळीराम—ब्रँडीच्या बाटलीचा हा विजय म्हणतां येईल. म्हणून आपण सर्वांनीं हा श्रेष्ठ प्रतीचा बोलपट लिहिणारे नामवंत लेखक आचार्य अत्रे यांचें अभिनंदन करणें जरूर आहे. अत्रे यांच्याबद्दल मंडळाला पूर्वीपासूनच आदर वाटत आहे. मागें त्यांचें 'घराबाहेर' नाटक पाहूनच आज मंडळाचे सभासद घरदार सोडून इथें वावरत आहेत आणि आज त्यांच्या ब्रँडीच्या बाटलीमुळें मंडळाला अधिकाधिक पिण्याची उमेद वाटूं लागली आहे. मन्याबापू म्हणतात त्याप्रमाणें हा बोलपट मद्यपानाच्या विरुद्ध मुळींच नाहीं. कारण खुद्द मन्याबापूंकडेच पाहा ! ते हा बोलपट पाहून आले आहेत आणि असें असूनहि आम्हा सर्वांपेक्षां यांनींच आज जास्त घेतली आहे.

स्थळ
सं.
ता.
ठाणे.

दोन दादांची दोस्ती !

याने

हिंदु–मुस्लीम ऐक्य !

[मलबार हिलवर गांधी-जिना मुलाखत चालू असतां मदनपुऱ्यांत सखाराम गळेपडू व कासम कबाबवाला या दोन मवाल्यांचीहि मुलाखत चालू होती. सखाराम हा कामाठीपुऱ्याचा प्रसिद्ध दादा असून, कासम हा मदनपुऱ्याचा नामांकित मवाली आहे.]

सखाराम––हुल्लो, कासम !

कासम––कैंव बे साले !

सखाराम—सबूर, शिव्या द्यायच्या नाहींत आतां! मी तुझ्या घरीं मुद्दाम दोस्तीसाठीं आलों आहें.

कासम—काय म्हणतोस? मुद्दाम माझ्या घरीं आलास? मीं ठेवलेल्या बाईवर अजून तुझा डोळा आहे काय? सुंवर--

सखाराम—तोबा तोबा! काय बडबडतोस हें? मी आलों आहें ऐक्याच्या वाटाघाटीसाठीं! कांहीं सलोख्याच्या गोष्टी कर. आपण आतां भाई भाई आहोंत. (कासमच्या दाढीला हात लावतो.) कासम, कासम, तुझ्या काय मागण्या आहेत त्या चटकन् सांगून टाक.

कासम--ए पागल, तुला आज झालं आहे तरी काय? सकाळींच झोंकून आला आहेस का? लक्षांत ठेव, या मोहल्ल्यांत तुझी दादागिरी चालायची नाहीं.

सखाराम--हं, मोठ्यानें बोलूं नकोस. पोलिसबिलीस यायचे आणि आपल्या वाटाघाटी अर्ध्यावरच थांबायच्या! चल, आपण आंतल्या खोलींत जाऊन बसूं. आपल्या वाटाघाटी गुप्त ठेवल्या पाहिजेत.

कासम--आंतल्या खोलींत नको! त्या निमित्तानें माझी औरत पाहण्याचा तुझा डाव दिसतो. सखाराम, तुला मी ओळखून आहें. पण कायरे, तुला आज दोस्तीचा एवढा उमाळा कां आला?

सखाराम--तुला माहीत नाहीं? आपले गांधी तुमच्या जिनांना भेटण्यासाठीं त्यांच्या बंगल्यावर गेले आहेत.

कासम--जिना कोण?

सखाराम—हेंहि माहित नाहीं का तुला? अरे, तुमचा पुढारी! तुमचा लीडर!

(कासम विचारांत पडतो.)

कासम--असं ऐकलं होतं कुठेंतरी कीं वो हमारा लीडर आहे म्हणून.

सखाराम--तुम्ही लोक छापा वाचीत नाही. त्यामुळें तुम्हांला तुमचा लीडर कोण हें माहीत नसतें. हें बघ, आम्ही गांधींना ओळखीत नाहीं आणि तुम्ही जिनांना ओळखीत नाहीं. पण हे दोघे आज तुमच्या आणि आमच्या वतीनें बोलत बसले आहेत.

कासम—अफसोस ! अफसोस !

सखाराम--म्हणून खऱ्या दोस्तीसाठीं मी तुमच्याकडे आलों आहें. एकीचं बोलणं तुमच्यांत आणि आमच्यांत झालं पाहिजे. भांडतों तुम्ही आणि आम्ही. यांत गांधींची आणि जिनांची एकी कशाला ?

कासम—खरं आहे. दोस्तीची बातचीत तुम्हीं-आम्हीं करणें रास्त आहे. पण, सखाराम, दोस्तीसाठीं तूं आला आहेस म्हणतोस; पण कांहीं आणली आहे का बरोबर ? सध्यां बार वगैरे बंद आहेत. मोठी अडचण आहे दोस्तीला ! आपल्या वाटाघाटी फिसकटतील अशी भीति वाटते.

सखाराम—त्याची काळजी करूं नकोस ! अरे यार, वाटाघाटी फिसकटण्याची मुळींच भीति नाहीं. मी सर्व तयारीनेंच आलों आहें. (पिशवींतून बाटल्या काढतो.)

कासम--आतां पुढील बोलणं करण्यास हरकत नाहीं. पण, सखाराम, ही दारू आणलीस कुठून ? या बाजूचे सगळे गुत्ते तर बंद आहेत.

सखाराम—याला डोकं लागतं. अरे, इकडचे गुत्ते बंद झाले म्हणून आपली थोडीच गैरसोय होणार आहे? संपूर्ण दारूबंदी झाली तरी पुढाऱ्यांना आणि मवाल्यांना मुळींच अडचण भासणार नाहीं. या सखारामाला तूं ओळखत नाहींस, कासम!

कासम—पुरा ओळखतों तुला मी! त्या दिवशीं आठव्या गल्लींत तूं मला मारलेला फ़टका मी विसरलों नाहीं.

सखाराम—आणि मीहि तुझ्या सुरीचा वार विसरलों नाहीं. ही बघ अजून कपाळावर जखम आहे. साला, याद रखना, कभी ना कभी——

कासम—अरे जा, तेरे जैसे बहोत देखे है——(अंगावर चाल करून जातो.)

सखाराम—हें बघ, कासम, आपण दोस्तीसाठीं जमलों आहोंत. मारामारीच्या गोष्टी आतां कशाला? कांहीं सलोख्याची वार्ता कर. थांब, त्यापूर्वीं आपण या बाटलींतलें संपवूं! कासम, तुझ्या काय मागण्या आहेत त्या चटकन् सांगून टाक. मी फार खुशींत आहें.

कासम—माझ्या फार मागण्या नाहींत. एकच ग्लास पुरे आहे मला. सकाळच्या वेळीं मी जास्त घेत नसतों.

सखाराम—नामर्द! नादान! म्हणे एकच ग्लास पुरे! अशानें वाटाघाटी फिसकटतील, कासम. जास्त माग, जास्त माग, एकाच ग्लासानें एकी होत नसते. मुकाट्यानें जास्त घे. नाहींतर एक लाफा देईन.

कासम—बरं तर! तुझा आग्रहच असेल तर दोस्तीसाठीं दोन ग्लास घ्यायला मी तयार आहें. हिंदु-मुस्लीम ऐक्यासाठीं या वेळी तुझं मन दुखवायला मी तयार नाहीं.

सखाराम--अशी कांहींतरी शहाणपणाची भाषा कर. तूं दोन ग्लास मागतोस तर आतां मी तुला तीन ग्लास देतों. आम्ही हिंदु लोक स्वार्थत्यागाला नेहमीं उत्सुक असतों. घे, कासम, नाहीं म्हणूं नकोस.

कासम--आपल्याला अजून पुढें बरेंच बोलायचें आहे. तेव्हां आपण बेताबेतानें घेतलेली बरी.

सखाराम--डरना नहीं, कासम ! आपल्याला जास्त झाली तरी आपल्या वाटाघाटी चालूच राहतील. कासम, बोल, आणखी मागण्या आहेत तुझ्या ? यापुढें भांडायचें नाहीं आपल्याला !

कासम--फार उशीरां सांगतोस हें तूं ! आतां दोन ग्लास घेतल्यानंतर भांडूं नको म्हणण्यांत अर्थ काय ? दोन ग्लास झोंकली कीं कुठें ना कुठें तरी भांडण उकरून काढण्याचा माझा रिवाज आहे.

सखाराम--मला धमकी देऊन आणखी एक ग्लास उपटण्याचा तुझा विचार दिसतो. बरं, हा घे आणखी एक ग्लास ! याउप्पर वाटाघाटी फिसकटतील तर त्याला माझा इलाज नाहीं.

कासम--सखाराम, मला हिंदु लोकांबद्दल नेहमीं आदर वाटतो. (त्याच्या गळ्याला मिठी मारतो.)

सखाराम--तुला चढत चालली आहे याबद्दल मलाहि आनंद वाटतो. आपला समेट नक्की होईल अशी आशा करण्यास हरकत नाहीं. काय तुझ्या मागण्या आहेत त्या रीतसर माझ्यापुढें मांड. मी शुद्धीवर आहें तोंपर्यंतच त्याचा विचार केला जाईल.

कासम--माझी पहिली मागणी ही कीं, मीं ठेवलेल्या रखेलीवर तूं डोळा ठेवतां कामा नये. पण तूं ठेवलेल्या रखेलीला मधून मधून भेटण्यास मला मोकळीक असावी. कबूल ?

सखाराम—कबूल ! आम्ही हिंदु लोक स्वार्थत्याग करायला तयार असतों.

कासम—माझी दुसरी मागणी ही कीं, मोहरमच्या वेळीं आमचा सण म्हणून, आणि शिमग्याच्या वेळीं तुमचा सण म्हणून दोन्हीं वेळां तुम्हीं बक्षिसी जमवून आमच्या मोहल्ल्यांत पोंचती केली पाहिजे. कबूल ?

सखाराम—कबूल. समेट म्हटला कीं झीज सोसली पाहिजे.

कासम—माझी तिसरी अट ही कीं, मला किंवा माझ्या इतर मवालीभाईंना पोलिसांनीं पकडल्यास तुम्ही जामीन भरून आमची सोडवणूक केली पाहिजे. तुम्हांला पोलिसांनीं पकडल्यास आम्ही तुमची सोडवणूक करूं.

सखाराम—आतां बस्स ! कासम, पुढें बोलूं नकोस. या सगळ्या बाटल्या संपल्या आहेत. त्यामुळें उद्यांपर्यंत ही वाटाघाट तहकूब ठेवावी, अशी माझी सूचना आहे.

कासम—माझी कांहींच हरकत नाहीं. उद्यां बारा वाजतां परत एक डझनभर बाटल्या घेऊन ये, म्हणजे उद्यांच ही मुलाखत संपवून टाकण्यास बरें पडेल.

सखाराम—आपल्या दोघांच्याहि चेहऱ्यावर ज्या अर्थीं स्मित झळकत आहे, त्या अर्थीं आशादायक वातावरण निर्माण होत आहे असें अनुमान करण्यास हरकत नाहीं.

(दोघेहि कडकडून भेटतात.)

वर्गयुद्ध !

(CLASS STRUGGLE)

[स्थळ:–श्रीमहाकाली हायस्कूल. ४ थी इयत्ता, ' ब ' वर्ग. हेडमास्तर हातांत छडी घेऊन रागारागानें पाय आपटीत वर्गांत प्रवेश करितात.]

हेडमास्तर (दमबाजीच्या स्वरांत)—माधव विनायक सुरवंटे !

सुरवंटे (थरथर कांपत)—सर !

हेडमास्तर—असा ये ! असा पुढें ये ! तुमचं आतांपर्यंत मीं खूप चालूं दिलं. पण यापुढें मात्र मी ऐकणार नाहीं. या ' ब ' वर्गांतील सगळीं मुलें एकजात ड्यांबिस आहेत. अभ्यासाकडे लक्ष नाहीं. खोड्या करायला हव्या आहेत. ' अ ' वर्गांतल्या मुलांशीं तुम्ही नेहमीं भांडण करीत बसतां. आणि तूं, सुरवंटे––

सुरवंटे––मीं कांहीं केलं नाहीं, सर !

हेडमास्तर——कांहीं केलं नाहीं ? लाज नाहीं वाटत खोटं बोलायला ? 'अ' वर्गातल्या विसू हळदणकराची तूं टोपी उडविलीस कीं नाहीं, बोल ? आणि मनोहर आगलाव्याची शेंडी पकडून त्याला खालीं पाडलंस——

सुखंटे—पण, सर, सर–!

हेडमास्तर——पणबिण कांहीं नाहीं. छडीनें झोडपून काढल्याशिवाय तुम्ही वटणीवर यायचे नाहींत. आज किती दिवस झाले, तुमच्या दोन्ही वर्गात परस्परांशीं भांडणें चालू आहेत.

सुखंटे——पण सर, ' अ ' वर्गातील मुलांनींच अगोदर मला गुद्दा मारला——

हेडमास्तर——शट अप ! गाढव आहेस ! ' अ ' वर्गातलीं मुलें फार चांगलीं व सुस्वभावी आहेत. तुमचा ' ब ' वर्गच मोठा खोडकर आहे. कांहीं ना कांहीं खोडया करून ' अ ' वर्गातल्या मुलांचा तुम्ही छळ करीत असतां. आणि तो दुसरा कारटा कुठें आहे ? बबन सखाराम भांडकुळे–

भांडकुळे——सर !

हेडमास्तर——असा पुढें ये. छडीचा प्रसाद मिळाल्याशिवाय——

भांडकुळे——सर, मी कांहीं केलं नाहीं.

हेडमास्तर——एक नंबरचा लबाड ! हलकट ! पाजी ! ' अ ' वर्गातल्या इंदू करकरे हिच्या अंगावर तूं कागदी बाण फेंकलास म्हणे काल संध्याकाळीं ! त्यामुळें तिची वेणी विसकटली आणि तिला तापहि आला.

भांडकुळे——सर, ती पेरू खात होती एकटी एकटीच. मीं जरा मागितला तर मला दिला नाहीं.

हेडमास्तर---बेशरम कुठचा ! तिचा पेरू तुला कसा मिळेल ? भांडकुळे, तिच्या वाटेस जर तूं यापुढें जाशील तर तुला शाळेंतून काढून टाकीन. 'अ' वर्गातल्या मुलींची तुम्हीं नेहमीं टिंगल करतां अशा तक्रारी माझ्याकडे खूप आल्या आहेत. तुम्हां 'ब' वर्गातल्या मुलांच्या या बेशरम वर्तनामुळें आमच्या शाळेला लांछन लागत आहे, याची तुम्हांला कल्पना आहे काय ?

भांडकुळे---पण सर, त्या मुलीच अगोदर आमच्या खोड्या काढतात. 'अ' वर्गातल्या चिंगीनें काल सकाळीं मला खडा मारला !

हेडमास्तर---पण, तिच्या परकरावर तूं अगोदर शाई टाकलीस, होय ना ? लाज नाहीं वाटत असा चावटपणा करायला ? आज तीन वर्षे नापास होत आहेस याचं कांहीं वाटतं का तुझ्या मनाला ? बरं, तूं येथें उभा रहा. आतां तिसरा पाजी पोरगा कुठें आहे ? गंपू मारूती बोरवटे--

बोरवटे---सर !

हेडमास्तर---परवां क्रिकेटचा सामना सुरू असतां 'अ' वर्गातल्या मुलांबरोबर 'ब' वर्गातल्या सर्व मुलांनीं मारामारी केली आणि त्यांत तूं पुढाकार घेतलास ही गोष्ट खरी ना ?

बोरवटे---सर, त्यांनीं मला खोटा 'आउट' दिला आणि--

हेडमास्तर---चूप ! एक अक्षर बोलूं नकोस ! विकेट-कीपरच्या डोक्यावर तूं पहिल्यानें 'बॅट' हाणलीस आणि 'अ वर्गाचा नाश होवो', 'ब वर्गाचा विजय असो' अशा प्रकारची ओरड सुरू केलीस. बोल, हें सगळं खरं ना ? आणि तूं, सुरवंटे, तूं शंख करीत म्हणालास म्हणे कीं, " जगांतल्या सर्व 'ब' वर्गांनों, एक

व्हा !" अरे, हा कसला लढा चालविला आहे तुम्हीं ! हीं भांडणें कशासाठीं ? माझ्या डोक्यांत कांहींच प्रकाश पडत नाहीं.

भांडकुळे--सर, 'अ' वर्गाचं आणि आमचं कधींच पटायचं नाहीं. तीं मुलें फार उद्धट आहेत. आम्हां 'ब' वर्गाचा 'अ' वर्गाकडून नेहमीं अपमान होत असतो !

सुरवंटे--होय, सर ! 'अ' वर्गाचीं पोरें शिरजोर आणि उर्मट आहेत. आमचीं पुस्तकें फाडतात, दौती फोडतात--

हेडमास्तर--तुम्हां दोन वर्गांत अशी अढी असणें केव्हांहि इष्ट नाहीं. तुम्ही वर्गबंधु आहांत. गोडीगुलाबीनें व खेळीमेळीनें तुम्हीं वागण्यास शिकलें पाहिजे. यापुढें हा झगडा बंद करा.

बोरवटे--सर, आमच्या कांहीं मागण्या आहेत.

हेडमास्तर--काय मागण्या आहेत तुमच्या ?

बोरवटे--मीं लिहून आणल्या आहेत आमच्या मागण्या. वाचून दाखवूं का, सर ? माझं अक्षर तुम्हांला लागणार नाहीं म्हणून म्हणतों.

हेडमास्तर--बरं, वाचून दाखव मोठ्यानें. काय मागण्या आहेत त्या तरी पाहूं तुमच्या !

(बोरवटे खिशांतील कागद काढून वाचतो.)

'ब' वर्गाच्या मागण्या

(१) आमच्या वर्गाला एका कोपऱ्यांत घाणेरडी व अरुंद जागा दिली आहे. वर्गांत हवा व उजेड भरपूर नाहीं. या उलट 'अ' वर्गाला चांगली हवाशीर व ऐसपैस खोली दिली आहे. तरी मास्तरमंडळींनीं आमचा वर्ग ताबडतोब चांगल्या ठिकाणीं बदलावा.

(२) ' अ ' वर्गात चांगल्या चांगल्या सुंदर मुलींचा भरणा आहे. आमच्या वर्गात एकसुद्धां मुलगी नाहीं. या पक्षपाताकडे आम्ही हेडमास्तरचें लक्ष वेधूं इच्छितों आणि हा अन्याय लवकर दूर करण्याबद्दल त्यांना विनंति करतों.

(३) ' अ ' वर्गाला खूप सवलती मिळत आहेत. त्यांना अभ्यासाचे तास कमी व सुट्याहि वाटेल तशा मिळतात. ' ब ' वर्गाला मात्र अशा सवलती दिल्या जात नाहींत.

(४) ' अ ' वर्गातील विद्यार्थी श्रीमंतांचीं मुलें आहेत, म्हणून मास्तर त्यांच्याशीं मोठ्या उदारपणें वागतात व कित्येक वेळां वशिल्यानें त्यांना पास करतात. ' ब ' वर्गातील मुलें गरीब आहेत, म्हणून मास्तर त्यांची पर्वा करीत नाहींत व उलट त्यांना तुसडे-पणानें वागवितात. तरी आम्हांलाहि थोडाबहुत वशिल्याचा लाभ मिळावा अशी आमची नम्र मागणी आहे.

(५) ' अ ' वर्गातील मुलें दुपारच्या सुटींत चिकी व रेवडी खातात. आम्हां ' ब ' वर्गातल्या मुलांजवळ पैसे नसल्यामुळें आम्ही कांहींच खात नसतों. तरी हेडमास्तरांनीं आमच्या दुपा-रच्या खाण्याची व्यवस्था करावी.

(६) आमच्या वर्गातले मोडके डेस्क व जुनाट बांकें काढून ' अ ' वर्गातल्याप्रमाणें नवीन फर्निचरची सोय करावी.

(७) ' ब ' वर्गातले विद्यार्थी गरीब असल्यामुळें सर्वांना निम्मी फी असावी व ती आमच्या सवडीप्रमाणें घ्यावी.

पुराणांत न सांगितलेली कथा

कैलासांत अप्सरांचा संचार

देवेंद्राच्या राज्याला तेथील अप्सरांमुळें विशेष महत्त्व आलें होतें. कारण तें राज्य टिकविण्यास त्या अप्सराच कांहीं अंशीं कारणीभूत झाल्या होत्या. इंद्रपुरीच्या राजकारणांत वारांगनांना अत्यंत महत्त्वाचें स्थान होतें, आणि एखाद्या बलाढ्य प्रतिस्पर्ध्याला कपटानें नामोहरम करण्याच्या कामीं त्या वारांगनांचा फार उपयोग होत असे ! आपलें इंद्रपद डळमळण्याची ज्या ज्या वेळीं देवेंद्राला भीति वाटूं लागे, त्या त्या वेळीं या अप्सरांनीं कारस्थान करून कपटानें शत्रूची फजिती केली होती आणि इंद्राचें सिंहासन अढळ ठेवलें होतें. आतां या कामीं इतर देवादिकांचीहि इंद्राला मदत होत असे, पण त्यांतल्या त्यांत

अप्सरांनीं बजावलेली कामगिरी विशेष मोलाची होती ! विश्वामित्रा-सारख्या महान् तपोनिष्ठाला एका अप्सरेनें कुत्रा बनवून आणलें, तेव्हांपासून तर इंद्रनगरींत वारांगनांचा भाव बेसुमार वाढला !

महाराजा देवेंद्र यांची पूर्ण कृपादृष्टि असल्यामुळें इंद्रपुरींत वारांगनांना विशेष सवलती मिळाल्या होत्या. सरकारचीच मेहरनजर असल्याकारणानें समाजांत त्यांना कोणीच तुच्छ लेखीत नसत. उलट मानपत्रें व थैल्या देऊन ठिकठिकाणीं त्यांचा गौरव होई. एकंदरींत देवेंद्राच्या राज्यांत अप्सरांची चैन चालली होती !

सुरलोकांत अप्सरांचे फार लाड होऊं लागले, याचा परिणाम मात्र शेवटीं बरा झाला नाहीं. या फाजील लाडानें साऱ्या अप्सरा शेफारून गेल्या. देवेंद्रानें दिलेल्या सवलतीचा दुरुपयोग होऊं लागला. हळूहळू त्या चढेल व गर्विष्ठ बनत चालल्या ! इंद्रपुरींत कोणत्याच गोष्टीची ददात नसल्यामुळें विलासांत व चैनींत त्यांचा काळ मजेनें जात होता. सोमरसाचें पान करून त्या रात्रंदिवस धुंद असत व मोठमोठ्या सन्मान्य अधिकाऱ्यांचीहि पर्वा करीत नसत ! खुद्द सरकारपक्ष आपल्या बाजूला आहे, या आत्मविश्वासानें त्यांना अहंकार उत्पन्न झाला व त्यांचें वर्तन बेताल झालें ! त्यांच्या चढेल वृत्तीस आळा घालण्यास कोणीच तयार होईनात, त्यामुळें त्या अधिकच उच्छृंखल झाल्या व त्यांचा उद्धटपणा दिवसेंदिवस वाढत जाऊं लागला !

पण दुर्दैवानें एका हलगर्जीपणामुळें त्यांच्यावर संकट ओढवलें. इंद्रपुरींतील अप्सरांना मध्येंच एक दुर्बुद्धि आठवली. कांहीं नवमतवादी वारांगनांना इंद्रपुरीचा कंटाळा आला होता

म्हणून एक दिवस ' ट्रिप ' काढण्यासाठीं त्या हळूच शहरांतून बाहेर पडल्या.

मोकाट सुटलेल्या त्या उन्मत्त वारांगना फिरतां फिरतां कैलासांत येऊन पोंचल्या. श्रीशंकराचें तें पवित्र व रमणीय स्थान पाहून त्या अगदीं खूष झाल्या. असलें अपूर्व वनसौंदर्य अमरपुरींत त्यांना कधींच पाहावयास मिळालें नव्हतें. मोठ्या प्रसन्न चित्तानें त्या वारांगना कैलासांत विहार करूं लागल्या !

भटकतां भटकतां वाटेंत त्यांना शंकराचा नंदी भेटला. असा चमत्कारिक व निर्बुद्ध प्राणी अमरपुरींत क्वचित् पाहावयास मिळत असे. नंदीला पाहतांच त्या उन्मत्त व खट्याळ अप्सरा खो खो करून हसूं लागल्या. नाना प्रकारांनीं हिणवून नंदीची चेष्टा करूं लागल्या. देवाधिदेव महादेवाचा हा नंदी आहे, समर्थाच्या जना-वराला सुद्धां कधीं दुखवूं नये, याचा विचार त्या मूर्ख वारांगनांनीं केला नाहीं.

अप्सरांनीं केलेली ती थट्टा नंदी मुकाट्यानें ऐकून घेत होता. चार सुंदर स्त्रिया आपल्याभोवतीं जमून आपली थट्टामस्करी करीत आहेत, हें पाहून त्या जनावराला समाधान वाटूं लागलें. कारण यापूर्वी कोणत्याच स्त्रीनें त्या नंदीकडे ढुंकूनहि पाहिलें नव्हतें !

उच्छृंखल अप्सरांनीं चालविलेली ती टवाळी नंदीला जरी मान्य होती तरी शंकरांना ती खपली नाहीं. कैलासपर्वताच्या एका शिखरा-वरून ते हे सर्व चाळे पाहत उभे होते. कांहीं नादान व बेमुर्वत-खोर स्त्रिया आपल्या हद्दींत धिंगाणा घालतात, इतकेंच नव्हे तर

आपल्या आवडत्या नंदीची कुचेष्टा करतात हें पाहून परमेश्वराचा क्रोध अनावर झाला !

त्यांच्या लालबुंद डोळ्यांतून अग्निलोळाचा वर्षाव होऊं लागला. महारुद्राचा अवतार धारण करून आपल्या पदाघातानें सारा कैलास हादरून टाकीत ते त्या अप्सरांसमोर येऊन थडकले !

" उन्मत्त स्त्रियांनो ! " कैलासाधिपति गर्जना करीत म्हणाले, " या नन्दीला तुम्ही कोण समजतां ? जनावर मूर्ख असलें तरी तें या सर्व शक्तिमान् परमेश्वराचें आहे, हें ध्यानांत ठेवा. माझ्या दर्शनाला येणारे लोक अगोदर त्याचा मान राखतात. आणि तुम्ही मात्र त्याचा उपहास चालविला आहे ! तुमच्या टवाळीनें माझ्या नंदीच्या भावना दुखावल्या आहेत. याचा परिणाम किती भयंकर रीतीनें तुम्हांला भोगावा लागेल याची, मूर्ख स्त्रियांनो, तुम्हांला कल्पना आहे काय ? "

महादेवाचा तो अवतार व आवेश पाहून प्रलयकालाला येथूनच सुरुवात होते कीं काय अशी भीति त्या अप्सरांना पडली. ईश्वर आपल्यावर कोपला, आतां आपली धडगत नाहीं, असें पाहून त्या दीनवाणीनें शंकराची करुणा भाकूं लागल्या ! देवेंद्राचें राज्य सोडून आपण परक्याच्या हद्दींत आलों, इथें नमतें घेतल्याशिवाय आपला तारणोपाय नाहीं हें जाणून त्या धूर्त वारांगना कैलासेश्वराची प्रार्थना करूं लागल्या.

" देवाधिदेवा ! आम्हांवर दया करा. अमरपुरींतील आम्ही अप्सरा वाट चुकून इथें आलों आहोंत. इथले कायदेकानू आम्हांला माहीत नाहींत. आम्ही अजाण अबला आहोंत. इतक्या निष्ठुरपणें स्त्रियांजवळ वागणें परमेश्वराला शोभत नाहीं—"

" चूप ! दुराचारी अप्सरांनो, " महादेव अधिकच खवळून म्हणाले, " तुमच्यावर दया करून मी स्त्रीदाक्षिण्याचें ढोंग करीत नाहीं. गुन्हेगारांना शिक्षा झालीच पाहिजे. मस्तवाल पऱ्यांनो, ऐका. नीट लक्ष देऊन ऐका. मी तुम्हांला असा शाप देतों कीं, यापुढें मृत्युलोकांत कवडी किंमतीच्या बाजारबसव्या म्हणून तुम्ही जन्म घ्याल. तुम्हांला तुमच्या अब्रूची, नीतीची, कशाचीच चाड असणार नाहीं. समाजांत तुमचा नेहमीं तिरस्कार होईल. जागतिक मंदीमुळें तुम्हांला तुमच्या शरीराचेंहि मोल कमी कमी करीत न्यावें लागेल, आणि पुढें पुढें तुम्हाला कुत्राहि विचारणार नाहीं. "

परमेश्वराची ती भयंकर शापवाणी ऐकून त्या साऱ्या अप्सरा भीतीनें थरथर कांपूं लागल्या. महादेवाच्या चरणांवर त्या गडबडा लोळूं लागल्या. महादेवापुढें पदर पसरून दीनवाणीनें त्या आकांत करू लागल्या, " जगच्चालक प्रभो, आपण ब्रम्हांडाची वाटेल तशी घडामोड करतां यांत शंका नाहीं. आपल्या अलौकिक सामर्थ्यापुढें आम्ही क्षुद्र वारांगना काय करणार ? ईश्वरा, आपण दयाळू आहांत. इतक्या कठोरतेनें आमचा अन्त पाहूं नका. आम्हांवर दया करा. "

वारांगनांना झालेली उपरति व त्यांची केविलवाणी अवस्था पाहून भोळ्या शंकराला दया आली. त्यांचा क्रोध हळूहळू शांत होत चालला. थोडा वेळ विचार करून गंभीर स्वरांत ते म्हणाले, " चुकलेल्या अप्सरांनो ! असा आकांत करूं नका. डोळे पुसून घ्या. मी माझ्या शापांत थोडी दुरुस्ती किंवा सुधारणा करतों. माझ्या शापाप्रमाणें मृत्युलोकांत तुम्ही बाजारबसव्या व्हालच

यांत शंका नाहीं. पण मध्येंच तुमचा भाग्योदय होण्यासारखी एक घटना निर्माण होईल. कांहीं मूर्ख भांडवलवाले फिल्म कंपन्या नांवाचा चमत्कारिक धंदा काढतील. त्यांत तुम्ही नटी म्हणून चमकाल. तुमची चैन होईल, चंगळ होईल, तुमचा भाव बेसुमार वाढेल ! तुम्हांला खूप पगार मिळेल, मोटार मिळेल, आणि इच्छा असल्यास नवरेहि मिळतील. तुमचे फोटो, तुमच्या मुलाखती, तुमच्या जाहिराती—कांहीं विचारूं नका ! मोठमोठे लोक तुमचे पाय धरतील. जा, दुःख करूं नका. माझ्या शापांत मीं ही दुरुस्ती केली आहे ''

मदिराभक्तांच्या समाधींवरील शिलालेख !

व्हिस्कीनें
सुरुवात करून
अखेर बेवड्यांत लाचारपणें
झिंगणारा कफल्लक कर्जबाजारी
या ठिकाणीं मरून पडला आहे !

*

अवसे-पुनवेला
कधींकाळीं बेतानें घेणारा
हा कवि आज शिवरात्रीला
चिकार झोंकून इथें पडला आहे !

*

दारूबाज
पतीशीं गांठ पडल्यामुळें
जिचा सोन्याचा संसार अर्ध्यावरच
आटोपला, त्या बालविधवेचें कुंकू
या ठिकाणीं पुसून टाकलें आहे !

*

दारूच्या
नशेंतून निर्माण झालेली
बेहोष आरडाओरड, अर्थशून्य
बडबड आणि निर्लज्ज गोंगाट
या ठिकाणीं हतबल होऊन शांत झाला.

*

मुंबईच्या
गटारांत आणि रस्त्यांत
मधून मधून बेशुद्ध पडणारा
मदिरेचा हा एकनिष्ठ उपासक या
ठिकाणीं कायमचा बेशुद्ध पडला आहे !

*

आयुष्यांत
ज्याची चढलेली कधींच
उतरली नाहीं, त्या बहाद्दर वीराची
या ठिकाणीं संपूर्ण उतरली आहे !

*

दारूमुळें
फुकट गेलेल्या
या विद्वान् ब्राह्मणावर दोन
अश्रू ढाळा आणि चालायला लागा !

*

इहलोकांत
चिकार पिऊन परलोकांत
आणखी पिण्याची हिंमत
बाळगणारा महत्त्वाकांक्षी आत्मा
या ठिकाणीं गाडून टाकला आहे !

*

सं. .... नं. ...
ता. ....
ग्रं. ग्रं.

मदिरेच्या
राक्षसी तावडींत सांपडलेल्या
कंगाल मजुराचें अनाथ पोर
दुधावांचून इथें तडफडत मेलें आहे !

*

दारू
पिण्यासाठींच जो
जन्मास आला, तो दारू
नसलेल्या या मुंबईत कशाला
जिवंत राहील ? ईश्वर मृतात्म्यास
दारू (शांति नव्हे !) देवो !

*

आयुष्यांत
खाण्यापेक्षां ज्यानें
पिण्याकडेच अधिक लक्ष
पुरविलें तो पानबहादूर अखेरची
पिऊन या ठिकाणीं शांत झोंपला आहे !

*

नांदत्या
संसारांत बाटलीबाईचें
आगमन झाल्यामुळें जिच्या
आशा, आकांक्षा धुळीस मिळाल्या
त्या सौ भा ग्य व ती चें मं ग ल सू त्र
या ठिकाणीं तोडून टाकलें आहे !

*

मदिरेच्या
पानावांचून ज्याच्या
लेखनाचें एक पानहि हललें नाहीं
त्या थोर साहित्यिकाची प्रतिभा
या ठिकाणीं थंड होऊन पडली आहे !

*

मदिरेमुळेंच
ज्याच्या राजकीय
कर्तबगारीला विशेष जोर
चढला तो हा ज्वलज्जहाल
देशभक्त संपूर्ण स्वातंत्र्यासाठीं
या ठिकाणीं तळमळत पडला आहे !

*

भरपूर
पिऊन सुखानें
मेलेला हा संतुष्ट आत्मा
इतरांना कळकळीनें सांगतो,
" बाबारे, दारू पिऊं नका ! "

*

दारूच्या पायीं
सर्वस्वाचा नाश करून
घेऊन, कफल्लक झालेला हा
कर्जबाजारी सावकाराच्या भीतीनें
या ठिकाणीं दडून बसला आहे !

*

बायकोपेक्षां
बाटलीलाच ज्यानें
आयुष्यांत अधिक महत्त्व दिलें
तो हा नैष्ठिक ब्रह्मचारी या ठिकाणीं
अजून अविवाहितच राहिला आहे !

*

माफक
प्रमाणांत चोरून
पिण्यास सुरुवात करून
नंतर राजरोस अतिरेक करण्यांत
ज्यानें बेफाम धडाडी दाखविली तो
हा एके काळचा नेमस्त आज या
ठिकाणीं जहाल होऊन पडला आहे !

*

बोलपटांतील
बदमाष सुधारला
म्हणून किती सुधारणार !
अखेर तो इथेंच येणार !

*

त्यानें
दारू मागितली पण
अखेर त्याला इथें धोंडा मिळाला !

*

चोरून
प्रेम करण्यापेक्षां चोरून
पिण्यांतच ज्याला अधिक स्वारस्य
वाटलें तो या ठिकाणीं चोरून मेला आहे !

*

खादींची
गांधीटोपी घालून
दारू प्याल्यामुळें हा निरपराध
गृहस्थ अखेर कॉलरा होऊन मेला !

*

दारूच्या
फुटलेल्या पेल्याप्रमाणें
या कुलीन नटीचें शील या
ठिकाणीं छिन्नभिन्न होऊन पडलें आहे !

*

दारू
बंद होणार
या भीतीनेंच एका
इसमाचा जो मुडदा
पडला तो इथें कायमचा !

*

म्हैसूरचे महाराज आणि 'तुकाराम'

['तुकारामा'ची भूमिका करून प्रसिद्धीस पावलेले विष्णुपंत पागनीस यांचा 'भाव' दर आठवड्याला वाढत गेला आणि मुंबईत बोलपटाला ४० आठवडे लोटल्यावर म्हैसूरच्या महाराजांच्या खास आमंत्रणावरून ते म्हैसूरला रवाना झाले. शिवाजीचें आमंत्रण आलें असतांहि तुकाराम त्यांच्या भेटीस गेले नाहींत, यावरून म्हैसूरचे महाराज हे शिवाजीपेक्षां जास्त भाग्यवान् आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं. चित्रसृष्टींतील साधु आणि सत्य-सृष्टींतील राजा यांच्या अपूर्व भेटींत काय प्रकार घडला असावा ?—]

राजा—बन्निरी ! तुकारामस्वामी, बन्निरी ! तम्म दर्शनदिंद बहळे आनंद—

पागनीस—पांडुरंग ! पांडुरंग ! काय ही बोली ! कानडीनें केला मराठी भ्रतार । एकाचें उत्तर एका नये ।।

राजा—चुकलों. तुम्हांला कन्नड भाषा अवगत नाहीं होय ? बरं तर ! मी मराठींतच बोलतों. या, तुकाराम, या ! एकेचाळीस आठवडे चिकार गर्दीत चाललेल्या संतशिरोमणीला हा म्हैसूराधिपति प्रणाम करतो. जिजाईच्या प्राणनाथा, आपल्या पायधुळीनें माझा राजवाडा आज पावन झाला.

पागनीस (गळ्यांतील तंबोरा खालीं ठेवीत)—सर्व कांहीं पांडुरंगाची इच्छा ! पांडुरंगाच्या कृपेनेंच इथें येण्याची मला बुद्धि झाली. गणपति उत्सवांतील सगळ्या कार्यक्रमांना गचांडी देऊन मीं एकांत अशा या राजवाड्यांत धांव घेतली आहे. आम्हां भणंग भिकाऱ्यांना ते उत्सव काय कामाचे ? (डोळे मिटून घेऊन गुणगुणतात) पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं ।

राजा (सद्‌गदित होऊन)—अहाहा ! तुकाराम चित्रपट रेकॉर्ड करील यांत शंकाच नाहीं. अकटकटा ! येनु आश्चर्य ! तुकाराम, तुमचे अभंग द्राक्षार्कमधूप्रमाणें फारच रसाळ आहेत.

पागनीस—माझी स्तुति कशाला करतां ! साळुंकी मंजुळ बोलतसे वाणी । शिकविता धणी वेगळाची ।। हें सर्व कांहीं डायरेक्टर दामले यांनीं शिकविलें आहे. प्रभात कंपनीच्या प्रयत्नांचें हें फळ आहे. असाध्य तें साध्य करितां सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ।।

राजा (आनंदाश्रु पुशीत)—काय हें वैराग्य ! काय हें मुखावरचें तेज ! माझ्या राजभांडारांतील सगळीं रत्नें या तेजापुढें निष्प्रभ पडतील ! तुकारामरायरे ! तुम्हांला भूक लागली असावी. अल्पोपाहाराची सोय केली आहे. म्हैसूर नगरींतील हीं खास उत्तमोत्तम फळें चाखून पहा.

पागनीस (फळाचा चावा घेत)—किती गोड, किती मधुर ! पांडुरंगाच्या नामाइतकींच हीं गोड आहेत. शुद्ध बीजापोटीं । फळें रसाळ गोमटीं ॥ नाहींतर आमच्या मुंबईंत पहा. फळें किडकीं आणि त्यांतून महाग ! या फलाहारानें माझें पोट भरलें. तुका झालासे संतुष्ट ।

राजा—मीहि धन्य झालों. माझें कर्म चांगलें म्हणून माझ्या नगरींतील फळें तुमच्या उदरांत गेलीं. तुकारामदेवरे, शिष्टाचार म्हणून विचारतों; रागावूं नका. तुमची हेंडती—म्हणजे तुमची पत्नी जिजाई क्षेम आहे ना ?

पागनीस—पांडुरंगाच्या कृपेनें तिचें क्षेमच असणार. राजे, तिचं नांव तुम्हीं न काढलेलें बरें. स्त्रीसुख माझ्या नशिबांतच नाहीं. (गहिंवरून) तुका झाला सांडा । विटंबिती पोरें रांडा ॥

राजा (गालावर चापटी मारून घेत)—अय्योय्यो ! चुकलों मी ! तुमची पत्नी कर्कशा आहे हें मी विसरलों. दुःख माडबेडरी ! तुकारामस्वामी—

पागनीस—दुःख कसलें त्यांत ? (आकाशाकडे पाहून) बरें झालें देवा बाईल कर्कशा । बरी ही दुर्दशा जनामध्यें ॥ मी तिला मुळींच दोष देत नाहीं. उलट तिच्यामुळेंच 'तुकाराम' चित्रपट अजून चालला आहे.

ग्रं. क्र. ३९०३

राजा--स्वामी, तुमचें हें कडकडीत वैराग्य पाहून माझ्याहि शरिरांत विरक्तीचा संचार होत आहे. हें सारें राजवैभव सोडून तुमच्यामागें भटकावं असें मला वाटूं लागलें आहे.

पागनीस--छे छे, राजे, असा अविचार करूं नका. आपण क्षत्रिय आहांत. इंग्रजांच्या कृपाछत्राखालीं राज्यकारभार चालवणं हा तुमचा कुळधर्म आहे. कुळधर्माची महतीच अशी आहे—

कुळधर्में ज्ञान कुळधर्में साधन ।
कुळधर्में निधान हातीं चढे ॥

राजा--साधुश्रेष्ठा, माझ्या आमंत्रणाला मान देऊन तुम्ही येथपर्यंत येण्याचे श्रम घेतलेत आणि मला आपल्या दर्शनाचा लाभ दिलात या उपकाराबद्दल मीं आपल्याला थोडी बिदागी दिली तर त्याचा अव्हेर होणार नाहीं ना ?

पागनीस (डोळे मिटून घेत)--नको नको मना गुंतू माया-जाळीं । काळ आला जवळी ग्रासावया ॥

राजा—असे साशंक होऊं नका. पांडुरंगाचा प्रसाद म्हणून या पांच हजारांच्या नोटा ग्रहण करा.

पागनीस--छे छे ! हें विष आम्हांला नको. राजे, आम्हां साधुसंतांना या मोहांत पाडूं नका.

सोनें आणि माती । आम्हां सारखी हे चित्तीं ॥
रंक आणि राव । आम्हा सारखाची भाव ॥

राजा—तुकोबा, माझ्या दानाचा असा अनादर करूं नका. वाटल्यास तुम्ही या पैशाचा उपयोग करूं नका, जिजाई माउलीला दोन दागिने करून घाला. (पागनीसांच्या खिशांत नोटा कोंबतात.)

पागनीस (सुस्कारा सोडून)--पांडुरंगाची इच्छा ! कर्ता करविता तोच आहे. अहाहा ! राजे, तुम्ही मला मूर्तिमंत पांडुरंगा-सारखे दिसतां. तुमच्या कानांतल्या कुड्या, गळ्यांतील रत्नहार वगैरे पाहिले म्हणजे पांडुरंगाची आठवण होते. मकर कुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभ मणी विराजत ॥

राजा (गळ्यांतील रत्नहारावर हात फिरवीत)--तुकोबा, असे दिपून जाऊं नका. हिंदुस्थानांतील सर्व संस्थानिकांत मी श्रीमंत असलों तरी तुमच्याइतकी मला कीर्ति नाहीं. मुसोलिनीनें सुद्धां तुमचा सत्कार केला. एकेचाळीस आठवडे चालणें म्हणजे काय ? थट्टा नव्हे. मस्करीची गोष्ट इल्ला !

पागनीस--पांडुरंगाचं नामस्मरण केलं म्हणजे तुमचं राज्यहि अनंत आठवडेपर्यंत चालेल. बरं राजे, आतां मी तुमची रजा घेतों. मला निरोप द्या.

राजा--मग तुमच्यासाठीं मी विमानाची सोय करतों. असे दचकूं नका. वैकुंठाला जाण्यासाठीं नव्हे; मुंबईला जाण्यासाठीं.

पागनीस--पांडुरंग ! पांडुरंग ! मला मुंबईलाच जायचं आहे. (खिशांतील नोटा व तंबोरा सावरीत विमानांत बसतात.) आम्ही जातों आमुच्या गांवा । आमुचा रामराम घ्यावा ॥ रामकृष्ण मुखीं बोला । तुका जातो मुंबईला ॥

तीन वर्षांत दारूबंदी !

[आर्य-मदिरामंडळाची बैठक. महात्मा गांधींच्या 'हरिजन' मधील लेखावर चर्चा चालली आहे. तळीराम, शास्त्रीबुवा, खुदाबक्ष; मन्याबापु मवाळ, जनुभाऊ जहाल वगैरे.]

तळीराम--जनुभाऊ, आज मंडळाची तातडीची सभा कां बोलावण्यांत आली आहे तें सभासदांना माहित आहे ना ?

जनुभाऊ--नाहीं. सर्व सभासदांना इतकी चढली आहे कीं, आपण कां जमलों आहोंत, ह्याची कुणालाच आतां शुद्ध उरली नाहीं. तळीराम, सभेच्या कामाला लवकर सुरुवात करा. मी सुद्धां हळूंहळूं लवंडत चाललों आहें.

शास्त्रीबुवा--थांबा, सभेला सुरुवात करण्यापूर्वी तुम्हीं दोघांनीं आणखी एक एक पेला घ्यावा अशी माझी सूचना आहे.

खुदाबक्ष—हिंदु-मुसलमानांच्या एकीच्या दृष्टीनें शास्त्रीबुवांच्या सूचनेला मी टेंकू देतो. तळीराम, तुम्ही दोघे एक एक पेला घ्याच, पण अल्पसंख्याकांना सवलत म्हणून मला मात्र दोन पेले घेण्याचा आग्रह करा.

शास्त्रीबुवा—खुदाबक्षाची मागणी मला मंजूर आहे. दोनच काय, त्यांनीं चौदा पेल्यांचा जरी हट्ट धरला तरी, त्यांच्या चौदा मागण्या पुरविण्यास मंडळ तयार आहे. बोला, हिंदु-मुसलमानकी जय !

मन्याबापु—ज्या अर्थी सगळेच जण पिण्यांत गुंतले आहेत त्या अर्थी सभेच्या कामाला मीच सुरुवात करतों. महात्मा गांधींनीं तीन वर्षांत दारूबंदी करण्याची जी घोषणा केली आहे--

सगळे सभासद--शेम शेम !

तळीराम—मन्याबापु, तुम्ही आणखी एक पेला घ्याच. म्हणजे तुमच्या जिभेवरून ' महात्मा ' वगैरे शब्द धुऊन जातील. दारू-बंदीची घोषणा करणाऱ्याला ' महात्मा ' म्हणणें मंडळाच्या ब्रीदाला सोडून आहे.

खुदाबक्ष—बराबर है. हा, गांधी कोण एवढा ? तळीराम हाच खरा महात्मा आहे. कुठं शेळीचें दूध आणि कुठं आर रम् !

शास्त्रीबुवा—खुदाबक्ष, तुम्ही जरा स्वस्थ पडा पाहूं. तुम्हांला बरीच चढलेली दिसते. तुमचं पुढील भाषण मी करतों.

मन्याबापु—अहो शास्त्रीबुवा, माझं भाषण मला पुरें करूं द्या अगोदर. माझी वाचा हळुहळू कुंठित होत चालली आहे, त्यामुळें मी पहिल्यानें बोलून घेतों.

तळीराम--मित्र हो, असा गिल्ला करूं नका. ही काय वर्किंग कमिटीची बैठक आहे का इथें अधिकारग्रहणाचा प्रश्न आहे म्हणून तुम्ही असे भांडत बसतां ? शास्त्रीबुवा, तुमची तर मला कींव येते ! नवटांक घेऊन तुम्ही सव्वाशेराचा दिमाख दाखवतां ! तुमच्या या ढोंगाला काय म्हणावें ? लोकशाही स्वराज्य पक्षानें संपूर्ण स्वातंत्र्याच्या गप्पा मारण्यासारखाच हा प्रकार आहे ! काय, खुदाबक्ष ?

खुदाबक्ष--खरं आहे, खरं आहे !

शास्त्रीबुवा--अरेरे ! ज्याच्या घशांत अजून छटाक गेली नाहीं त्यानें माझ्यावर नवटांकाचा आरोप करावा ना !

जनुभाऊ--आपण इथें कशासाठीं जमलों आहोंत तें कृपा करून मला कळेल काय ? मघापासून चाललेल्या बडबडीचा मला अद्याप कांहींच अर्थबोध झाला नाहीं.

तळीराम--आश्चर्य आहे ! जनुभाऊ, इतकीं वर्षें तुम्ही दारू पितां, आणि तुम्हांला राजकारणाचें कांहींच ज्ञान नाहीं ?

जनुभाऊ--दारूचा आणि राजकारणाचा संबंध काय ?

तळीराम--वाः, उद्यां विचाराल, व्हिस्कीचा आणि सोड्याचा संबंध काय ? दारूचा आणि राजकारणाचा तसा उघड संबंध नसला तरी चोरटा संबंध आहे. हे शास्त्रीबुवाच सांगतील. ते राजकारणी पुरुष आहेत. कैक वेळां दारू पिऊन व्यासपीठावर चढण्याचें त्यांनीं धैर्य दाखविलें आहे.

शास्त्रीबुवा--संपूर्ण स्वातंत्र्याला असेंच धैर्य लागतें.

खुदाबक्ष--इन्किलाब झिंदाबाद !

तळीराम--हं, असे एकेरीवर येऊं नका. नुसत्या दोनचार बाटल्यांनीं बेहोष होण्याइतके आपण कच्चे देशभक्त नाहीं आहोंत. आरडाओरड करून आपणाला क्रांतिकारक राजकारण करावयाचें नाहीं. आपली चळवळ सनदशीर आहे.

मन्याबापू---पण यापुढें सनदशीर चळवळ करायला मी तयार नाहीं. गांधींना ' हरिजन ' मध्यें लेख लिहून तीन वर्षांत संपूर्ण दारूबंदी करण्याबद्दल काँग्रेस दिवाणांना जी चिथावणी दिली आहे ती वाचून माझा भडका उडाला आहे. मी मवाळ असून सुद्धां चिडलों आहें. हे जनुभाऊ स्वतःला जहाल म्हणवितात पण कॉमरेड रॉयप्रमाणें थंड पडले आहेत. शेम !

जनुभाऊ—चूप. कोण म्हणतो मी चिडलों नाहीं म्हणून ? मघांपासून मी नुसती ' एस ' बीरच घेत बसलें आहें, म्हणून मी तुम्हांला थंड दिसत असेन. थांबा, आतां मला हें ' आर रम'चें मिक्स्चर घेऊं द्या आणि मग पहा मी किती चिडतों तें !

शास्त्रीबुवा--शाबास ! असा आत्मविश्वास असला म्हणजे माणूस कितीहि घेऊं शकतो. मन्याबापु, तुमचं भाषण नीरस होत चाललं आहे. तुम्ही आणखी थोडी झोंकून भाषा जोरदार करा.

तळीराम---तोंपर्यंत मला बोलूं द्या. काँग्रेसनें संपूर्ण दारूबंदीची जी चळवळ चालविली आहे तीमुळें या मंडळाला धक्का बसला आहे. काँग्रेसच्या या उपद्व्यापाकडे हें मंडळ भीतियुक्त पण तारवटलेल्या नजरेनें पाहत आहे.

मन्याबापू—तळीराम, काय बोलतां हें ! सहा बाटल्या घेतल्या तरी तुम्हांला काँग्रेसची भीति वाटावी ना ? जनुभाऊ, तुमचं मिक्स्चर जरा तळीरामाच्या तोंडाला लावा.

शास्त्रीबुवा—या प्रश्नाकडे आतां गंभीरपणें पाहणें उचित आहे. आणखी तीन वर्षांनीं दारूबंदी झाली तर मंडळाचें कसें होईल ?

खुदाबक्ष—त्याची काळजी नको. आणखी तीन वर्षांनीं हें मंडळच बेकायदा होईल.

तळीराम—त्यासाठीं मी म्हणतों कीं, या तीन वर्षांत मंडळानें असेल नसेल ती सर्व दारू पिऊन घ्यावी. कारण पुढें दारू मिळण्याची आशाच नको.

शास्त्रीबुवा—आणखी तीन वर्षांनंतर मंडळापुढें उद्भवणाऱ्या अडचणींना तोंड देण्यासाठीं आतांच कांहीं तजवीज करून ठेवली पाहिजे. कारण दारूशिवाय जगणें मंडळाला शक्य नाहीं.

तळीराम—माझे प्राण आतांपासूनच कासावीस होऊं लागले आहेत. या तीन वर्षांच्या आंतच मरून घ्यावें असें मला वाटूं लागलें आहे.

शास्त्रीबुवा—या वेळीं तुम्हीं आणखी थोडी घेणें रास्त आहे. अर्धवट घेतल्यामुळें तुमच्या शरीरांत भीतीचा प्रादुर्भाव झाला आहे. अर्धवट शिक्षणाप्रमाणें अर्धवट चढलेलीहि फार वाईट !

जनुभाऊ—मंडळानें इतकी चिंता बाळगण्याचें कारण नाहीं. संपूर्ण दारूबंदी होईल अशी भीति बाळगणें वेडेपणाचें आहे. दारूबंदीमुळें या मंडळापेक्षां देशभक्तांचीच अधिक गैरसोय होईल हें लक्षांत ठेवा ! असे कित्येक देशभक्त आहेत कीं ज्यांना रात्री थोडी घेतल्याशिवाय झोंपच येत नाहीं.

तळीराम—जनुभाऊंना मिक्श्चर बाधलेलं दिसतंय. त्याशिवाय त्यांनीं अशी बडबड केली नसती. गांधींनीं तीन वर्षांत संपूर्ण

दारूबंदी करण्याचा विडा उचलला आहे अणि ती गोष्ट अंमलांत आणण्यासाठीं कॉंग्रेसचे प्रधान खटपट केल्याशिवाय राहणार नाहींत.

जनुभाऊ--एका वर्षांत स्वराज्य मिळेल अशीहि गांधींनीं थाप मारली होती. एका वर्षांत जसें स्वराज्य मिळालें नाहीं तशी तीन वर्षांतहि दारूबंदी होणार नाहीं.

खुदाबक्ष--दारूबंदीमुळें विशेष नुकसान होईल असें मला वाटत नाहीं. आतां आम्ही उघड पितों; नंतर चोरून पिऊं. शिवाय चोरून घेतल्यामुळें सभ्य लोकांतहि आमची गणना होईल.

शास्त्रीबुवा--त्यापेक्षां मंडळाची कचेरी गोव्यांत न्यावी अशी मी सूचना करतों. तिथें कसलीच आडकाठी नाहीं. कायदेशीरपणें वाटेल तेवढी झोंकतां येईल. काय खुदाबक्ष, गोव्याला येतां ?

खुदाबक्ष--सगळ्या गोवेकरिणी मुंबईत असतांना--

जनुभाऊ-- शुः शुः ! हा खुदाबक्ष मुद्दा सोडून बोलत आहे. दारूच्या निशेंत असलों म्हणून कांहीं विषयांतर करण्याचा आपल्याला हक्क नाहीं. मुद्दा सोडून भलतीच वडबड करायला ही कांहीं लोकशाही स्वराज्य पक्षाची बैठक नव्हे !

मन्याबापु--मंडळापुढें माझी एक सूचना आहे. बोलण्याच्या नादांत सर्वांच्या पेल्यांतील दारू तशीच पडून राहिली आहे. तरी सर्वांनीं आपापले पेले अगोदर रिकामे करून नंतर पुढील कार्यास लागावें, अशी मंडळाला माझी चेतवणी आहे.

शास्त्रीबुवा--मन्याबापूची सूचना मंडळाला मान्य आहे. मंडळाचें लक्ष पेल्याकडे वळविल्याबद्दल मी मंडळातर्फे मन्याबापूंचे आभार मानतों.

मन्याबापु—पण दारूबंदी झाल्यानंतर तुम्हांला अशा पेल्यांना मुकावें लागेल, याची जाणीव असूं द्या.

शास्त्रीबुवा--त्याची काळजी नको. दारूबंदी झालीच तर मंडळाला मी एक युक्ति सांगतों. दारूऐवजीं सर्वांनीं गोमूत्र प्राशन करावें. दारूनेंच तोंड आंबट होतें आणि गोमूत्रानें होत नाहीं असें समजूं नका. शिवाय गोमूत्राला बीरसारखी चव असते हें माझ्यासारखे कित्येक सनातनी तुम्हांला सांगूं शकतील. काय मंडळी, आहे तुम्हांला ही युक्ति पसंत ?

सर्व सभासद्—पसंत पसंत ! (सर्वजण एकमेकांच्या गळ्यांत गळा घालून पडतात.)

वशीकरण विद्या

चहाचा पेला तोंडाशीं नेतां नेतां मुकुंदरावांची नजर सहज समोरच्या कॅलेंडरवर गेली. १० मार्च १९३६. त्यांना एक प्रकारचा धक्का बसला आणि त्यासरशीं त्यांच्या हातांतला पेला किंचित् हलल्यासारखा होऊन दोनचार चहाचे कढत थेंब त्यांच्या शर्टवर पडले.

आपल्या वयाला आज बरोबर बेचाळीस वर्षें झालीं आणि आयुष्यांतील हीं सगळीं वर्षें एका महत्त्वाच्या उणीवेमुळें आपण फुकट घालविलीं, असें त्यांना आतां वाटूं लागलें. वयाला बेचाळीस वर्षें झालीं तरी आपलें लग्न झालें नाहीं, आत्तांपर्यंत अविवाहित राहून संसारांतील एका अनुपम आनंदाला आपण मुकलों, आयुष्यांतील आपलें मोलाचें असें तारुण्य स्त्रीसहवासाशिवाय सुनें गेलें वगैरे त्रासदायक विचार त्यांच्या डोक्यांत जागृत झाले व ते कष्टी

दिसूं लागले. आपल्या नशिबांत स्त्रीसुख कां नसावें याचें राहून राहून त्यांना आश्चर्य वाटूं लागलें.

झटकन उठून ते बाजूच्या आरशासमोर येऊन उभे राहिले. आरशांत आपला चेहरा आज त्यांना अगदीं भेसूर दिसूं लागला. बेचाळीस वर्षे वयाच्या जाणीवेनें ते आज चेहऱ्याचें निरीक्षण करीत होते. पूर्वीचें मार्दव, पूर्वीचा तजेला व पूर्वीची टवटवी आतां आपल्या चेहऱ्यावर राहिली नाहीं, स्त्रियांना मोह पाडणारें कोणतेंहि आकर्षण आतां आपल्या चेहऱ्यांत उरलें नाहीं आणि यापुढेंहि लग्नाची आशा करण्यास आपणास जागा नाहीं, या कल्पनेनें ते हताश झाले. आपलें सारें जीवन स्त्रीसहवासाशिवाय रूक्ष आणि कंटाळवाणें गेलें याबद्दल त्यांना अत्यंत हळहळ वाटूं लागली !

निराशेचा एक लांब सुस्कारा टाकून मुकुंदरावांनीं तोंडावरून हात फिरविला. दाढीचे खरखरीत केंस त्यांच्या हाताला टोचूं लागले आणि त्याबरोबर आपली दाढी वाढली असल्याची त्यांना आठवण झाली. आपला दुर्मुखलेला उदासवाणा चेहरा दाढी वाढल्यामुळें अधिकच काळवंडलेला दिसत आहे, या जाणीवेनें त्यांची त्यांनाच शिसारी आली !

दाढी करून चेहरा गुळगुळीत व प्रसन्न करावा, असा त्यांनीं विचार केला. पण दुसऱ्याच क्षणीं तो बेत त्यांनीं तहकूब केला. कपाळाला एक बारीक आठी चढवून ते स्वतःशींच पुटपुटले, ‘ मरेना दाढी ! उद्यां केली तरी चालेल. कोण पाहायला बसले आहेत मला ! ’

पण इतक्यांत कसलीशी आठवण होऊन ते चमकले. मिस् चंपावती कारंजे हिच्या घरीं आज दुपारीं आपल्यास चहाचें

आमंत्रण आहे, फारच आग्रह करून चंपावतीनें आपल्यास बोला-
विलें आहे, आणि चंपावतीलाहि 'येईन' असें आपण वचन
दिलें आहे.

चंपावतीनें दिलेल्या आमंत्रणाची आठवण होतांच मुकुंदरावांना बरीच हुषारी वाटूं लागली. चंपावतीची व त्यांची चार दिवसांपूर्वी नवीनच ओळख झाली होती. चंपावती ही एक साधी भोळी शाळामास्तरीण होती. तिचें वय तिशीच्या पुढेंच गेलें होतें. दिसायला ती कांहीं सुंदर नव्हती. तिची ओळख झाली, याबद्दल मुकुंदरावांना विशेष आनंद वाटला नव्हता. परवां तिनें मुकुंदरावांना चहाचें आमंत्रण दिलें तेव्हां त्यांनीं तें सहज स्वीकारलें होतें.

पण आज त्या आमंत्रणाला मुकुंदराव एका निराळ्याच हेतूनें महत्त्व देऊं पाहत होते. आपल्या आयुष्यांतील बेचाळीस वर्षें फुकट गेल्याची जाणीव त्यांना अत्यंत तीव्रतेनें जाचूं लागली होती. एकलेपणाच्या आगीनें त्यांच्या सर्वांगाचा आज भडका उडाला होता.

स्त्रीसुखाला वंचित झालेल्या आपल्या दुर्दैवी जीवनाला चंपावतीच्या आमंत्रणानें शांति मिळेल कीं काय, अशी एक वेडी आशा त्यांच्या मनाला भुरळ घालूं लागली. थोड्याशा शहाणपणानें व अक्कलहुशारीनें वागल्यास अजूनहि लग्न करून संसार थाटण्यास आपल्यास संधि आहे, असा त्यांना आत्मविश्वास वाटूं लागला. चंपावतीची मूर्ति आठवून एक सुंदर चित्र त्यांनीं आपल्या नजरेसमोर उभें केलें. कल्पनेच्या त्या मधुर गुंगींत त्यांच्या अंगावर कांटा फुलला व त्यांचे डोळे आनंदातिशयानें चकाकूं लागले.

लगबगीनें त्यांनीं दाढी केली व तोंडाला स्नो चोपडून चेहरा तुकतुकीत केला. केसाला पोमेड लावून त्यांचा भांग पाडला.

नंतर ' रेडीमेड ' कपड्यांच्या दुकानांत जाऊन त्यांनीं एक उंची सूट खरेदी केला. शक्य तितका नोक-झोंक व डामडौल करून चंपावतीकडे जाण्याचा त्यांनीं निश्चय केला.

चंपावतीकडे जाण्याची तयारी करीत असतां तिच्याशीं कसें वागावें, कसें बोलावें याचा ते मनाशींच संकल्प करूं लागले. आजपर्यंत स्त्रियांच्या बाबतींत आपल्यास कटु अनुभव आला तसा चंपावतीच्या बाबतींतहि येऊं नये म्हणून आपण कोणती खबरदारी घेतली पाहिजे, याची ते मनाशींच योजना करूं लागले. आपल्या आयुष्यांत स्त्रियांच्या इतक्या ओळखी व मैत्री घडून आल्या असतांहि एकहि स्त्री आपल्यास वश कां झाली नाहीं, याचा ते शांतपणें विचार करूं लागले.

आयुष्यांतील एक एक प्रसंग आठवून आपल्या जीवनांतील गेल्या बेचाळीस वर्षांचा त्यांनीं आढावा काढला.

बावीस वर्षांपूर्वी कॉलेजमध्यें असतांना शरयू नांवाच्या मुलीची व आपली ओळख झाली. मुलगी स्वभावानें फार गोड व मिठास होती. आपणहि तिच्यावर खूष होतों. एकदां सहज तिनें लाडांत येऊन विचारलें, " मी सुंदर दिसतें का ? " आपण प्रामाणिकपणें तिला उत्तर दिलें, " नाहीं." ती गोष्ट पोरीनें फारच मनाला लावून घेतली,– नव्हें त्या गोष्टीचा तिला राग आला. आपला सहवास ती हळूहळू टाळूं लागली व पुढें पुढें ती बोलेनाशी झाली !

—त्यानंतर तीन वर्षांनीं आपण नोकरी धरली. गिरगांव बॅकरोडवरील एका चाळींत आपण राहत होतों. शेजारच्या शशिकलेची व आपली ओळख झाली. परिचय वाढत गेला. आपला रुबाबहि कमी नव्हता ! आपण त्या वेळीं अगदीं झकपक कपडे करून ऐटींत मिरवीत होतों. शशिकला दिसण्यांत सुंदर व फार नखरेबाज होती. एक दिवस तिनें आपल्यास हळूच लाजत लाजत प्रश्न केला, " पगार काय तुम्हांला ? " आपण प्रामाणिकपणें उत्तर दिलें, " साठ रुपये. " पगाराचा आंकडा ऐकतांच शशिकला दचकली. तिनें परत आपल्याला विचारलें, " खोटं सांगतां तुम्ही. मीं असं ऐकलं होतं कीं, दोनशें रुपये पगार मिळतो तुम्हांला." शशिकलेची गैरसमजूत दूर करण्यासाठीं आपण तिच्या गळ्यावर हात ठेवून म्हटलें, " नाहीं ग, तुझ्या गळ्याची शपथ मला साठच रुपये पगार मिळतो. " आपण शशिकलेला प्रामाणिकपणें खरें खरें सांगितलें. पण ती गोरीमोरी झाली, कावरीबावरी झाली. आपल्याशीं ती पुढें कमी कमी बोलूं लागली व आपला प्रेमसंबंध शिथिल झाला !

—त्यानंतर दोन वर्षांनीं ठाकुरद्वारच्या देवळांत दर गुरुवारीं दर्शनास येणाऱ्या एका मुलीची व आपली ठराविक वेळेला गांठ पडूं लागली. आपली व तिची दर्शनास जाण्याची वेळ योगा-योगानेंच जुळून येऊं लागली. आपल्यासहि मोठें कुतूहल वाटूं लागलें. पोरगी अत्यंत भाविक व गरीब दिसत होती. खालीं मान घालून प्रदक्षणा घालतांना तिरप्या नजरेनें एकदां चोरून आपल्याकडे पाहण्यास ती विसरत नसे. एकदां तर तिनें प्रसादाचे पेढे आणून आपल्या हातावर ठेवले. पोरीनें फारच आघाडी मारलेली पाहून आपण भांबावून गेलों. देवळांत पापाचरण नको, म्हणून देवळांत

जाण्याचें आपण त्यानंतर अजिबात सोडून दिलें. पुढें लौकरच त्या पोरीच्या लग्नाची वरात ह्याच डोळयांनीं पाहण्याचा आपल्यावर दुर्धर प्रसंग आला !

—नंतर एक वर्षानें आपण गांवीं गेलों. त्या वेळीं आपल्या वयाला सव्वीस वर्षें झालीं होतीं. गांवांत आपली बालमैत्रीण कुमुद भेटली. कुमुदचेंही लग्न अद्याप झालें नव्हतें. ती अजून आपल्या-प्रमाणेंच अविवाहित असल्याचें पाहून आपल्यास समाधान वाटलें. पण कुमुद फारच लाजाळू होती. चारचौघांत ती आपल्याशीं बोलत नसे. एक दिवस पहांटे पांच वाजण्याच्या सुमारास आपण झोपेंत असतां बिछान्यावर कोणीतरी चुळबुळ करीत असल्याचा आपल्यास भास झाला. खोलींत कांहींसा अंधार होता. आपल्याला वाटलें, मांजरच बिछान्यांत लुडबुड करीत आहे. झोंपमोड झाल्या-मुळें चिडून जाऊन आपण एक लाथ मारली. ‘ आई ग ’ असा आवाज आला. तो आवाज कुमुदचा होता. आपण डोळे उघडले, तेव्हां कुमुद पळून गेली होती. नंतर तिनें आपल्यास तोंड दाखविलें नाहीं. आपल्यास फार चुटपुट लागून राहिली.

आयुष्यांतील एक एक प्रसंग आठवीत असतां मुकुंदरावांचें डोकें सुन्न व बधिर झालें. त्यांच्या हृदयांत एक प्रकारची कालवा-कालव होऊं लागली. गतकाळच्या दुःखद स्मृतींनीं त्यांचा जीव कासावीस झाला.

–पण लगेच त्यांना चंपावतीच्या आमंत्रणाची आठवण होतांच ते ताजेतवाने झाले. त्यांच्या अंगांत अभूतपूर्व असा उन्माद चढूं लागला. फुकट दवडलेल्या बेचाळीस वर्षांचें उट्टें आज आपण

खचित काढल्याशिवाय राहणार नाहीं, या ठाम निश्चयानें छाती ताठ करून ते बाहेर पडले.

'टॅक्सी' म्हणून त्यांनीं हात वर केला व थोड्याच वेळांत ते एका मोटारींत विराजमान झाले.

मुकुंदरावांची मोटार जेव्हां मिस चंपावती कारंजे हिच्या दाराजवळ येऊन थडकली तेव्हां चंपावती त्यांची वाट पाहत दरवाज्यांत उभी होती. मुकुंदरावांचा आजचा नूर पाहून ती थक्कच झाली.

सुहास्यवदनानें चंपावतीनें मुकुंदरावांचें स्वागत केलें. मुकुंदरावांनीं मान हलवीत इंग्लिश पद्धतीनें हात पुढें केला. चंपावतीला तें चमत्कारिक वाटलें. पण पाहुण्याचा अपमान होईल, या भीतीनें तिनेंहि आपला हात कचरतच थोडासा पुढें केला. तिचा हात जोरानें दाबीत मुकुंदराव म्हणाले,

"माफ करा, चंपावतीबाई, विलायतेंत जडलेली ही माझी संवय जातच नाहीं. आपल्यासारख्या कुलीन स्त्रियांशीं शेकहॅन्ड करतांना मला कसेंसेंच वाटतें, पण——"

"मला कांहीं वाटलं नाहीं त्यांत." चंपावती पदर सांवरीत म्हणाली, "काय म्हटलंत तें ? आपण विलायतेला होतां ?"

"होय. आय. सी. एस. परीक्षेला बसणार होतों; पण वडिल आजारी पडल्यामुळें परीक्षा सोडून परत यावं लागलें. सुदैवानें इथेंच सेक्रेटरीएटमध्यें साडेचारशें रुपयांची नोकरी मिळाली. मग म्हटलं कशाला जा परत विलायतेला ?"

"माझ्या गरिबाच्या घरीं आज आपण पायधूळ झाडलीत, हे

आपले माझ्यावर उपकारच झाले." चंपावती आपलें बोट हनुवटी-वर ठेवून म्हणाली.

" उपकार कसले त्यांत ! " मुकुंदराव मधुर वाणीनें बोलूं लागले, " स्त्रियांच्या बाबतींत गरीब आणि श्रीमंत असा भेद मी मानीत नाहीं. नाहीं तर आतां ताजमहाल हॉटेलमध्यें आगाखानांची अॅपॉइंटमेंट होती; पण ती सोडून मी मुद्दाम येथें आलों."

" आपण फार उदार मनाचे दिसतां ! " कृतज्ञतेनें भरलेला एक कटाक्ष मुकुंदरावावर टाकीत चंपावती म्हणाली.

" आणि आपणहि कांहीं कमी नाहीं." मुकुंदराव साखर पेरीत म्हणाले. " चंपावतीबाई, आपण एक सभ्य शिक्षकीण आहांत. आपल्या शब्दाला मी फार किंमत देतों. आजपर्यंत पुष्कळ स्त्रियांच्या माझ्याशीं ओळखी झाल्या. पण असलें सौंदर्य आणि सौजन्य मला कुठेंच आढळलें नाहीं."

मुकुंदरावांच्या एक एक शब्दानें चंपावतीला मूठ मूठ मांस चढत होतें. त्यांत मुकुंदरावांनीं जेव्हां तिच्या सौंदर्याची तारीफ केली तेव्हां तिचा जीव हुरळून वेडापिसा झाला !

" खरंच का मी सुंदर दिसतें ? " चंपावतीनें उत्सुकतेनें प्रश्न केला.

" खोटं बोलण्याची मला अत्यंत चीड आहे." मुकुंदराव गंभीरपणें म्हणाले. " तुम्ही सुन्दर तर आहांतच, पण हंसतांना तुमच्या गालावर जी एक गोड खळी पडते ती तर अत्यंत उन्मादक आहे. मी चित्रकार किंवा कवी असतों तर तमाम जगापुढें मी तुमच्या सौंदर्याचें प्रदर्शन मांडलें असतें."

हें वाक्य ठांसून बोलतांना मुकुंदरावांचा गळा घोगरा झाला. चंपावतीला सुंदर म्हणतांना त्यांच्या जिवावर आलें होतें. पण त्याला इलाजच नव्हता. आयुष्यांतील बेचाळीस वर्षांनीं एका कुरूप स्त्रीला सुंदर म्हणण्यास त्यांची जीभ आजच प्रथम धजत होती.

चंपावती बरीच विरघळलेली पाहून मुकुंदराव तिच्याकडे रोखून म्हणाले, " चम्पावतीबाई, रागावूं नका. मला फार वेळ नाहीं आतां. सतरा कामं आहेत. त्यांत पोलिस-स्टेशनवर मला निकडीनें गेलं पाहिजे. "

" पोलिस स्टेशनवर कशाला ? "

" सकाळींच माझ्या कपाटांतून दीड हजार रुपयांची हिऱ्याची आंगठी चोरीस गेली आहे. घर संभाळण्याला माणूस नसलं म्हणजे हें असं होतं. "

" आपण लग्न कां करीत नाहीं मग ? "

" अनुरूप अशी मुलगी मिळायला नको का ? " मुकुंदराव सुस्कारा टाकून म्हणाले. " हेर हिटलर आणि मी या एकाच कारणामुळें अद्याप-अविवाहित आहोंत. "

" फार वाईट ! " चम्पावतीनें हळहळ दाखविली.

" चंपावतीबाई, " मुकुंदराव कंपित स्वरांत बोलूं लागले, " ब्रह्मचर्यपालनाचीं दुःखें तुम्हांला माहित असावींत, म्हणून मी जास्त कांहीं सांगत नाहीं. तुम्हीहि माझ्याप्रमाणेंच समदुःखी आहांत. आपण एकमेकांना हात दिला तर दोघांचीहि या दुःखांतून सुटका होईल. "

" खरंच ? " चम्पावतीच्या डोळ्यांतून आशेचीं किरणें फांकूं

लागलीं. एखाद्या नववधूप्रमाणें पदराचें टोक तोंडांत कोंबून ती खालीं मान घालून गप्प उभी राहिली.

" अशा लाजूं नका तुम्ही, चंपावतीबाई, " मुकुंदराव तिच्या हाताला हळूच स्पर्श करीत म्हणाले, " तुमचं वय जरी लहान असलं तरी तुम्ही सुशिक्षित आहांत. "

"किती वय असेल माझं ? " चंपावतीनें लाडिकपणें प्रश्न केला.

" असेल वीस बावीस ! " मुकुंदराव चांचरत म्हणाले. पस्तीस वर्षांच्या पोक्त बाईला वीस वर्षांची म्हणतांना त्यांच्या मनाला परमावधीचें दुःख वाटत होतें.

" अगदीं खरं बोललांत. " चंपावती हर्षभरानें बेभान होऊन म्हणाली, "मुकुंदराव, कसं कळलं हो तुम्हांला माझं अचूक वय ! "

" या शास्त्राचा मी बराच अभ्यास केला आहे. आणि दुसरं हें कीं, मी स्पष्टवक्ता व खरं बोलणारा आहें. इतर पुरुषांप्रमाणें मी लबाड नाहीं."

बोलतां बोलतां मुकुंदरावांनीं चंपावतीला आपल्याजवळ ओढलें. स्तुतिसुमनांच्या पूजेनें प्रसन्न झालेल्या चम्पावतीनें आपलें मस्तक त्या थोर पुरुषाच्या हृदयावर विनम्र केलें आणि स्त्रियांना खूष करण्याची ही साधी अक्कल शिकायला आपल्याला बेचाळीस वर्षे लागलीं याबद्दल मुकुंदरावांनीं स्वतःचाच धिःकार केला. हें शेवटचें सावज हातचें जाऊं दिलें तर पुढें जन्मांत आपलें लग्न होणार नाहीं असा पोक्त विचार करून त्यांनीं आपले दोन्ही ओठ चंपावतीच्या गालावर टेकले !

जगाचा प्रवास आणि फुटकें जहाज !

[खालील बऱ्यावाईट नटी एका जहाजांत बसून जगाच्या प्रवासाला निघाल्या आहेत. जहाज दोन-तीनशें मैल गेल्यावर त्याला अपघात होऊन आंत पाणी येऊं लागतें. हें फुटकें जहाज आतां सर्व नटींचें ओझें घेऊन पैलतीराला जाईल हें शक्य नाहीं. जर यांत एकच माणूस असतें तर तें कसेंबसें पहिला टप्पा गाठूं शकेल असा अदमास आहे. यामुळें एकीखेरीज बाकीच्या सर्व नटींनीं जलसमाधि घ्यावी असें त्यांच्या सभेंत ठरतें. पण प्रत्येकीला, आपल्याखेरीज बाकीच्यांनीं जलसमाधि घ्यावी असें वाटतें. इतरांपेक्षां आपल्याच जीविताला कसें महत्त्व आहे हें त्या जहाजांतील प्रत्येक नटी आपापल्या परीनें पटवून देण्याचा प्रयत्न करते.]

शांता आपटे (हातांत काठी घेऊन)— बोला, अद्याप कुणीच कशी उडी घेत नाहींत ? जहाज अगदीं बुडण्याचा बेतांत आलं आहे आणि तुमचं अजून कांहींच ठरत नाहीं. मला हें मुळींच सहन होणार नाहीं. तुम्हांला काय वाटतं तुमच्याबरोबर मींहि बुडावं म्हणून ? छे ! मला तें शक्य नाहीं. माझं कॉंट्रॅक्ट अजून संपलेलं नाहीं. कंपनीच्या कराराप्रमाणें मला इतक्या लवकर मरतां येत नाहीं. बायांनो, विचार कसला करतां ? या फुटक्या जहाजांत आपल्यापैकीं एकच जण आतां राहूं शकेल. बाकीच्या सर्वांनीं जलसमाधि घेतलीच पाहिजे. बोला, समुद्रांत उडी घेतां कीं नाहीं ? बोला ! (हातांतील काठी जहाजाच्या कठड्यावर तीन वेळां आपटते.)

वासंती—किती सुंदर ! किती छान ॲक्टिंग हें ! शांताबाई, याचसाठीं तुम्ही मला फार आवडतां ! आणि हें वादळ तरी किती सुंदर ! या वादळांत ही नौका ! (' अमर ज्योती ' मधील नाविक-गीत बॅंडच्या चालीवर म्हणत या टोंकापासून त्या टोंका-पर्यंत नाचत जाते.)

शांता आपटे—बाई बाई बाई ! आवरा त्या पोरीला कोणितरी ! काय ग कारटे, तुला काय वाटतं रणजितच्या स्टुडिओंतला हा वादळाचा सीन आहे ? प्रसंग केवढा गंभीर आणि तूं आपली—

वासंती—शांताबाई, तुम्ही मुळींच चिंता करूं नका. राम-नामाचा जप करा. आमच्या संत तुलसीदास बोलपटांत यापेक्षां भयंकर वादळ आहे. पण आम्हांला कांहींच झालं नाहीं. तुलसी-दास म्हणतात, प्रभु रामचंद्रावर विश्वास ठेवा. त्यांच्या नाम-

माहात्म्यानें समुद्रावर दगड सुद्धां तरतात. मग या होडीची काय कथा ! (' रंगांत रंगलं ' हें पद साभिनय म्हणते.)

शांता आपटे--आतां हद्द झाली या पोरीपुढें ! सिनेमा सुरू केला हिनें. शांता हुबळीकर, तुम्ही तरी उडी घ्या ! तेवढंच वजन कमी होईल !

शांता हुबळीकर--मी या घटकेला जलसमाधि घेण्यास तयार आहें. पण काय करूं ? जीवन जगण्यासाठीं आहे. माझा ' आदमी ' बोलपट तुम्हीं पाहिला आहे ना ? (' किस लिये कल की बात ' हें पद सात भाषांत म्हणते.)

शांता आपटे—शी शी ! काय बेसुर गातेस तूं ? तुझ्या गाण्यानें होडीला जास्तच अपघात होईल ना !

मीनाक्षी—साऱ्याच जणींनीं सिनेमा सुरू केला आहे. कोणींच खालीं उडी घेण्यास तयार नाहीं. आतां होडी नक्की बुडणार ! मी एक जण वाचायची तीहि वांचणार नाहीं.

वासंती—मीनाक्षीबाई, तुम्हीच कां उडी घेत नाहीं ? तुम्हांला पोहायला येतं. ' ब्रह्मचारी 'मध्यें तुमचा तलावांतला सीन आम्हीं पाहिला आहे. हं, आटपा. हा पोहण्याचा पोषाख चढवा आणि हें यमुनाजळींचं पद म्हणत समुद्रांत उडी घ्या पाहूं.

मीनाक्षी--वाः दीड शहाणीच आहेस कीं तूं ! मला जीव द्यायला सांगतेस होय ! हा काय स्टुडियोंतला तलाव आहे ! आणि मी बुडालें तर मला वर काढायला मास्टर विनायक कुठें आहेत ! छे ! माझ्यानं हें होणार नाहीं. मी समुद्रांत बुडेन तर हजारों प्रेक्षकांत हाहाःकार उडेल ! मी किती लोकप्रिय नटी आहें याची तुम्हांला कल्पना नाहीं. ' ब्रह्मचारी ' बोलपट केवळ माझ्या आंघोळीच्या

सीनवरच चालला नाहीं का ? तो सीन पाहून उत्तर हिंदुस्थानांत हजारों लोक वेडे झाले आहेत. तुमच्यापैकीं एका नटीनें तरी पहिल्याच बोलपटांत माझ्याइतकी प्रसिद्धी मिळविली आहे काय ? म्हणून मी म्हणतें कीं, मला एकटीला वांचविण्यासाठीं तुम्हीं सर्वांनीं जलसमाधि घेतली तर सिनेमासृष्टीचें मुळींच नुकसान होणार नाहीं.

बिब्बो—हे भगवन् ! काय बोलते ही बया ! यांच्या या आपसांतील उखाळ्या पाखाळ्यांत जहाज बुडूनहि जाईल. हे भगवन् ! (विलक्षण अभिनय करून मूर्च्छित पडते.)

नादिया (होडीच्या शिडीवर ४० फूट उंच उडी घेऊन)—हे ऽ ऽ तुम्ही मुळींच भिऊं नका ! अशा रडतां काय भागूबाई-सारख्या ! तुम्ही साऱ्याजणी माझ्या खांद्यावर बसा ! तुम्हां साऱ्यांना घेऊन एका क्षणांत पैलतीराला उडून जाईन. या फिअरलेस नादियाला तुम्हीं समजतां काय ? असल्या छप्पन्न अपघातांतून मी सुरक्षित निभावलें आहें. माझे जोरदार दिलफोडक बोलपट तुम्हीं पाहिले नाहींत काय ? मग चिंता कसली करतां ! हे ऽ ऽ ऽ (४० फुटांवरून परत खालीं उडी मारते. त्याबरोबर होडीला एक जोराचा धक्का बसतो. सगळ्या नटी भयभीत होतात.)

गोहर—ए सर्कसवाली, तुझ्या या दणक्यानें होडी रसातळाला जाईल ना ! जरा आस्ते ॲक्टिंग करा कीं ! आम्हांला वांचविण्या-ऐवजीं तूं एकटीच जरी उडून गेलीस तरी फार उपकार होतील.

मीनाक्षी— गोहरबाई, तुम्ही कां उडी घेत नाहीं ? आम्हां सर्वांपेक्षां तुम्ही अधिक लठ्ठ आहांत. म्हणून तुम्ही होडी रिकामी केल्यास होडीचं वजन कितीतरी हलकं होईल. आणि कल्पना करा, तुम्हांला एकटीला ठेवून आम्ही सर्वांनीं जलसमाधि घेतली तरी-

सुद्धां ही होडी तुमच्या वजनापुढें टिकाव धरीलच याचा नेम आहे का !

गोहर—पुरे करा तुमची ही बडबड ! जरा अंगापिंडानें भरलें तर तुमच्या नजरेंत मी खुपतें ! दुसऱ्याचं सुख तुम्हांला पाहवत नाहीं. मी जलसमाधि घेतली तर माझ्या असंख्य चाहत्यांना काय वाटेल ! चंदूलाल शहांना काय वाटेल !

लीला—देवा देवा ! कोणीच मरायला तयार नाहींत ! आतां आमचं कसं होईल ? होडी तर बुडत चालली. दुसऱ्यांना बुडविणाऱ्या नटींवर स्वतः बुडण्याचा प्रसंग यावा ना !

नस्सीम (मनी बॅगमधील आरसा काढून ओठाला लाली लावीत)—जलसमाधि घेण्यास माझी तयारी आहे. पण माझा हा मेकअप धुवून जाईल ना ! शिवाय मी जलसमाधि घेतली तर मिनर्व्हा कंपनीला दुसरी कोण नटी आहे ? आणि माझ्याइतकी सुंदर नटी, मला नाहीं वाटत हिंदुस्थानांत दुसरी असेल अशी ! माझ्यावांचून चित्रपटसृष्टीची फार हानि होईल. माझ्या स्वतःसाठीं नव्हे, तर हजारों रसिकांसाठीं मला जिवंत राहिलेंच पाहिजे. ('घट-स्फोट' मधील एक पद गाऊं लागते.)

लीला (कानांवर हात ठेवून)—बाई ग, जीव देऊं नकोस, पण अगोदर गाणं बंद कर.

नस्सीम—तुम्ही सगळ्याजणी खालीं उडी घेईपर्यंत मी गाणं थांबवणार नाहीं.

लीला—पण माझ्याखेरीज या फुटक्या जहाजांत कोणीच जिवंत राहूं शकेल असं मला वाटत नाहीं. तुम्हां सर्व नटींहून मी वजनानें हलकी व कृशांगी आहें. एखाद्या फुलाप्रमाणें या होडींत

मी सहज सुरक्षित राहूं शकेन. पहा, वादळ जोरांत सुटलें आहे. तुफानी लाटांच्या या भयंकर माऱ्यांत हें फुटकें जहाज किती वेळ तग धरणार ! जी एकजण या होडींत वांचूं शकेल अशी मीच नाहीं का ! वासंतीपेक्षां माझं वजन हलकं आहे.

ललिता पवार (अंगाला सतरा ठिकाणीं मुरड देऊन)—— दुनिया क्या है ! जी ती आपलाच मोठेपणा सांगून दुसऱ्यांना मरायला सांगते. दुनिया क्या है ! जग हें असेंच ! माझ्यासारख्या कलावंत नटीच्या जीविताची एकीला तरी पर्वा आहे काय ! माझ्या ऐतिहासिक बोलपटांत छत्रपति शिवाजी सुद्धां माझी कदर करतो. पण या नटींना काय त्याचें ! दुनिया क्या है ! ('नेताजी पालकर'मधील कोल्हापुरी शिव्या हांसडते.)

श्राद्धदिनाचा पिंड ग्रहण करण्यासाठीं लोकमान्यांनीं पाठविलेला काकदूत !

हे काक-शिरोमणी, आज तारीख एक ऑगस्टचा मंगल दिवस म्हणून तुला मी मुद्दाम पाचारण केलें आहे. आज माझें श्राद्ध आहे. श्राद्धाच्या दिवशीं मृत्युलोकांत कावळ्यांना पिंड देण्याची पद्धत आहे. आज गायकवाडवाड्यांत किंवा सदाशिव पेठेंत जर तूं उड्डाण करशील तर माझ्या नांवानें ठेवलेला पिंड भक्षण करण्याची तुला संधि मिळेल. म्हणून म्हणतों, हे काकश्रेष्ठा, तूं आकाशमंडळांतून भ्रमण करीत करीत भरतखंडांत जा आणि माझ्या पिंडावर तुटून पड.

*

माझ्या पिंडावर असा तुटून पड, कीं जसे माझ्या फंडावर माझे अनुयायी तुटून पडले. अरे, पिंड काय किंवा फंड काय, दोन्ही सारखेच. माझ्या नांवाचा एक कोट रुपये फंडाचा जसा बोजवारा उडाला, तसाच, हे कावळ्या, माझ्या नांवाच्या पिंडाचाहि तूं बोजवारा उडवून दे. भिऊं नकोस, तुमच्याकडून हिशेब मागण्यासाठीं मी पुन्हां जन्म घेणार नाहीं.

*

माझा पिंड भक्षण करण्यासाठीं तुला पुण्या-मुंबईपर्यंत लांब प्रवास करावा लागेल. या मुसळधार पावसांत भिजत भिजत भरतखंडापर्यंत मजल मारतांना तुझ्या नाजूक तनूला फार कष्ट होतील याची मला जाणीव आहे. तुझ्याजवळ छत्री नाहीं किंवा रेनकोटहि नाहीं. या पाऊस-पाण्यांत तुला केळकरांप्रमाणें खोकला होईल किंवा बॅरिस्टर सावरकरांप्रमाणें एकशेंवीस डिग्री ताप येईल कीं काय अशी मला दुष्ट शंका वाटते. पण हे एकाक्षी, तूं कसलीच काळजी करूं नकोस. सध्यां काँग्रेसनें प्रधानमंडळ स्वीकारलें आहे. मध्यप्रांतांत डॉक्टर खरे हे मुख्य प्रधान आहेत. ते तुला फुकट औषध देतील. किंवा मुंबईत डॉक्टर देशमुख व डॉक्टर गिल्डर असे दोन देशभक्त वैदू आहेत. ते तुझ्या प्रकृतीवर इलाज करतील. त्या सर्वांचा पत्ता नीट ध्यानांत ठेव. नाहीं तर चुकून डॉक्टर सावरकरांकडे जाशील आणि मग माझ्या नांवानें कावकाव करीत बसशील !

*

हे गगनविहारी, आर्यावर्तावरून भरारी मारतांना तुला मध्येंच थकवा वाटला तर एखाद्या बैलाच्या पाठीवर बसून तूं विश्रांति घे.

कारण आजकाल हिंदुस्थानांत बैलांना फार मान आहे. मी जिवंत असतांना बैलांना कोणी विचारीत नव्हतें. पण मी मेल्यानंतर माणसें मागें पडलीं व जनावरें पुढें आलीं. म्हणून तुला सांगतों, हे चतुर कावळ्या, तूं विश्रांतीसाठीं बैलाच्याच पाठीवर आरूढ हो. पण चुकून बैल समजून एखाद्या देशभक्ताच्या डोक्यावर बसूं नकोस. एका डोळ्यानें तूं आंधळा आहेस, म्हणून हें एवढें तुला मुद्दाम सांगून ठेवतों.

*

पुढें प्रवास करतां करतां तुला जर भूक लागली तर रस्त्यांत शेगांव येथें तूं कांहीं वेळ मुक्काम कर. तिथें महात्मा गांधी असतात. त्यांच्या आश्रमांत तुला संत्रीं, मोसंबीं, खजूर व शेळीचें दूध मिळेल. डल्ला मारायचा असला तर शहाण्या प्राण्यानें गांधींकडेच जावें. केवळ डल्ला मारण्यासाठींच कित्येक कार्यसाधु ढोंगी लोक आज गांधींभोंवतीं पिंगा घालीत आहेत. हे चतुर कावळ्या, तूंहि तेथें खुशाल डल्ला मार. मात्र एक गोष्ट लक्षांत ठेव. गांधींना बनवायचें असेल तर तुला ढोंगी बनलें पाहिजे. गांधींना ढोंगी लोक आवडतात. तुझा रंग काळा असल्यामुळें गांधींजवळ जाण्यापूर्वी तूं चुन्याच्या डबक्यांत अवगाहन कर. खादी वापरल्याप्रमाणें तूं पांढरा दिसूं लागशील आणि तशा शुभ्र, धवल वेषांत तूं गांधीं-समोर गेलास म्हणजे इतर देशभक्तांबरोबर तुझीहि गणना होईल व तुझा कार्यभाग तुला साधून घेतां येईल.

*

हे छिद्रान्वेषी, भरतखंडांतून भरारी मारतांना तुला फार जपून बागावें लागेल. कारण सध्यां दिवस फिरले आहेत. कॉंग्रेसचें सरकार स्थापन झालें असल्यामुळें प्रधान कोण आणि सटरफटर माणूस कोण हें कळणें दुरापास्त झालें आहे ! कोळशे पाटलांना तूं ओळखतोस का ? नाहीं म्हणून चालणार नाहीं. रस्त्यांत भेटणाऱ्या मंत्र्यांना अचूक ओळखून काढून त्यांना तूं प्रणाम केला पाहिजेस. यांपैकीं कांहीं प्रधानांचा वेष पाहिलास तर ते तुला दाणेवाल्याप्रमाणें दिसतील. कांहींजण वसईच्या दूधवाल्यासारखे दिसतील. हे सगळे प्रधान तिसऱ्या वर्गांतून प्रवास करतात. बाजारांतून स्वत: भाजीहि आणतात. यामुळें सामान्य माणसांतून या सन्मान्य दिवाणांना अचूक ओळखणें तुझ्यासारख्या अक्कलमंद कावळ्याला कसें शक्य होईल ? त्या सांबमूर्तींना तूं पाहिलें आहेस का ? ते मद्रास कौन्सिलचे अध्यक्ष आहेत. या सर्व बऱ्या वाईट लोकांना मुजरा करणें तुला प्राप्त आहे. नाहीं म्हणूं नकोस. सत्तेपुढें, हे कावळ्या, शहाणपण चालत नाहीं.

*

सर्व प्रधानांना अभिवादन करीत करीत अखेर अहमदाबादेंत तूं संचार कर. तेथें वल्लभभाई पटेल कपाळावर हात धरून सचिंत बसलेले तुला दिसून येतील. पापी मनुष्याचा चेहरा तूं कधीं पाहिला आहेस का ? मग हा पाहून घे. नरीमनच्या बाबतींत केलेला घोर अन्याय यांच्या मनाला खात आहे. या गृहस्थाचें दर्शन घेतल्या-

बरोबर लगेच तूं पंढरपूरला जाऊन चंद्रभागेंत स्नान कर आणि पुनीत हो.

*

चंद्रभागेच्या पवित्र जलाशयांत निमज्जन करून शुचिर्भूत झाल्यानंतर तेथून उडत पुण्यनगरीला जा. गायकवाडवाड्याच्या शिखरावर अधिष्ठित होऊन साऱ्या पुणें शहरावर चौफेर नजर टाक. मी मेल्यापासून पुण्याची कशी अधोगति झाली आहे ती पाहून थोडा वेळ रुदन कर. माझ्या पश्चात् निघालेले केसरीचे अंक चाळून बघ, आणि त्यांतून क्रमश: प्रसिद्ध झालेल्या कादंबरी-वर सहानुभूतीचे दोन अश्रू ढाळ. केसरींत नवीन सुरू झालेलें निर्बुद्ध सदर 'सहज सुचलें, वाचलें, ऐकलें' तें पाहून घे. आणि विचार कर, माझ्या केसरीची इतकी विटंबना माझ्या शत्रूंनीं तरी केली असती का ?

*

गायकवाडवाड्याच्या छपरावर बसून तूं 'काव काव' करूं लागतांच केसरी कचेरींतले लोक धांवून येतील आणि आपल्यांत हा अधिक भागीदार नको म्हणून तुला हाकलून लावतील. तरी, हे काककुलभूषणा, तेथून तूं शीघ्रगतीनें पलायन कर आणि सोन्या-मारुतीच्या देवळाच्या शिखरावर जाऊन आश्रय घे. देवळाच्या शिखरावर बसल्यामुळें तुझ्या अंगांत भोपटकरांचा संचार झाला तर तूं खुशाल घंटा वाजव. डगमगूं नकोस. तुला दंड होणार नाहीं.

आणि झालाच तर इतर लोक तुझा दंड भरतील. मात्र घंटा वाजवून या क्रियाशून्य उपद्व्यापाला टिळकांचें राजकारण म्हणूं नकोस.

*

घंटा वाजविल्याच्या अपराधाबद्दल तुझें नांव कदाचित् लोकशाही स्वराज्य पक्षाचा सभासदांत जमा केलें जाईल. तुझी इच्छा असल्यास तूं जा लोकशाही स्वराज्य पक्षांत. चामडी संभाळून आरामखुर्चीवर राजकारण करावयाचें असेल तर या पक्षासारखा दुसरा पक्ष नाहीं. या पक्षांत शिरून तुझा अधःपात झाला तर मला वाईट वाटणार नाहीं. बॅ. सावरकरांसारख्या वीर पुरुषाचा जेथें अधःपात झाला तेथें, हे कावळ्या, तुझा पाड काय ?

*

अजून तुला पिंड न मिळाल्यामुळें भुकेनें व्याकुळ होऊन तूं आक्रंदन करशील व इकडे तिकडे वणवण फिरत राहशील. पिंड मिळत नाहीं म्हणून वाटेल तें खाऊं नको. त्यांतून प्राण गेला तरी झुणकाभाकर खाऊं नकोस. अरे मूर्खा, मागील जन्मीं झुणकाभाकर खाल्ल्यामुळेंच या जन्मीं तूं कावळा झालास. आतां या जन्मीं पुन्हां तेंच पाप करून पुढील जन्मीं तूं कोण होणार ?

*

पुण्यांत चक्कर मारीत असतांना लखुअण्णाच्या घरासमोरे तुला जम्नादास मेहतांची खिन्न मूर्ति दृष्टीस पडण्याचा संभव आहे. जम्नादास जर तुला दिसले तर त्यांच्याभोंवतीं पंख फडफडवून दोन चार घिरट्या घाल. तुझा रंग काळा असल्यामुळें काळ्या निशाणांनीं

स्वागत झाल्यासारखा त्यांना भास होईल. बिचाऱ्यांच्या आयुष्यांत सध्यां एवढाच विरंगुळा उरला आहे.

*

पुण्यनगरीहून उडत उडत तूं मुंबापुरींत गमन कर. तेथें चौपाटीवर माझ्या पुण्यतिथीनिमित्त जंगी सभा आणि वक्तेबाजी चाललेली तुला आढळेल. तेथें माझा पुतळा शोधून काढ. ज्या पुतळ्यावर तुझ्यासारखे, अनेक कावळे बसलेले आहेत, ज्या पुतळ्याच्या आसपास भेळवाल्यांचीं दुकानें शोभत आहेत तोच माझा अभागी पुतळा होय. त्या पुतळ्यावर तूंहि निर्धास्तपणें जाऊन बैस. आणि माझी पुण्यतिथि करण्यास जमलेल्या ढोंगी लोकांना ओरडून सांग कीं, 'लबाडांनो, टिळक मेल्याचा फायदा घेऊन तुम्हीं दर वर्षी असा उत्सव साजरा करतां; पण लक्षांत ठेवा, स्वर्गात तुमची आणि त्यांची गांठ आहे!'

म. ह. ठा. ग्रंथ संग्रह
स्थळ प्रत
क्र. .... नं. ....
ता. ....
ठाणे.

मनोरंजक उखाणे !

१

लुंगी नेसून बोडका जाई
सभेमध्यें अंडीं खाई
(उत्तरः—शंकरराव देव)

*

२

गर्जून गर्जून कहर केला
झुणकाभाकर खाऊन फुकट गेला
(उत्तरः——गद्रे)

*

३

चिकार प्याले, धुंद झाले
कॉलरा होऊन अखेर मेले
(उत्तरः--नीरा)

*

४

झटपट नखरा, गांवामध्यें चकरा
गोल गोल नेसली, सभेंत येऊन बसली
(उत्तरः—सेविका)

*

५

कपाळकरंटा गरगर फिरतो
स्वराज्याच्या गप्पा मारतो
(उत्तरः--चरखा)

*

६

दारू आहे पण अपवित्र नाहीं
देशभक्ताला स्फूर्ति देई
(उत्तरः--नीरा)

*

७

ग्रंथ मोठा लज्जतदार
ब्रह्मचाऱ्यांना आवडे फार
कुमारिकाहि होती गार
(उत्तर:—प्रसाददीक्षा)

*

८

विचित्र करणी,
पंक्तीला बसल्या महारणी,
जेवणाची घाई,
गांवांत झाली रोगराई
(उत्तर:—झुणका भाकर सहभोजन)

*

९

इकडून येई तिकडून जाई
हिशेबाचा पत्ता नाहीं
पुढाऱ्याची झाली कमाई
(उत्तर:—फंड)

*

१०

आश्रमवासी नारी
ती गांधींना तारी
तिचें दूध पिऊन येई हुशारी
(उत्तर:—शेळी)

*

११

गडबडगुंडा आपसांत तंटा
रिकामटेकडे वाजविती घंटा
(उत्तर:—लोकशाही स्व. पक्ष)

*

१२

घोड्यावर बसला हिंदुराव
देशांत खातो फुकट भाव
राणा भीमदेवाचा आणतो आव
त्याचें राजकारण मिसळपाव
(उत्तर:—सावरकर)

*

१३

महात्म्यासाठीं धांवत आला
वाढत वाढत वाढत गेला
सारा देश संकटांत पडला
(उत्तरः—रक्ताचा दाब)

*

१४

चटक चांदणी चळवळी नार
गोल गोल नेसा साडेतीन वार
(उत्तरः—केशरी साडी)

*

१५

स्वारज्यासाठीं श्रीहरी
खजूर खाऊन उपास करी
(उत्तरः—गांधी)

*

१६

म्हटलें तर आहे म्हटलें तर नाहीं
आराम खुर्चीवर शेंगदाणे खाई
(उत्तरः—केळकर)

*

१७

डोक्यांत घालून मिरवा

वाटेल तशी फिरवा

(उत्तर:--पगडी)

*

१८

अर्धा इदर अर्धा उदर

एक नाहीं धड, चिंध्या भाराभर

(उत्तर:--जवाहरलाल)

*

१९

महारांचा राणा,

आहे दीड शहाणा,

कॉंग्रेसच्या नांवानें करी ठणाणा

(उत्तर:--आंबेडकर)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ....

नवयुगचे सुप्रसिद्ध अभ्यासू सहसम्पादक

श्री. रमाकान्त यांचें

तरुणतरुणींचे अत्यंत नाजूक प्रश्न सोडवणारें पुस्तक

कामशास्त्रांतील प्रश्नोत्तरें

जुलैअखेर प्रसिद्ध होईल !

नांवें नोंदवून ठेवा !

प्रकाशक :

REFBK-0005983

पु. [illegible] कं.

लक्ष्मी रोड, पुणें २.

— जवळजवळ फुकट ? —

मे १९४० चीं

आमचीं अप्रतिम प्रकाशनें

१

प्रो. ना. सी. फडके यांचीं गाजलेलीं भाषणें

लघुकथांपेक्षांहि माहितीपूर्ण, चटकदार
व रंजक. अवघी किं. १। रु.

२

लयलूट

इंग्रजी भाषेंतील चटकदार व विचित्र
गोष्टींचा संग्रह. फक्त ५ आणे

३

एक होता राजा

लहान मुलांसाठीं सुंदर गोष्टीं. दहा चित्रें.
सगळीकडे दोन-रंगी छपाई
व अतिशय मोहक कव्हर.
फक्त ६ आणे

प्रो. फडक्यांच्या शब्दांत फडके

प्रो. ना. सी. फडक्यांच्या वाङ्मय-
जीवनाची त्यांच्याच शब्दांत
ओळख. फक्त ५ आणे

२। रु.चीं वरील चार चटकदार प्रकाशनें आगाऊ पैसे पाठविणारास अवघी १ रु. १० आ.(ट.ख.३ आ. नि.)
प्रकाशक:–पु. रा. भिडे आणि कं., लक्ष्मी रोड, पुणें २.

शालेय संकलिपत प्रकाशनें :

१. सुप्रसिद्ध श्री. य. गो. जोशी यांच्या निवडक गोष्टींतील गोष्टी

२. शेक्सपिअरच्या नाटकांची मराठींत ओळख

नवयुगचे श्री. वेलदे यांचें लैंगिक
चर्चात्मक अपूर्व पुस्तक
लौकरच प्रसिद्ध होणार !

प्रकाशक :

पु. रा. भिडे आणि कं.

लक्ष्मी रोड, पुणें २.

कोणतेंहि पुस्तक स्वस्त मिळण्याचें ठिकाण

फेमस फिल्म्स् (मुंबई)
यांचा पहिला सामाजिक हिंदी बोलपट

धर्मपत्नी

लेखकः—वि. स. खांडेकर
—हिंदी संवाद व गाणीं—
किदार शर्मा
'देवदास' व 'विद्यापति' या प्रथितयश बोलपटांचे संवादलेखक.
—संगीत दिग्दर्शक—
अण्णासाहेब माईणकर
प्रोड्यूसर
शिराजअली हकीम
कोल्हापूरच्या शालिनी स्टुडिओमध्यें तयार करण्यांत येत आहे !

फेमस फिल्म्सचे आगामी मराठी बोलपट

गोरा कुंभार

चोखा मेळा

फेमस फिल्म्स, ताडदेव, मुंबई

दांत पडले! म्हणजे

आपल्या तोंडाची शोभा जाते आणि चारचौघांत बोलतांना संकोच वाटतो!

वेळींच सावध व्हा व अखंड बत्तिशी बसवा.

गोल्डपिन ॲनटो फॉर्मची बत्तिशी किं. २५ रु., अमेरिकन १५ रु. (केवळ भपक्यामुळें इतर लोक यांची किं. अनुक्रमें १२५ व ६० रु. घेतात.)

सुप्रसिद्ध डेंटिस्ट-डॉ. सिद्दीक, काळाराम मंदिरासमोर ठाकुरद्वार, मुंबई २

बेकारीचा प्रश्न ?? : : : : दूर झाला !!

'सिसु' ब्रिलियंटाइन व 'सिसु' व्हॅनिशिंग क्रीम वगैरे विकून मुबलक पैसे कमवा ! आजच लिहा:—

सिसु १ ला मजला, रहिमतूला हाउस, होम्जी स्ट्रीट, सर फेरोजशहा मेहता रोड, फोर्ट मुंबई

श्रीजी

दोनच दिवसांत, गोळ्या घेतल्यानें बंद विटाळ नैसर्गिक रीतीनें पुनः सुरू होतो. बाटली किं. रु. ४-१५, ट. ख. स.

सूचना:-श्रीजी गोळ्या अत्यंत प्रभावी असल्यामुळें गरोदरपणीं यांचा उपयोग करूं नये.

स्टॉकिस्ट:-दादर जनरल स्टोअर्स, छबिलदास रोड, दादर
दादर जनरल एजन्सी; मुंबई नं. १४